साप्ताहिक

# माणूस

२६ जानेवारी ८५ / २ रुपये




## कंपन्या पैसे कसे मिळवतात?

अेक विशेष लेख

अभिनय सम्राट

## पॉल म्युनी



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : पस्तिसावा

२६ जानेवारी १९८५

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेघा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता


साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी ४४३४५९

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर



## मुंबापुरी

### ☐ शिमगा !

निवडणुकीचे नगारे पुन्हा एकदा वाजू लागलेत. होळीपूर्वी विधानसभेच्या निवडणुका आटपून टाकू असं वसंतदादांनी सूचित, ध्वनित वगैरे केलंय. तेव्हा आता प्रत्येकाला धुळवडीचे वेध लागलेत.

विरोधी पक्ष आपापली होळी वेगळी पेटवतात किंवा काय ते अद्याप ठरायचंय. आतल्या आत वाटाघाट सुरू आहे. पिकल्या पोळीवरचं तूप घ्यायला डॉ. सामंत येतीलच.

खरा शिमगा बघायला मिळेल तो काँग्रेस (आय) मध्ये. पक्षाला इतकं प्रचंड यश मिळालंय तेव्हा आता आनंदीआनंदात विधानसभेच्या निवडणुका पार पडतील असा अंदाज कुणी बांधू नये. घवघवीत यश मिळाल्यामुळेच आता खरी डोकेदुखी सुरू होईल.

राजीव गांधींच्या नावावर अन काँग्रेस (आय)चा शेंदूर फासून कोणताही धोंडा निवडून येतो हे या खेपेला कळून चुकलंय. तेव्हा आता विधानसभेच्या निवडणुकीसाठी तिकिटइच्छुकांची भाऊगर्दी उडेल. त्यात पुन्हा गटबाजीचं राजकारण. म्हंजे तर बघायला नको.

आदिक अन भोसल्यांना नामोहरम करून दादा आता कुठे आस्ते–आस्ते फॉर्ममध्ये येत होते. अंतुल्यांचा काटाही अनायास निघाला होताच. आता दादांना थोडा कॉन्फिडन्स येतो न येतो तोच त्यांच्यासमोर शंकरराव चव्हाण उभे ठाकले आहेत. शंकरराव केंद्रात गृहमंत्री झालेत. म्हंजे अगदी कूशल खातं. ते सतत राजीव गांधींच्या आगेमागे राहणार अन पर्यायाने महाराष्ट्राच्या राजकारणात एक महत्त्वाचा 'फॅक्टर' बनणार.

शंकररावांना राज्यात मानाचं पान म्हणजे प्रेमलकाकींनाही आता बरे दिवस येतील. मागे अंतुले मुख्यमंत्री असताना भाऊ मुळकांच्या सरकारी बंगल्यावर काकी, मुळक, त्र्यं. गो. देशमुख आणि प्रभाकर कुंटे हे चौघेजण दुपारभर अंतुल्यांना कसं काढायचं याची व्यूहरचना करीत असत. मग काही-वेळाने काकी निघून जात अन मग कुंटे, मुळक अन देशमुख कडक इस्त्रीचे झब्बे काढून संध्याकाळभर कॅरम खेळत असत.

आता सुदैवाने तसं काही करायला नको. आता दिवस बरे आहेत. दादांनी जास्तच शक्ती दाखवली तर सरळ दिल्लीला जायचं अन तिथनं थेट इथे दादांवर पिचकारी मारायची. अस्सा सुरेख शिमगा खेळायचा !

### ☐ सिंदबादच्या सफरी !

विरोधी पक्षांनी जागावाटप आणि समान निवडणूक चिन्हावर बोलणी सुरू केली आहेत. खरं तर हा तसा जुनाच दिवा आहे; पण घासूनपुसून लखलखीत केला तर यातनं आज्ञाधारी राक्षस जनमताचा घवघवीत कौल घेऊन कुर्निसात करीत बाहेर येईल असा विश्वास विरोधी पक्ष–नेत्यांना कदाचित वाटत असावा. वाटू दे.

पण सध्यातरी सगळे विरोधी पक्ष सिंदबादच्या सफरीवर आहेत. बोलणी होताहेत. नवे मुद्दे काढले जाताहेत. मुद्द्यावर मुद्दे.

पी. के. अण्णा पाटलांनी ज्या पुलोदची एकतर्फी घोषणा केली आहे त्यात भाजप नाही. आता अठ्ठ्याहत्तरच्या पवार मंत्रिमंडळात पूर्वाश्रमीचे जनसंघी होतेच. हशू अडवाणी, उत्तमराव पाटील मंत्री होते. मग या वेळी त्यांना का वगळलं ?

तर यावर जनतावाल्यांचं उत्तर असं–की, जनता, शेकाप आणि समाजवादी, काँग्रेस हे तिन्ही पक्ष समान कार्यक्रमावर, समान निवडणूक चिन्हावर येती निवडणूक लढवणार. भाजप आपलं 'कमळ' सोडायला कबूल नाही. तेव्हा त्यांना वगळलं. भाजपशी

आता फक्त जागा वाटप होईल.

पण गंमत ही की जनताची ही घोषणा हवेत विरते न विरते तोच शेकापने आपल्या 'खटारा' चिन्हावर निवडणूक लढवण्याचा इरादा व्यक्त केला. समाजवादी काँग्रेसला जनताचा 'नांगरधारी किसान' मंजूर नाही असं कळतंय. तेव्हा आता समान चिन्ह कोणतं शोधून काढणार? जनता आपलं चिन्ह सोडणार का?

खुद्द जनता पक्षात समान चिन्हावर निवडणूक लढवण्यासंबंधी मतभेद आहेत. आपापलं पक्ष-चिन्ह सोडणं म्हंजे आपली पोलिटिकल आयडेंटिटी संपवून टाकण्यासारखं आहे असं रामकृष्ण हेगडेंनी परवाच्या आपल्या मुंबई-भेटीत जनता नेत्यांना सांगितल्याचं समजतं.

भाजप – शिवसेनेचा तिकडे वेगळाच झिम्मा सुरू आहे. शिवसेनेशी मैत्री नको असा विसंवादी सूर पक्षातल्या एका वजनदार गटाने लावला आहे. बाळासाहेब ठाकऱ्यांनी, उलटपक्षी सगळ्या विरोधी पक्षांनी पवारांच्या नेतृत्वाखाली एकत्र याव असं पत्रक काढलंय. थोडक्यात काय, सगळ्या सिंदबादच्या सफरी!

### □ दुग्धशर्करा

लालेलाल आकाशाखाली बसून मारवा ऐकण्याचे दिवस आलेत. झेवियर म्युझिक ग्रुपने सेंट झेवियर महाविद्यालयाच्या प्रांगणात तीन दिवसांचा संगीत सोहळा आयोजित केला आहे.

चोवीस, पंचवीस अन् सव्वीस जानेवारीला होणाऱ्या या सोहळ्याचे प्रणेते आहेत विख्यात तबलानवाझ अल्लारखासाहेब.

पंडित रविशंकर, अली अकबर, किशोरी अमोणकर, मालिनी राजूरकर ही दादा कंपनी आहे. अन त्याचबरोबर आरती अंकलीकरदेखील पहिल्या दिवशी हजेरी लावणार आहे.

आमच्या मते खरा दुग्धशर्करा योग म्हणजे बिस्मिल्ला खांसाहेबांचे शहनाई-वादन! हल्ली बिस्मिल्लाखां फार दुर्मिळ झालेत. इकडे मुंबई-पुण्यात तर फारसे कार्यक्रमही होत नाहीत त्यांचे; पण खांसाहेबांचं वय जसं उतरतीकडे झुकतेय तो तो त्यांची सनईतली फूंक तगडी होत जातेय. सनईत नुस्ता श्वास नाही प्राण फुकायचा असतो असं खांसाहाब नेहमी म्हणतात. बिस्मिल्ला अन त्यांच्या सनईला कुणाची नजर न लागो!

### □ सर्कस

मुंबई महापालिकेचे माजी प्रशासक अन राज्याचे आताचे महसूल सचिव द. म. सुकथनकरांनी नॅशनल सर्कसच्या पहिल्या खेळाचं उद्घाटन केलं.

– बातमी

टीप –एकशेचाळीस नगरसेवकांच्या चेष्टांपेक्षा ही मुक्या प्राण्यांची सर्कस निश्चितच चांगली असेल ना, सुकथनकर?

–विष्णू जयदेव

राजधानी दिल्ली

# लोहड्या आणि होळ्या

सध्या दिल्लीत थंडीचा पूर्ण अंमल आहे. संपूर्ण जानेवारीभर ती मन मानेल तसे राज्य करते. कधी हातपाय गोठवून टाकणारी थंडी, कधी दुपारचे बारा वाजेपर्यंत धुक्याच्या दाट दुलईत राजधानीला बुडवून टाकणारी थंडी, तर कधी दिवसभर मळभ दाटून पावसाची मधून मधून झिमझिम करीत सूर्य झाकून टाकणारी थंडी. वर्षा ही असली तरी ती सध्या भरात आहे. एकदा सूर्यास्त झाला की, घराची दारे-खिडक्या लावून घरात उबदार बसावेसे वाटते. तरीही कामाच्या निमित्ताने बाहेर जाणे टळत नाही. अशाच कडाक्याच्या थंडीत मी परवा बरसातीत उभी होते. रात्री आठचा सुमार आसमंतात चोहीकडे लालसर प्रकाश चमकू लागला. लवलवता प्रकाश आणि धगधगत्या ज्वाळा दिसू लागल्या. ठिकठिकाणी होळ्या पेटल्या होत्या. अनपेक्षितपणे त्या पेटलेल्या होळ्यांच्या दर्शनाने मला एकदम उबदार वाटू लागले. तो भोगीचा आदला दिवस होता. येथे भोगीच्या दिवशी म्हणजे संक्रांतीच्या आदल्या दिवशी होळ्या पेटवतात. त्यांना 'लोहडी' म्हणतात. भोगीचा दिवस म्हणजे 'लोहडी'चा दिवस असतो; परंतु यंदा तर भोगीच्याही आदल्या दिवशी 'लोहड्या' पेटल्या होत्या म्हणजे तशी मी बेसावध असतानाच या लोहड्यांचे दर्शन झाले. तिसऱ्या मजल्याच्या गच्चीतून (बरसातीतून) या होळ्यांचे दृश्य फार सुंदर दिसत होते. सर्व दिशांना पेटलेल्या होळ्या, त्यांचा लालसर पिवळा प्रकाश, जवळच्या होळ्यांचे धगधगते उबदार रूप आणि संपूर्ण आसमंत त्या प्रकाशामुळे जागृत झाल्यासारखा.

टिकटिकाणी या होळ्या पेटल्या की ताशे वाजवून नाचणारे काही लोक या होळ्यांसमोर नाचतात जोरजोरात ताशे वाजवतात आणि दोन-चार जण त्या तालावर बेभानपणे नाचतात. कधी कधी त्या त्या घरातील माणसेही या नाचात सहभागी होतीत. रंगून नाचतात. ताशेवाल्यांना पैसे देतात. हे ताशेवाले असेच अनेक होळ्यांपुढे नाचतात आणि पैसे गोळा करतात होळ्या धगधगत असतात आणि त्याच्या पुढ्यात ऊब घेत घराघरांतील लोक बसतात आजूबाजूला प्रसाद वाटून आपणही तो होळीपुढे बसून खातात. ज्वारीच्या मोठाल्या लाह्या, भाजलेल्या शेंगा आणि रेवड्या यांचा या प्रसादातात समावेश असतो. 'लोहडी'च्या दोन-चार दिवस आधीपासूनच बाजारात ठिकठिकाणी हा प्रसादाचा माल खास स्टॉल मांडून विकायला ठेवलेला दिसतो. शेंगदाण्याच्या चिक्कीच्या गोल थप्प्यांचीही चवड ठेवलेली असते. थंडीच्या कडाक्यात या गरम लोहड्यांपुढं बसून हे प्रसादाचे पदार्थ एकत्र मिसळून खाण्यातही एक मौज असते.

दुसऱ्या दिवशी म्हणजे भोगीलाही दिल्लीत अशाच अनेक ठिकाणी लोहड्या पेटलेल्या पाहून मात्र मला आश्चर्य वाटले. वास्तविक हाच दरवर्षीप्रमाणे 'लोहडी' चा खरा दिवस. तथापि आदल्या दिवसाच्या मानाने

त्या थोड्या कमी प्रमाणात होत्या. कदाचित आपल्याकडील स्मार्त आणि भागवत एकादशीप्रमाणे भिन्न भिन्न तिथींना या लोहड्या पेटवल्या गेल्या असतील. ताशे वाजवणाऱ्यांचे ताशे दुसऱ्या दिवशीही जोरात वाजत होते. तेवढीच त्यांना दुप्पट कमाई ! ते होळ्यांपुढे रंगून नाचत होते, बेभान होत होते.

कुठल्याही आनंदोत्सवप्रसंगी नाचणे, रंगून नाचणे, आनंदाने बेभान होऊन नाच करणे हा इथल्या 'लोकांचा स्थायीभावच आहे. अशा प्रसंगी स्त्रिया, पुरुष आणि मुले सर्व मिळून नाचत असतात. त्यात संकोचाचा किंवा लज्जेचा भाव अजिबात नसतो. नवऱ्या मुलाची घोड्यावर बसून 'बारात' चाललेली असताना त्याच्या पुढे बँडच्या तालावर नाचणाऱ्या स्त्री–पुरुषांचा नि मुलांचा घोळका हमखास असतो. भरजरी सुंदर कपडे घातलेल्या स्त्रिया–मुले आणि सुटातले पुरुष एकत्र आनंदाने नाचत असतात. त्या नाचात बीभत्सपणा कुठेही नसतो. केवळ आनंद आणि उत्सवाच्या जल्लोषातील बेभान वृत्तीच त्यातून जाणवते. दिल्लीत प्रथम आल्यावर लग्नाच्या वरातीतून स्त्रियाही कशा नाचत असतील याचे मला मोठे कुतूहल वाटायचे. मी काहीशा कुतूहलाने आणि काहीशा विचित्र नजरेने ते पहात रहायची. या स्त्रियांना रस्त्यातून नाचत जाताना लाज कशी वाटत नाही, असे वाटायचे. परंतु हा नाच अनेकदा ठिकठिकाणी पाहून त्यांतील निर्भेळ आनंदाची तन्मयता मलाही धुंद करू लागली. अशा आनंदाच्या प्रसंगी तरी बाकीच्या सर्व भावनांना गौण स्थान देऊन, त्या आनंदात उत्कटतेने समरस होण्याची इथल्या लोकांची वृत्ती खरोखर किती चांगली आहे, हे मनाला पटू लागले. छोट्या छोट्या तीन–चार वर्षांच्या मुलांच्या अंगातही ही नाचाची लय आणि वृत्ती अगदी भिनून गेलेली असते. तरुण–तरुणी, प्रौढ, म्हातारे आणि म्हाताऱ्याही नाचत असतात. आनंदोत्सवातील बेहोषी निरंकुशपणे उपभोगायलाही ती वृत्ती बालपणापासून जोपासावी लागते. ही गोष्ट अशा वेळी मला प्रकर्षाने जाणवते.

दिल्लीतील ' लोहड्या 'आणि थंडी यांची एक सांगड मनात बसलेली असतानाच महाराष्ट्रातील होळ्या आणि उन्हाळ्याची सौम्य रम्य सुरवात यांचीही एक सांगड माझ्या मनात घट्ट बसलेली आहे. महाराष्ट्रातील होळ्या म्हणजे वर्षभरातील कटुकिल्मिषांना जाळून नव्या वर्षाच्या स्वागताची केलेली तयारी असते. वर्ष प्रतिपदेच्या गुढ्या उभ्या करण्यापूर्वी पंधरा दिवस, म्हणजे होळीला सर्व कटु गोष्टींना जाळून टाकत असतानाच बोंबा मारून मनातील अभद्रतेचेही विरेचन करून टाकण्याची वृत्ती दिसते. याच वृत्तीला धुंद, बेभानपणाने नाचून दिलेली वाट म्हणजे अधिक चांगले, सुसंस्कृत असे दिलेले रूप आहे, असे मला वाटते.

कसेही असले तरी होळ्या पेटून त्यांचे ज्वलंत, धगधगते रूप पाहिले की माझ्या मनाला फार बरे वाटते. त्या धगधगत्या ज्वाळा आणि त्यामागील पूज्य–पवित्र भावनांची पार्श्वभूमी मनाला शांती देत राहते. भावनांना कोमल–हळुवार बनवते. त्या लवलवत्या अग्निशिखांची उब ही शरीराबरोबरच मनालाही मिळत राहते.

या होळ्यांचे माझ्या मनात वसलेले रमणीय रूप आम्ही सांगलीला रहात असतानाचे आहे. विश्रामबागेतील आमच्या कॉलनीतील घर म्हणजे एक टुमदार बंगली होती. आजूबाजूचे प्लॉटस तसे अजूनही रिकामेच पडलेले होते आणि समोरच्या बाजूला तर चक्क शेताची जागा होती. फक्त हिवाळ्यात तिथे ज्वारीचे किंवा बाजरीचे शेत फुललेले असे. उन्हाळ्यात मात्र ती जागा मोकळ्या माळरानासारखी रिकामीच पडलेली असायची. तिच्या पलिकडे म्हणजे घरापासून सुमारे दोन फर्लांग अंतरावर ओळीने काही घरे होती. होळीच्या दिवशी त्या घरांच्या दिशेने चंद्रोदय होत असे आणि तासा दीड तासातच शेताच्या संपूर्ण माळावर दुधाच्या कासंडी ओतल्याप्रमाणे शुभ्र धवल चांदणे पसरून जाई. फाल्गुन पौर्णिमेचा चंद्र आपल्या सोळा कलांनी परिपूर्ण असा अतिशय तेजस्वी, सुंदर दिसे. रात्री आठच्या सुमारास अवतीभवती निरवता, भरून राहिलेली, धवल चांदणे रमणीयपणे पसरलेले आणि समोरच्या शेतापलिकडील घरांसमोर होळ्या पेटलेल्या ! अवती–भवतीही दूरदूरवर ठिकठिकाणी होळ्या पेटू लागत. एखाद्या चित्रासारखे ते दृश्य मनावर बिंबून जाई. निरव शांत वातावरणात दूरवरून ऐकू येणारा लहान लहान मुलांचा शंखध्वनीही गोड वाटू लागे. चांदणे अधिकाधिक दाटत आपला शुभ्र प्रकाश आसमंतात पसरत राही. आमच्या आवारातच झोपडी बांधून राहणाऱ्या लिलव्वाच्या होळीत पुरणपोळीचा नैवेद्य टाकताना मनाला एक अपूर्व समाधान वाटे. अनिर्वचनीय आनंद होई. होळ्या विझू लागल्या की, मनाला एक अनामिक हुरहूर लागे. इकडे 'लोहड्या' पेटल्या की तिकडच्या होळ्यांची उत्कट आठवण मनाला आवर्जून झाल्याशिवाय रहात नाही.

—ललिता मिरजकर

---

पुणे वार्ता

## लोकसाहित्य विचार : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र

समाजातल्या वृत्ती-प्रवृत्तींकडे माझे नेहमी लक्ष असते, साहित्यात मला रस आहेच. साहजिकच ह्या दोन्ही गोष्टी जिथे एकत्र येतात ते समाजाचं साहित्य किंवा लोकसाहित्य म्हणजे काय हे समजून घेण्यास मी उत्सुक होते. अर्थात नुसत्या उत्सुकतेने काही भागत नाही, आपण अशा अनेक छोट्या छोट्या विषयांना वेळ देऊ शकत नाही, अभ्यास करू शकत नाही. मग जे कोणी दीर्घ अभ्यास करून त्याचं सार सादर करणार असतील त्यांचा तरी आपण लाभ घ्यावा असा विचार येतो. पुणे विद्यापीठाच्या निरंतर प्रौढ शिक्षण व ज्ञानविस्तार विभागातर्फे कै. न. चिं. केळकर स्मारक व्याख्यानमालेत अहमदनगरच्या डॉ. गंगाधर मोरजे यांची 'लोकसाहित्य विचार : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र' या विषयावर चार व्याख्याने होणार असल्याचे समजल्यापासूनच तेथे जाण्याचे ठरवले होते. यापैकी पहिले व्याख्यान १६ जानेवारी रोजी सायंकाळी झाले. त्यात 'लोकसाहित्य : परंपरा आणि संप्रदाय' हा विषय होता. लोकसाहित्य म्हणजे आदिवासींचं, अर्धनागरी लोकांचं, अनुसूचित जातीजमातींचं साहित्य म्हणजेच एका अर्थानं अशिष्ट

समाजाचं साहित्य असं आपल्याकडे मानलं जातं. या समाजावर सुरुवातीलाच डॉ. मोरजे यांनी प्रहार केला. आदिवासींची गाणी, धनगरी ओव्या, येथपासून तो लावणी, पोवाडा, गोंधळ, गवळण, कीर्तन, शाहिरी वाङमय ही सगळी लोकसाहित्याचीच रूपं असतात. यातली कित्येक रूपं शिष्ट समाजाचं मानस व्यक्त करीत असतात. फार कशाला महाभारतही एका अर्थानं लोकसाहित्यच आहे. कारण शतकानुशतकांच्या वाटचालीत त्याची अनंत रूपं सिद्ध झालेली आहेत. मग एखाद्या लोकगीतात सीतेचं रावणावर प्रेम होतं अशी कथा सांगितली जाते व श्रोतेही तिच्यातल्या देशकालपरिस्थितीचा बदलाला अजिबात हरकत न घेता उलट त्याच्याशी समरसून जातात. कारण समोरच्या लोकसाहित्य प्रयोगकाराने श्रोत्यांच्या देशकालपरिस्थितीशी रामायणाची बेमालुम सांधेजोड केलेली असते. सारांश लोकसाहित्य ही समाजातल्या विशिष्ट स्तराची मिरास नाही. तर ते सर्व समाजाचं धन आहे. माणूस व माणसांचा बनलेला समाज नेहमी गतिशील, परिवर्तनशील असतो म्हणून त्यांचं साहित्यही परिवर्तनशील म्हणजेच लवचिक असतं. भारतीय तत्त्वज्ञानाची जी चक्र कल्पना आहे, ज्या चक्राला आरंभ-मध्य-अंत नाही तसंच या समाजाचंही आहे. लोकसाहित्यालाही निश्चित उगमस्थान दाखवता येत नाही व एखाद्या लोकसाहित्य-प्रकाराची अखेरही ठामपणे दाखवता येत नाही. त्याची रूपं बदलतात, ते आकारानं आवाक्यानं लहानमोठं होतं. यातच त्याचं सामर्थ्यही असतं आणि त्याची मर्यादाही असते. लोकगीत हे जुनंही नसतं आणि नवंही नसतं. ते त्या समाजाच्या अंतरंगाशी एकरूप झालेलं असतं. आपल्याकडे मिशनऱ्यांनी गावोगाव फिरून लोकगीतं गोळा केली होती. कारण या समाजाची नाडी पकडण्याच्या दृष्टीनं त्यांना हा मार्ग सोपा व खात्रीचा वाटला. एखाद्या समाजाची धर्मकल्पना, नीतिकल्पना, मूल्यविवेक, जीवनमान, संकेत हे सारं त्याच्या लोकसाहित्यात प्रकट होतं हे तर खरंच; पण म्हणजे लोकसाहित्य हे इतिहासाचं साधन होऊ शकेल का? डॉ. मोरजे यांच्या मते हे इतिहासाचं साधन नाही. आदिम माणसाचा विकास कसा झाला हे समजण्यास लोकसाहित्य वापरणे हा त्याच्यावर अन्याय आहे. अशा प्रकारे लोकसाहित्य साधन म्हणून किती वेळ जगू शकेल? उलट एक उपयोजित कलाप्रकार म्हणून त्याच्याकडे पहावे लागेल, कला प्रकाराची प्रतिष्ठा त्याला द्यावी लागेल तरच त्याचं सामर्थ्य आपल्याला जाणवेल. एखादं साहित्य समाज वापरतो म्हणून ते लोकसाहित्य होत नाही. उदाहरणार्थ, आपण वर्षानुवर्षे राष्ट्रगीत म्हणतो. ते 'आपलं' असलं तरी लोकसाहित्य नाही कारण ते स्थिर आहे, त्यात बदल करण्याचा कोणालाही हक्क नाही. उलट 'चल रे भोपळ्या टुणुकटुणुक'सारख्या कथेची अगणित रूपं आजही उपलब्ध आहेत व अजूनही अनेक बदल सामावून घेण्याची तिच्यात शक्यता आहे. अशाप्रकारे लोकसाहित्य हे सर्वसमावेशक असते. वेगवेगळ्या काळातल्या, वेगवेगळ्या माणसांच्या वेगवेगळ्या वृत्तीप्रवृत्ती प्रवाह कवेत घेऊन ते जोमाने पुढे जात असते. तसेच काळाच्या ओघात मागे पडलेल्या प्रवृत्ती, प्रवाह ते गाळतही असते. समोरचा श्रोता, प्रेक्षक त्यात सहभागी असतो. आज उपलब्ध असणाऱ्या लोकसाहित्याच्या संहिता या प्रेक्षकसापेक्ष दृष्टिकोनातून वाचाव्या लागतील. नाहीतर त्यांची अर्थवत्ता ध्यानी येणार नाही. आज साहित्याच्या सामाजिक बांधिलकीविषयी पुष्कळच चर्चा होते. लोकसाहित्याच्या बाबतीत हा प्रश्न उत्पन्नच होत नाही. त्याची बांधिलकी गृहीतच आहे. ते लोकांचं, लोकांनी लोकांसाठी रचलेलं साहित्य आहे. दिनांक १७ जानेवारीच्या व्याख्यानासाठी 'लोकसाहित्याचे वर्तमान' व १८ जानेवारीसाठी 'आस्वादप्रक्रियेचे स्वरुप' हे विषय होते. व्यक्तिशः मला या चारही व्याख्यानांमध्ये विषयांची काटेकोर मांडणी जाणवली नाही. तर थोड्या पसरटपणाने मागचे घेत पुढे जाण्याचा प्रकार चारही दिवस जाणवला. अर्थात डॉ. मोरजे यांच्या व्यासंगामुळे संदर्भांची समृद्धी नेहमीच जाणवली. लोकसाहित्याच्या संप्रदायांविषयी बोलताना त्यांनी अनेक उदाहरणे दिली. पंथीय संप्रदाय, प्रादेशिक संप्रदाय, प्रायोगिक संप्रदाय वेगवेगळ्या साहित्य प्रकारात कसे आले हे सांगताना ते म्हणाले की जेव्हा एखादी परंपरा आवर्तात सापडते, चाकोरीबद्ध होते, चैतन्यहीन होते तेव्हाच तिच्यातले संप्रदाय प्रबळ ठरतात. हे संप्रदाय टिकायचे असतील तर त्यांना गतीशील राहावेच लागते. सजग राहावे लागते अभिसरणशील राहावे लागते. धर्मसापेक्ष कीर्तन गाडगेबाबांनी समाजसापेक्ष केलं. यातून लोकसंवादाचं सामर्थ्य त्यांनी कसं ओळखलं होतं हे दिसतं. आज रेडिओ, टी-व्ही. यांना आपण प्रसारमाध्यमं म्हणून महत्व देतो; पण ही माध्यमेही दूरान्वयाने श्रोतृसापेक्ष असली तरी प्रत्येक्षात रिजिडच आहेत. उलट समोरच्या श्रोत्याची आवड, निवड, चिकाटी मनःस्थिती वगैरे पाहून तिथल्या तिथे बदल करणारं लोकसाहित्य हे प्रसाराचं सर्वात प्रभावी माध्यम होऊ शकेल हे लक्षात येतं.

लोककथा ही समूहनिर्मिती असते. समूहातला प्रत्येकजण त्यात भर घालत असतो. त्याला वाकवत असतो. अशाप्रकारे त्यात बदल होतात तरीही ते आपलं मूळ किंवा गाभा सोडत नाही यातच त्याचं मर्म आहे. आता हे लोकसाहित्यातले लोक म्हणजे कोण? हा विशिष्ट कारणासाठी एकत्र आलेला जनांचा समुच्चय असतो. माणसाचे अनेक गट होऊ शकतात, एकच माणूस अनेक गटांचा घटक होऊ शकतो; पण लोकसाहित्यातले लोक हा समान सौंदर्यकल्पना असणारा, समान नीतिकल्पना असणारा, समान जीवनविषयक तत्वज्ञान असणारा असा एक गट असतो. त्या गटाच्या संदर्भचौकटीत त्या त्या वेळचे लोकसाहित्य वाचले तरच ते पूर्णार्थाने समजते 'चांदोमामा भागलास का?' या गीताचे असे अनेक संदर्भ डॉ. मोरजे यांनी स्पष्ट करून दाखवले. हे गीत निजणाऱ्या किंवा तिन्हीसांजा किरकिरणाऱ्या मुलासाठी आई म्हणते. श्रोत्यांसाठी म्हणत नाही; पण ती आई, मूल, आईनं त्याला मांडीवर किंवा कडेवर घेण्याची पद्धत, ती वेळ, हवामान, भौगोलिक प्रदेश, लपाछपीसारख्या मुलांच्या खेळाचा उल्लेख, निंबाच्या झाडाचं शास्त्रीय महत्व अशा अनेक अंगांनी त्याचा विचार करावा लागतो. येथे मातेचा आनंद व बालकाचे मनोविनोदन एवढेच प्रयोजन आहे. लोकसाहित्य मौखिक, उच्चारित शब्दावर आधारलेले असते, ते ऐकणे, ग्रहणे, त्यात सहभागी होणे यामुळे त्याचा आशय गोचर होतो. उलट विदग्ध साहित्य हे छापील, मुद्रित, अक्षरबद्ध असतं त्यातला आशय

केवळ शब्दातून अनुभवावा लागतो. या दोन्ही साहित्यात श्रेणीचा फरक मानता कामा नये, कालव्यत्यासही नाही तर एकाच काळात एकाच समाजातून हे दोन्हीही आकाराला येतं व दोन्हीत अभिसरण घडणं हे समाजाच्या निरोगीपणाचं लक्षण असतं.

अखेरच्या दिवशी लोकसाहित्याच्या समीक्षेच्या अंगानं डॉ मोरजे यांनी विचार मांडले. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण लोकसाहित्याचे तुकडे पाडत असलो तरी ते गतीशील आहे याचं भान विसरता कामा नये. शब्द-प्रयोग या दोन्हीचा या गतीशीलतेच्या दृष्टीने विचार झाला नाही की लोकसाहित्याची समीक्षा कमी पडते व ते ढोबळ आहे, बटबटीत आहे भडक, उथळ, अशिष्ट आहे असे आरोप येतात. लोकसाहित्यात पुनरावृत्ती, तीच ओळ किंवा कल्पना पुन्हा पुन्हा येते. कारण मुद्रित साहित्याप्रमाणे जरूर तेव्हा मागे वळून मागचे संदर्भ तपासून बघण्याची त्यात सोय नसते. ही सोय करण्यासाठी पुनरावृत्ती. लोकसाहित्याचा श्रोता व प्रेक्षक यांचा कल्पनाशक्तीचा आवाका प्रचंड असतो, म्हणून तर एक चक्कर मारली की गवळणी मथुरेला पोचल्या हे प्रेक्षक समजू शकतो. लहान वाक्ये, लय, पुनरावृत्ती, शिव्यांचा किंवा अशिष्ट शब्दांचा वापर हा या प्रेक्षक-श्रोत्यासाठी असतो. वाचताना अशिष्ट वाटणाऱ्या अनेक शब्दांना प्रयोगात इतकी उत्स्फूर्त दाद मिळते की आपण थक्क व्हावे. विदग्ध-साहित्यात जशा प्रतिमा तसे लोकसाहित्यात संकेत असतात. आजचा आपला समाज जगण्याची पद्धत, भाषा, मूल्यविवेक हा त्यावर लादला की गोंधळ होणारच. लोकसाहित्याची संहिता सपाट वाटते पण ती प्रयोगातच चढत जाते, उत्कर्षबिंदूपाशी थांबते. ज्या समाजाचा आवाका छोटा, जीवन मर्यादित, जीवनसंकेतांचा साठा लहान, शब्दच्छा थोडचा त्यातलं लोकसाहित्य हे साहजिकच विदग्ध साहित्यापेक्षा संकुचित वाटतं. मग प्रयोगात मोठ्यानं बोलणं, भडक मेकप, ढोबळ विनोद याची संगती लागू शकते. शिवाय यात समूहमन (मॉबमाइण्ड) कार्यान्वित होतं. समूह मनात वैयक्तिक स्वभावांचे कंगोरे झिजतात, सूक्ष्म जीवनानुभव लोप पावतात व एक ढोबळ पण सर्वसमावेशक असा समूहमानस तयार होतो. याची बांधिलकी शुद्ध कलामूल्यापेक्षा परिसराशी असते. त्या परिसरातलं संगीत, साहित्य, अभिनय, नाट्य या सर्वांचा परिपाक म्हणून ही एक संमिश्र कलाकृती तयार होते. बरं, हा लोकसाहित्यकार हा एकाच वेळी कलाकारही असतो आणि समीक्षकही असतो. ढोलकीचा एखादा ठेका चुकला तर रंगमंचावरच गायक त्या वादकाला दुरुस्त करतो गाण्याची ओळ चुकली तर समूहातले इतर गायक त्याला सुधारून घेतात व त्यात कोणाला काही वावगं वाटत नाही. कारण त्या त्या वेळी त्या मूळ कथेचं वास्तव व प्रयोगाचं वास्तव हे दोन्ही मिळून एक नवीनच वास्तव किंवा वर्तमान तयार झालेलं असतं.

अशाप्रकारे लोकसाहित्याचा बहुविध अंगांनी विचार या चार दिवसांमध्ये झाला. रा. चिं. ढेरे यांनी समारोपात आणखीही काही विचार सांगितले. एक स्वतंत्र अभ्यास-क्षेत्र म्हणून लोकसाहित्याला प्रतिष्ठा मिळवून देण्याची या सर्वांची धडपड लक्षणीय होती पण त्याला श्रोत्यांचा प्रतिसाद किती? तर दररोज पाच, सात किंवा दहा श्रोते हजर राहात. दिवसेंदिवस अभ्यासपूर्ण व्याख्यानांचा श्रोता उणावत चालला आहे हे तर सर्वांनाच माहीत आहे. तरी आपल्या विद्येच्या माहेरघरी वगैरे ही अवस्था असावी? दुसरा विचार येतो तो स्मारक व्याख्यानमालांसंबंधी! व्यक्ती कितीही मोठी असो, तिची स्मृती किती काळ, कुठल्या स्वरूपात कितपत अट्टाहासानं ठेवायची याचा काही विवेक संबंधितांनी धरायला नको काय? डॉ. मोरजे यांच्या परिश्रमाची बूज पुणे राखू शकले नाही एवढं नक्की.

—मंगला गोडबोले


## राजहंसचे नवे प्रकाशन

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईच सुख? तिला दुःख आहेच कुठे?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न!

# कंपन्या पैसे कसे मिळवतात ?

विनायक गोखले

भांडवलदार, एक वादग्रस्त पण समाजाच्या दृष्टीने आकर्षक असलेले व्यक्तिमत्त्व. जेट युगाचा पाया हाच मुळी 'उद्योग' असल्याने काळाला अनुसरून आलेले अनन्य-साधारण महत्त्व ही व्यक्तिमत्त्वे उपभोगीत आहेत. पूर्वीच्या काळात टाटा–बिर्ला या नावांमागे जे वलय होते, ते आज अनेक नावांमागे दिसून येते. उद्योगधंद्यांमध्ये झालेल्या प्रचंड वाढीचा हा परिणाम आहे. राजकारणावर असलेला भांडवलदारांचा प्रभाव हा सुद्धा उद्योगधंद्यांचा वाढता पसारा दर्शवणारा आहे.

भारतातले मोठे–मोठे उद्योग, जे नेहमी चर्चेचे विषय असतात. त्या उद्योगांच्या संदर्भात घडणाऱ्या घटना, मग त्या बारीक सारीक का असेनात, बातम्या ठरतात. अशाच बारीक सारीक घटनांवर समाजात लगेच प्रतिक्रिया मिळतात. प्रामुख्यानी शहरातील समाज हा या क्षेत्रासंबंधी फार संवेदनाशील झाला आहे आणि त्याची कारणंसुद्धा आहेत. ती म्हणजे सर्वसामान्यांची औद्योगिक क्षेत्रात विविध मार्गांनी होत असलेली वाढती गुंतवणूक

पूर्वीच्या काळात उद्योगधंद्यात केली जाणारी गुंतवणूक ही एक 'रिस्क' समजली जायची, आणि गुंतवणूक करायची तर ती निवृत्तीनंतर अशा प्रकारची मनोवृत्ती निदान 'मराठी' माणसात आढळायची. परंतु ती परिस्थिती आता पूर्णपणे बदलली आहे. बँक आणि विमा ही दोनच बचतीची सुरक्षित क्षेत्रे आहेत असा समज जो समाजात होता तो आता पूर्णपणे बदलला आहे. कारण ८२ सालच्या आकडेवारीनुसार भारतातील प्रमुख मोठ्या उद्योगांची मालमत्ता हीच मुळी १५ हजार कोटीच्या आसपास होती. आणि तिच्यात सतत वेगाने वाढ होत आहे.

भारतात सध्या पब्लिक लि. आणि प्रायवेट लि. अशा दोन्ही प्रकारच्या उद्योगांमध्ये लोकांचे भागभांडवल अस्तित्वात आहे साडेनऊ हजारावर असलेले पब्लिक लि. उद्योग आणि साठ हजारावर असलेले प्रायवेट लि. उद्योग आज आपले बस्तान टाकून आहेत. पब्लिक लि. या प्रकारात मोडणाऱ्या भारतातील उद्योगाचे Paid–up Capital हे त्यांच्या वाढत्या संख्येबरोबर वाढत आहे. १९७८ साली ७७२५ उद्योगांचे भांडवल २६४९ कोटी होते ते ८२ साली ९५३० उद्योगात मिळून ३०२२ कोटीवर गेले आहे. १९८३ आणि ८४ मध्ये ह्यात प्रचंड वाढ झाली आहे. अजून अधिकृत आकडेवारी हाती नसली तरी सध्याच्या भारतीय उद्योगांचे जे पब्लिक लि. ह्या प्रकाराखाली येतात, त्यांचे Paid–up Capital हे चार हजार कोटीच्या घरात गेले असावे असा अंदाज आहे.

मोठ–मोठे उद्योग नियंत्रित करणाऱ्या व्यक्तींच्या नियंत्रणाखाली हा सगळा पैसा असतो; पण ह्याच्यात प्रत्यक्ष नियंत्रण करणाऱ्यांच्याकडे ह्या उद्योगातील किती भागभांडवल असते ? फारच थोडे ! मग उरलेले भांडवल गोळा करण्याकरता त्यांना वेगवेगळे मार्ग अवलंबावे लागतात व त्यातला एकमार्ग हा 'लोकांपाशी' येतो तर दुसरा बँका व वित्तीय संस्थांकडे.

सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या अनेक वित्तीय संस्था भारतीय उद्योगात गुंतवणूक करतात. कधी कर्जरूपाने तर कधी भांडवल रूपाने गुंतवणूक करणाऱ्या वित्तीय संस्थांचे भागभांडवल अनेक मोठ्या उद्योगांत चाळीस टक्क्यांच्या आसपास आहे. स्वराज्य पॉल, ए. सी. सी. यासारख्या प्रकरणांमुळे हे अनेकांना माहिती असेल, परंतु या प्रकारची गुंतवणूक करणाऱ्या वित्तीय संस्था म्हणजे LIC किंवा IDBI एवढ्याच नसून अनेक आहेत. LIC, IFCI, ICICI, IDBI, UTI, GCI, Industrial Investment Trust, Investmert corp. of India या सारख्या वित्तीय संस्था थोड्याबहुत प्रमाणात भांडवल गुंतवणूक करतात.

## लोकप्रियता – बाजाराच्या किंमतीवर

या वित्तीय संस्थाव्यतिरिक्त उद्योगांना लागणाऱ्या भागभांडवलाचा प्रमुख वाटा लोक उचलतात आणि त्यांना तो उचलायला लावणं ह्यात उद्योगाच्या नियंत्रकांची खरी कसोटी असते. बँका, नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकिटस् किंवा तत्सम सरकारी आश्रय लाभलेल्या संस्थांत पैसे ठेवण्यापेक्षा ते खाजगी उद्योगात ठेवण्यामध्ये असलेला फायदा व सुरक्षितता ह्या दोन्ही गोष्टी पटवून देण्यात विविध उद्योगसमुहांचे नियंत्रक यशस्वी झाले आहेत असे म्हणायला हरकत नाही. १९८२ सालच्या आकडेवारीनुसार तिच्यात जवळजवळ दिडपटीनी गेल्या वर्षात वाढ झाली आहे भांडवल गुंतवणुकीसाठी निरनिराळ्या उद्योगांनी सुमारे ३०० कोटी रुपये उपलब्ध केले होते. त्यातील जवळजवळ ८६ टक्के म्हणजे २६० कोटीच्या आसपास भांडवल लोकांद्वारे गुंतवले गेले.

शेअर्स, डिबेंचर्स, फिक्स डिपॉझिट व प्रेफरन्स शेअर याद्वारे गुंतवणूक विविध उद्योगात लोकांमार्फत होते. यापैकी प्रेफरन्स शेअर हे आता कालबाह्य ठरू लागले आहेत. ८२ साली २०४ कोटी रुपयांचे प्रेफरन्स शेअर खरेदी करण्याची संधी असताना फक्त २५ टक्के म्हणजे ०.५ कोटीच्या आसपासच ते खरीदले गेले. गेल्या दोन वर्षात फारच कमी प्रेफरन्स शेअर्स लोकांना विकत घेण्यास उपलब्ध करून देण्यात आले. अनेक उद्योगांनी प्रेफरन्स शेअर्सच्या बदल्यात डिबेंचर्स देऊ केले आहेत. प्रेफरन्स शेअरवरचा डिव्हिडंट हा ठरलेला असतो व तो साधारणपणे १० टक्क्यापेक्षा जास्त नसतो. पूर्वीच्या काळात हे ठीक होते; परंतु बाँडस् किंवा डिबेंचर्सचा जमाना सुरू झाल्यावर हे कालबाह्य ठरू लागले आहेत.

११%...१३% असं करत डिबेंचरवरील व्याज १५% वर जाऊन पोहचले आहे आणि त्यांच्या लोकप्रियतेचे तेच प्रमुख कारण आहे. कनव्हरटिबल आणि नॉन कनव्हरटिबल असे दोन प्रकार डिबेंचरमध्ये असतात. भांडवलदार हे दोन्ही प्रकार लोकांच्या गळी उतरव-

ण्यास पूर्ण यशस्वी झाले आहेत. Straw Product यांचे ५०० रुपयाचे बाँड त्याच्या बदल्यात तीन वर्षांनी ते २५ शेअर उपलब्ध करून देणार आहेत किंवा लोहिया मशीन टूल्सच्या २०० रुपयाच्या डिबेंचरला मिळणारे ७ शेअर यासारखे अनेक Convertible डिबेंचर्स प्रचंड लोकप्रिय झाले. Straw चा डिबेंचर ज्याची दर्शनी किंमत ५०० रुपये होती तो नेहमीच त्याच्या शेअर्सच्या समप्रमाणात वाढतो. लोहिया मशीन टूल्स् या उद्योगाने जे डिबेंचर देऊ केले त्यांची बाजारात किंमत एकेकाळी ४५० च्यावर गेली याचे कारण पुढे मिळणारे ७ शेअर्सच नव्हते तर डिबेंचर धारकाला Vespa XE मिळण्यात अग्रक्रम देण्यात येणार होता. रिलायन टेक्सटाईल या उद्योगाने आपल्या शेअरच्या बाजारात असलेल्या वाढत्या किंमतीचा पुरेपुर फायदा उठवत डिबेंचरच्या पाच मालिका काढल्या.

'१०० रुपयाच्या एका डिबेंचरला २५ रुपये प्रिमियम घेऊन एक १० रुपयाचा शेअर अशा प्रकारच्या डिबेंचरला 'विमल' कापडाची सवलत देणारी कुपन्स होती. रिलायन टेक्सटाईल या उद्योगाची डिबेंचर मालिका यशस्वी होण्याकरता काही प्रमाणात ही कुपन्स सुद्धा यशस्वी ठरली. डिबेंचर्स म्हणजे उद्योगसमुहाने लोकांकडून घेतलेले कर्ज, जें बहुतांशी सुरक्षित असते. उद्योगाची मालमत्ता व गंगाजळी यांना अनुसरून हे डिबेंचर लोकांना उपलब्ध करून देण्यास

## कर्जरोखे आणि शेअरची वाढती लोकप्रियता....

फिक्स डिपॉझीटस्, मग ती कोणत्याही उद्योगसमुहाची का असेनात, सर्वच काही सुरक्षित समजली जात नाहीत. परंतु त्यांच्यावर मिळणारे व्याज हे इतके दिवस आकर्षण होते. 'डिबेंचर्स' हा प्रकार अस्तित्वात आला, आणि फिक्स डिपॉझिटद्वारे पैसे मिळवण्याच्या पद्धतीला जणू काही ग्रहण लागू लागले आहे. कारण 'फिक्स डिपॉझिट' एवढेच व्याज देणारे आणि पूर्ण सुरक्षित असलेले डिबेंचर्स लोक जास्त पसंत करू लागले आहेत असे दिसते. टेल्कोनी देऊ केलेल्या 'कर्जरोख्यां'च्या रकमेपेक्षा ५५ कोटी रुपये जास्त जमा झाले. पुढे त्यांनी जमलेल्या सर्व रकमेचे 'कर्जरोखे' देण्याची सरकारकडून परवानगी घेतली. तर टिस्को या टाटा उद्योग गटातील दुसऱ्या उद्योगसमुहाने ५० कोटी रुपयांचे कर्जरोखे देऊ केले तर त्याला प्रतिसाद मिळाला तो ९५ कोटी रुपये जमून. परंतु त्यांनी एकूण जमलेल्या रकमेच्या ७५% रकमेचे कर्जरोखे दिले. टाटा गटाचाच अजून एक उद्योग ACC, यांनी ३५ कोटी रुपये रकमेचे कर्जरोखे देऊ केलेले असताना ५५ कोटी रुपयांच्या कर्जरोख्यांची ग्राहकांकडून मागणी झाली. याशिवाय बजाजचे कर्जरोखे हेसुद्धा खूप लोकप्रिय ठरले. रिलायन टेक्स्टाईल या उद्योग समुहाने आपल्या कर्जरोख्यांची पाचवी मालिका काढली, ८० कोटी रुपये रकमेची. हे 'कनव्हर्टिबल' कर्जरोखे 'सुद्धा' लोकप्रिय ठरले. आधीच्या चारही मालिकांच्या बाबतीत त्यांनी एका कर्जरोख्याला एक शेअर जोडून दिला होता १५ रुपये प्रिमियम घेऊन, परंतु पाचव्या मालिकेकरता एका कर्जरोख्याला एक शेअर देताना त्यांनी शेअरवर दिला जाणारा प्रिमियम १५ वरून चाळीसवर नेला. पहिल्या चार मालिका मिळून जेवढ्या किंमतीचे कर्जरोखे बाजारात आणले होते त्यापेक्षा जास्त रकमेचे त्यांनी पाचव्या मालिकेसाठी देऊ केले व त्याचबरोबर प्रिमियम सुद्धा जास्त घेतला तरीसुद्धा त्यांचा 'इश्यु' लोकप्रिय ठरला हे वैशिष्टय. रिलायन टेक्सटाईलचा 'इश्यु' लोकप्रिय ठरण्याचे कारण त्यांचा भाव, त्यांनी गेल्या चार मालिकांच्या कर्जरोख्यांचे शेअरमधील केलेले रूपांतर असेल; पण टाटा गटातील किंवा इतर उद्योग समुहांचे काय ? ते लोकप्रिय का व्हावेत ? तर याचे कारण नुसते 'सुरक्षित' ठेवी असे नसून अशा प्रकारच्या गुंतवणुकीतून होणाऱ्या फायद्याची जाणीव आता सर्वांनाच होऊ लागली आहे हे आहे. नाही तर दोन–चार महिन्यात टेल्को, टिस्को, बजाज, ACC व रिलायन या एका हाताच्या बोटावर मोजता येऊ शकणारे उद्योग पाचशे कोटी रुपयांचे कर्जरोखे खपवून वाढत्या उद्योगाला भांडवल जमवतात, या घटनेचा दुसरा कोणता अर्थ लावायचा ?

डिबेंचर्स किंवा कर्जरोख्यांचा परिणाम हा फक्त उद्योगातील 'फिक्स डिपॉझिट' वरच झाला आहे अशातला भाग नाही. बँकेतील दीर्घ मुदतीच्या ठेवी व इतर सरकारी नियंत्रणाखालील संस्थात स्वीकारल्या जाणाऱ्या ठेवींवरसुद्धा या कर्जरोख्यांचा परिणाम झाला आहे. एवढे कशाला, शेअरमधील गुंतवणुकीच्या उद्योगावरसुद्धा याचा परिणाम झाला आहे. गेल्या वर्षात आलेले अनेक शेअर 'इश्यु' यशस्वी ठरले. Ind–Suzuki, Hero–Honda यासारखे जपानी सहयोग असलेले मोटर उद्योग, ओर्केसारखा वेगाने वाढणारा किंबहुना दुसरा 'रिलायन टेक्सटाईल' उद्योग, जो पॉलिएस्टर चिप्स् बनवतो. टाटा प्रेस हा छपाईच्या उद्योगातील प्रतिथयश, बरोच–वेलकम सारखा बहुराष्ट्रीय उद्योग किंवा यासारखे अनेक उद्योगांनी देऊ केलेले शेअर लोकप्रिय ठरले. तरी पण दलालांशी बोलताना कर्जरोख्यांच्या 'शेअर' वरती झालेल्या परिणामाचा प्रत्यय आला. काही दलालांच्या मते १०० रुपये 'शेअर' मध्ये गुंतवणारा माणूस हल्ली ७५ रुपयेच त्यात गुंतवतो. काही उद्योगात मिळणारा डिव्हिडंड किंवा शेअरला येणारा भाव लक्षात घेता त्यातून होणारे उत्पन्न डिबेंचरच्या व्याजापेक्षा जास्त असू शकते. परंतु कर्जरोख्यांच्या सुरक्षिततेमुळे शेअरमध्ये गुंतवणूक करणारे व मुख्यत: नवीन इश्युमध्ये पैसे गुंतवणारे ग्राहक त्यांच्या भांडवलातले २५% पैसे कर्जरोख्यात गुंतवू लागले आहेत. पुण्यातील काही दलालांचे हे अनुभव कर्जरोख्यांची लोकप्रियता दर्शवत नाहीत का ? ◻

परवानगी दिली जाते. कनव्हरटिबल डिबेंचरची लोकप्रियता ही त्या उद्योगाच्या शेअरच्या बाजारातील किमतीवर अवलंबून असते. तर नॉन–कनव्हरटिबल शेअरची लोकप्रियता ही सुद्धा त्यांच्या शेअरच्या बाजारातील किमतीबरोबर उद्योगाच्या भारदस्तपणावर अवलंबून असते. ज्यांच्याकडे गंगाजळी दणकून आहे, अशा उद्योगसमूहांचे non–conv डिबेंचर इश्यु जोरात जातात. १० ते १२ टक्के व्याजाकरता सरकारी प्रभावाखालील संस्थांत पैसे ठेवण्यापेक्षा १५% व्याज देणारी व केव्हाही विकता येणारी non–conv डिबेंचर सर्टिफिकीटस् विकत घेणे फायद्याचे समजले जावू लागले आहे. म्हणूनच Acc, बजाज ऑटो, टेल्को, टिस्को या सारख्या मोठ्या उद्योगांचे वरील इश्यु अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वी ठरले. रिलायन टेक्सटाईलनी आपल्या पहिल्या चार मालिकेतील जो non–conv डिबेंचरचा भाग शिल्लक होता. त्या १०० रुपये किमतीच्या भागाला १.४ शेअर देऊ केले व त्याला सुद्धा प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यामुळे रिलायन टेक्सटाईल या उद्योगाला या मालिकांच्या रकमेच्या परत फेडीची चिंता नाही वा द्याव्या लागणाऱ्या व्याजाची. कधी कुपन्स तर कधी बाजारातला भाव तर कधी गंगाजळी या सारख्या गोष्टी ज्या लोकांना मोहवतात त्यांची यथायोग्य प्रसिद्धी आणि बँकांच्या आणि इतर वित्तीय संस्थांच्या मानानी लोकांना जास्त देऊ केलेले व्याज व त्याचबरोबर उद्योगांना वित्तीय संस्थांकडून घ्यावी लागणारी कर्ज, की जिच्यापेक्षा या प्रकारात जरा कमी व्याज द्यावे लागते आणि वित्तीय संस्थांचा जाचही कमी होतो या सर्व कारणांनी डिबेंचर इश्यु सध्या भारतीय उद्योगात फार मोठ्या प्रमाणात भांडवल आणत आहेत.

### उद्योग अधिक लोकाभिमुख

१९८२ साली निरनिराळ्या उद्योगांनी १३१ कोटी रुपयाचेEquity शेअर देऊ केले होते. त्यातील लोकांनी ९३ टक्के स्वीकारले. त्या वर्षी फक्त १६ कोटीचे डिबेंचर देऊ केले होते त्यातले १३ कोटीचे म्हणजे ८१% डिबेंचर लोकांनी स्वीकारले; परंतु तेव्हा डिबेंचरचे व्याज कमी होते, तेव्हा शेअर म्हणून गुंतवणूक करणे हा सर्वात लोकप्रियता पावलेला प्रकार आहे. नविन उद्योग असतील तर 'प्रमोटर्स' कोण आहेत, प्रॉडक्ट काय आहे, खप कसा असेल या गोष्टींकडे लोकांचे लक्ष असते व त्याची प्रसिद्धी करण्यात उद्योगाचे नियंत्रक कोणतीही कुचराई करत नाहीत. गरवारे नायलॉन्स्च्या ८१ पट जास्त Subscribe झालेल्या इश्युसारखे इश्यु जरी सध्या होत नसले तरी लॅक्मे इ–मर्क यासारखे ' over ' झालेले इश्यु सुद्धा होते. १० रुपये प्रिमियम घेतलेला लॅक्मे असो नाहीतर ३० रुपये प्रिमियम घेणारा ' बरोच वेलकम 'चा Equity शेअर इश्यु असो, लोकांनी त्यांना भरपूर प्रतिसाद दिला आहे.

भारतातील सर्वच उद्योग काही त्यांच्या भागधारकाना ' कोलगेट 'च्या भागधारकांना जेवढा डिव्हिडंट मिळतो तेवढा देऊ शकत नाहीत. परंतु साध्या चांगले उद्योग साधारणपणे १५ ते ३० टक्क्यांच्या दरम्यान डिव्हिडंट देतात. अर्थात असंख्य उद्योग डिव्हिडंट देत नाहीत ते सोडा; परंतु डिव्हिडंट, बोनस शेअर या सारखी गाजरं जोपर्यंत टांगली आहेत तोपर्यंत इक्विटी शेअर इश्युंना चांगले दिवस असणारच व उद्योगांना स्वतःचे भांडवल वाढण्यास तेच सर्वात उपयुक्त व फायदेशीर असणार आहेत.

उद्योगांना दिवसेंदिवस जास्त लोकाभिमुख व्हावे लागत आहे. नुसत्या मालाच्या विक्री बाबतच नव्हे तर भांडवल मिळवण्याकरता सुद्धा. त्यात ते सध्यातरी यशस्वी होत आहेत. लोक शहाणे बनत आहेत आणि त्याच बरोबर त्यांची भूकही वाढत आहे. त्यामुळे फायद्याची मलई फक्त नियंत्रकांकडे न जाता ती भागधारकांकडे आणि डिबेंचरधारकांकडे दिली जाणार. नाहीतरी शेवटी त्यांच्याकडून एकत्र केलेल्या पै-पैवर उद्योगाचा डोरा उभा राहतो ना ? ☐


अब्राहम लिंकन

फाळणी टाळणारा महापुरुष

• वि. ग. कानिटकर

भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.

सविस्तर योजनापत्रक मागवा.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# शर्यत



**मूळ लेखक : जेफ्री आर्चर**

**रूपांतर : विष्णू जयदेव**

**( ५ )**

सार्वत्रिक निवडणुका झाल्या. लेबर पार्टी सत्तेवर आली. कॅलहॅनने पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतली.
पंतप्रधानांच्या फोनची वाट पहात बसलेल्या अँड्रूला मात्र एका भयानक अपघाताला तोंड द्यावं लागलं. रॉबर्टचा अपघातात मृत्यू झाला, अँड्रू जबर जखमी झाला तर लुईसची त्या धक्याने वाचाच गेली.
सायमन एका वेगळयाच काळजीत होता. चार्ल्सने त्याच्या सेमूर बँकेतील नेदरकोट कंपनीचा अकाउंट बंद केल्याने नेदरकोट कंपनीचं दिवाळ निघण्याच्या बेतात होतं आणि त्याचबरोबर सायमनची राजकीय कारकिर्दही; पण अचानक मॉर्गन कंपनीने नेदरकोट कंपनीचे शेअर घेतल्याने तो थोडक्यात बचावला होता.
चार्ल्स आणि फिओना यांच्या संबंधांनी आता वेगळेच वळण घेतले होते. फिओनाला अलेक्झांडर डग्लसबरोबर त्याने संशयास्पदरीतीनं पकडलं होतं आणि आपले संबंध संपवण्यासाठी त्याने फिओनाला सात दिवसांची मुदत दिली होती. आता घटस्फोटाचे पडसाद राजकारणावर काय पडणार याच्या काळजीत असतानाच आमांदा या तरुण, नखरेल मॉडेलशी त्याची ओळख झाली.
इकडे रेमंडला मात्र एक सुखद धक्का बसला. पंतप्रधानांनी त्याला सेक्रेटरी फॉर ट्रेड हे पद देऊन प्रमोशन दिले होते. या काळात रेमंड आणि केटची मैत्री चांगलीच मुरली अँड्रूने क्लेअर नावाची एक मुलगी सांभाळण्यासाठी घेतली होती तर मार्गारेट थॅचरच्या कॉन्झर्व्हेटिव्ह मंत्रिमंडळात सायमनला नॉर्दन आयर्लंडच्या राज्यमंत्र्याचे लढाऊ पद मिळाले होते आणि त्याचा परिणाम म्हणून झालेल्या अपघातातून तो थोडक्यात बचावला होता.
त्यापुढे ???

□

चार्ल्सने फारसा गाजावाजा न करता रजिस्टर पद्धतीनं आमांदाशी लग्न केले. आमांदा आधीच चार महिन्याची गरोदर होती. फिओनानेही आता अलेक्झांडर डग्लसशी विवाह केला होता. डग्लस लिटील्हॉम्टन मतदार संघात कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीच्या निवड समितीचा अध्यक्ष होता. चार्ल्संच्या प्रयत्नामुळे या मतदार संघासाठी अलेक् पिमकीनची निवड झाली होती. पिमकीनने हाऊस ऑफ कॉमन्समध्ये तीस–पस्तीस वर्षे काढली असल्याने त्याला बऱ्याच सदस्यांची प्रकरणे ठाऊक होती. अशा प्रकारच्या गप्पांमध्ये पिमकीनला विशेष रस असे. त्यांनीच चार्ल्संच्या लग्नाची हकिगत डग्लसला वर्णन करून सांगितली.

‘चार्ल्संची आमांदाशी ओळख मी करून दिली; पण त्याने

लग्नाला आमांदाशिवाय कोणालाही निमंत्रण दिले नाही,' पिमकीन डग्लसला म्हणाला.

लग्न झाल्यावर हनिमूनसाठी चार्ल्स आणि आमांदा पॅरीसला गेले. चार्ल्सचा आठवडाभर राहाण्याचा विचार होता; पण दुसऱ्याच दिवशी हॅरॉल्ड ट्रिब्यूनमध्ये त्याने वाचले की, मार्गारेट थॅचर एक-दोन दिवसात मंत्रिमंडळाची पुनर्रचना करण्याची शक्यता आहे.

अर्थशास्त्रावरील चार्ल्सचे प्रभुत्व आतापर्यंत विरोधी पक्षाचे सभासदही मान्य करू लागले होते. बजेटमधील आर्थिक तरतुदीबद्दलची त्याची भाषणे अतिशय विद्वत्तापूर्ण होत असत. त्याच्यासारख्या बुद्धिमान माणसाला केवळ राजकीय कारणांसाठी मार्गारेट थॅचरनी मंत्रिमंडळापासून दूर ठेवले याची अधूनमधून कॉमन्सच्या लायब्ररीत किंवा स्मोकिंग रुममध्ये चर्चा होत असे.

इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेबद्दलच्या मार्गारेट थॅचर यांच्या विचारसरणीशी चार्ल्सची मते मिळतीजुळती होती. त्यामुळे मंत्रिमंडळाची पुनर्रचना करताना पंतप्रधान या खेपेस आपल्याला दूर ठेवणार नाहीत अशी त्याला आशा वाटत होती. बातमी वाचल्यावर चार्ल्स आमांदाला घेऊन ताबडतोब लंडनला परतला. आमांदाचा त्यामुळे फार हिरमोड झाला. दोन दिवस चार्ल्स फोनपाशी वाट पहात बसला. पंतप्रधानांनी त्याला फायनान्शिअल सेक्रेटरी म्हणून मंत्रिमंडळात घेतले.

याच पुनर्रचनेत सायमनची मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर नॉर्दन आयर्लंडवरून मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर डिफेन्स म्हणून नियुक्ती झाली. सायमनने ह्या बदलाचा विरोध करायचा प्रयत्न केला; पण पंतप्रधान म्हणाल्या की नॉर्दन आयर्लंडसाठी शक्य होते तेवढे सायमनने केले होते आता दुसऱ्या खात्यात त्याचा उपयोग करून घेण्याची त्यांची इच्छा होती. इलिझाबेथला मात्र ही बातमी ऐकून हायसे वाटले.

## पोलीस स्टेशनवर तक्रार

पक्षाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत चुकीच्या नेत्याला पाठिंबा दिल्यामुळे चार्ल्सला बराच काळ वनवास घडला होता. आता परत मंत्रिमंडळात वर्दी लागल्याने त्याच्यात चांगलाच उत्साह संचारला. मात्र मंत्रिमंडळात आल्याने त्याला सेमूर बँकेचा चेअरमन म्हणून काम करता येणे शक्य नव्हते. चार्ल्सने बँकेचा चीफ एक्झेक्यूटिव्ह क्लाईव्ह रेनॉल्डला भेटून सांगितले की चार्ल्स मंत्रिमंडळात असेपर्यंत क्लाईव्हने चेअरमनपद सांभाळावे. बँकेच्या संचालक मंडळाची ह्या व्यवस्थेला मान्यता होती. क्लाईव्हची निवड चार्ल्सने स्वतः केली असल्याने पूर्वीच्या चेअरमन स्पेन्सरप्रमाणे क्लाईव्ह आपल्याला धोका देणार नाही याची चार्ल्सला खात्री होती.

आमांदा विवाहापूर्वी गरोदर असल्याचे आपल्या मतदारसंघातील लोकांच्या डोळ्यावर येऊ नये म्हणून चार्ल्सने आमांदाला बाळंतपणासाठी जिनिव्हाला पाठवले. आमांदाला मुलाबाळांची हौस नसल्याने या खेपेसही तिने गर्भपाताचा मार्ग स्वीकारला असता; पण चार्ल्सच्या आग्रहाखातर मुलाला जन्म देण्याचे तिने मान्य केले.

चार्ल्सचा जुळा भाऊ रुपर्टला अजून मुलबाळ नव्हते. त्यामुळे आपल्याला मुलगा झाला तर घराण्याचे अर्लपद आणि वारसा हक्काने मिळणारी संपत्ती आपल्या मुलाकडे येईल याची चार्ल्सला कल्पना होती. यामुळे मुलाचा जन्म व्यवस्थित व्हावा यासाठी वाटेल तितका खर्च करायची चार्ल्सची तयारी होती.

अलेक् पिमकीन मात्र आमांदाला होणारे मूल चार्ल्सचेच असेल असे आपल्याला छातीठोकपणे सांगता यायचे नाही असे खाजगीत म्हणत असे.

आमांदाने तीन महिने जिनिव्हात काढले. मुलाचा जन्म झाल्यावर आठवडाभराने ती लंडनला परतली. चार्ल्सने मुलाच्या स्वागताची जय्यत तयारी करून ठेवली होती. त्याचे नावही त्याने ठरवले होते— हेन्री. आमांदाला आणि मुलाला घेण्यासाठी विमानतळावर जाण्याची त्याची इच्छा होती; पण नेमके त्याच दिवशी जपानहून आलेल्या व्यापारविषयक शिष्टमंडळाशी त्याची भेट ठरली असल्याने त्याला संध्याकाळपर्यंत मोकळा वेळ मिळाला नाही. काम उरकल्याबरोबर तो थेट घरी आला. आमांदा मुलाला दाईच्या ताब्यात देऊन झोपली होती.

चार्ल्स थेट मुलाच्या खोलीत गेला. हेन्रीच्या जन्माआधी एक महिना चार्ल्सने त्याची खोली तयार ठेवली होती. हेन्री चार्ल्ससारखा किंवा आमांदासारखाही दिसत नव्हता. त्याचे केस कुरळे होते आणि डोळे तपकीरी. हेन्रीला पाहून चार्ल्सला त्याच्या पणजोबांच्या फोटोची आठवण झाली. त्यांचे केस असेच कुरळे होते अन् डोळे तपकीरी. चार्ल्सने पणजोबांचा फोटो दाखवल्यावर आमांदालाही हायसे वाटले.

मुलगा झाल्याने चार्ल्सचे सगळे लक्ष आता हेन्रीवर केंद्रित झाले. आमांदाविषयीचे त्याचे आकर्षण हळूहळू कमी होऊ लागले. चार्ल्स ज्या लोकात वावरत असे त्या लोकांत आमांदासारख्या थिल्लर मुलीचा निभाव लागणे कठीण होते. अशा लोकांत तिचा केवळ सौंदर्यावर टिकाव लागला नसता. चार्ल्सच्या कॉन्झर्व्हेटिव्ह विचारसरणीला पत्नीने मॉडेलिंग केलेले रूचले नसते. आमांदाच्या मूर्खपणामुळे आपले हसे होऊ नये म्हणून चार्ल्स तिला कोणत्याही महत्त्वाच्या पार्टीला घेऊन जात नसे. फिओनाला वागण्याचा जो पोच होता, राजकारणाची जाण होती, तशी आमांदाला नव्हती. त्यातच चार्ल्सला तिच्या नवीन गुणांची ओळख झाली.

हेन्रीचा दुसरा वाढदिवस होता. त्या दिवशी चार्ल्स हाऊस ऑफ कॉमन्समध्ये न जाता घरीच थांबला. हेन्रीच्या दाईने आसपासच्या बऱ्याच मुलांना वाढदिवसाला घरी बोलावले होते. त्याच दिवशी चार्ल्सच्या ध्यानात आले की, त्याने दोन दिवसापूर्वी पाहिलेला त्याच्या पणजोबांचा सोन्याचा अॅश ट्रे घरातून नाहीसा झाला होता. चार्ल्सने सगळीकडे शोधाशोध करून पाहिली; पण अॅश ट्रेचा पत्ता नव्हता. त्याने आमांदाला विचारले पण हेन्रीच्या वाढदिवसात ती इतकी गुंतल्यासारखी दिसली की, तिला उत्तर द्यायला वेळच मिळाला नाही.

चार्ल्सने पोलीस स्टेशनवर तक्रार नोंदवली. त्याला घरातल्या दाईचा संशय येत होता. मंत्र्याच्या घरी चोरी झाली असल्याने तपासाची चक्रे वेगाने फिरली. चौथ्या दिवशी पोलीस अधिकारी चार्ल्सच्या घरी आला. त्याने चार्ल्सला सांगितले की, सी. जी. एस. अद्याक्षरे असलेला सोन्याचा अॅश ट्रे त्यांना एका पुरातन वस्तू विकत घेणाऱ्या दुकानात दिसला होता; पण दुकानदाराकडे अॅश ट्रे विकत घेतल्याची पावती होती. पोलिस अधिकाऱ्याने दुकानदाराकडून घेतलेली पावती



चार्ल्स : आमांदाच्या वागण्याने हतबुद्ध !

चार्ल्सला दाखवली. आमांदाने अॅश ट्रे पंचवीसशे पौंडांना विकला होता.

चार्ल्सने पोलीस अधिकाऱ्याचे आभार मानले आणि केसचा पुढे तपास होऊ नये अशी आपली इच्छा असल्याचे सांगितले.

चार्ल्सने दुसऱ्या दिवशी सकाळीच दुकानाला भेट दिली. दुकानाचा म्हातारा मालक स्वभावाने प्रेमळ होता. आमांदा सेमूरबद्दल त्याचे मत चांगले होते. गेल्या दीडवर्षात तिने सात–आठ मौल्यवान चीजा त्याला विकत दिल्या होत्या.

एवढ्या पैशाचे आमांदाने काय केले ह्याची चार्ल्सला कल्पनाच करवेना. एरवीही तो तिला दरमहा खर्चासाठी वेगळे पैसे देत असे.

दुकानावरून चार्ल्स सरळ घरी परतला आमांदाची अजून झोप पुरी व्हायची होती. बायकोवर हात उगारण्याचा चार्ल्सचा हा पहिला अनुभव.

'आता ह्या पुढे एक वस्तूही घराबाहेर गेलेली आढळली तर त्याबरोबर तुलाही बाहेर जावे लागेल. वेळ पडली तर तुला तुरुंगात पाठवायलाही मी कमी करणार नाही.' चार्ल्सने तिला दम भरला. आमांदाचा अशा प्रकारे अपमान कुणीच कधी केला नव्हता. रडत ओरडत पाय आपटत ती खोलीतून बाहेर निघून गेली.

ह्या प्रसंगानंतर चार्ल्सचे आणि आमांदाचे संभाषण जवळजवळ तुटलेच. घरी असल्यावर चार्ल्सचा सगळा वेळ हेन्रीबरोबरच जायचा. कित्येकदा दोन दोन दिवस आमांदा घरी फिरकत नसे. ती कुठे आणि कोणाकडे असते ह्याची चार्ल्सने कधी चौकशी केली नाही.

आमांदाला घटस्फोट देण्याची त्याची इच्छा नव्हती. एका घटस्फोटातून तो जेमतेम सावरला होता. दोन अडीच वर्षांत दुसरा घटस्फोट घेतला असता तर त्याच्या राजकीय भवितव्यावर त्याचा विपरीत परिणाम झाला असता.

ऑक्टोबर १९८० मध्ये जेम्स कॅल्हॅन यांनी लेबर पार्टीच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. त्याच्या वयाची पासष्ठी उलटून गेल्याने त्यांनी आता अध्यक्षपदावरून निवृत्त व्हावे असा पक्षाच्या सेंट्रल एक्झेक्युटिव्हचा सल्ला होता. यानंतर झालेल्या अध्यक्षापदाच्या निवडणुकीत अतिडाव्या गटाच्या मायकेल फूट यांनी पक्षातील मवाळ गटाचे नेते डेनिस हॅले यांचा १३९ विरूद्ध १२९ मतांनी पराभव केला.

मायकेल फूट कॅल्हॅन यांच्यापेक्षा एक दोन वर्षांनीच लहान असल्याने अध्यक्षपद त्यांच्या हातात फार काळ राहायचे नाही हे उघड होते. त्यामुळे रेमंडने मायकेल फूट यांच्या शॅडो कॅबिनेट मध्ये शॅडो मिनिस्टर ऑफ ट्रेड म्हणून काम करण्याचे मान्य केले.

अँड्र्यूने मात्र शॅडो कॅबिनेटमध्ये पद मिळविण्याचा प्रयत्न केला नाही. व्यक्ती म्हणून त्याला मायकेल फूट प्रिय असले तरी दोघांचे राजकीय विचार जुळणारे नव्हते. इइसीबाबत मायकेल फूट यांनी घेतलेल्या भूमिकेशी अँड्र्यू सहमत नव्हता. पक्षातील अतिडाव्या गटापासून अँड्र्यू दिवसेन्दिवस अधिकाधिक दूर जात होता. स्कॉटलंड वरील प्रश्नांचा विचार करण्यासाठी जी सिलेक्ट कमिटी नेमली होती तिचे अध्यक्षपद अँड्र्यूने स्वीकारले.

ह्या मधल्या काळात त्याच्या एडिंबरो कार्लटन मतदार संघात पक्षाच्या निवड समितीचे अध्यक्ष हमिश रॅमसे अध्यक्षपदावरून निवृत्त झाले होते. रॅमसेच्या जागी समितीचे उपाध्यक्ष डेव्हिड कनॉट ह्यांची निवड व्हावी यासाठी अँड्र्यूने प्रयत्न केले पण त्याला अपयश आले. कनॉट यांना पाठींबा देणारा एक सदस्य मतदानाचे वेळी गैरहजर राहिल्याने समितीच्या अध्यक्षपदी फ्रॅंक बॉईल निवडून आला. अँड्र्यूच्या मतदार संघातील निवड समितीवर अतिडाव्या गटाचे (फ्रॅंक बॉईल आणि त्याचे पाठीराखे आपल्या गटाला मिलिटंट टेंडसी असे म्हणत) वर्चस्व प्रस्थापित झाल्याने पुढच्या निवडणुकीत एडिंबरो कार्लटनमधून अँड्र्यूला लेबर पार्टीचे तिकीट मिळणे कठीण होते. एडिंबरो कार्लटन मतदार संघातून गेल्या अठरा वर्षांत अँड्र्यूने सहा वेळा लेबर पार्टीच्या तिकिटावर निवडणूक जिंकली होती. मतदारांमध्ये अँड्र्यूची लोकप्रियता कायम असली तरी आता पक्षाच्या निवड समितीमध्ये त्याच्या उमेदवारीला विरोध होता.

याच सुमारास लेबर पार्टीचे भूतपूर्व उपाध्यक्ष रॉय जेनकिन्स यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देऊन नवा पक्ष काढण्याची घोषणा दिली. जेन्किन्स नुकतेच ब्रुसेल्सहून परतले होते. ब्रुसेल्सला त्यांची युरोपियन कमिशनचे अध्यक्ष म्हणून दोन वर्षांकरता नेमणूक झाली होती. तो काळ आता संपला होता. पक्षामध्ये अतिडाव्या गटाच्या वाढत चाललेल्या प्रभावाला जेन्किन्स यांचाही विरोध होता.

लेबर पार्टीतील मवाळ गटाच्या साहाय्याने रॉय जेन्किन्सनी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी (एस्. डी. पी.) स्थापन केली. महिना भरातच लेबर पार्टीचे वीस आणि कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा एक खासदार सोशल डेमोक्रॅटिक पार्टीला येऊन मिळाले.

रेमंडचा पक्षातील अतिडाव्या गटाला विरोध होता पण त्यासाठी पक्ष सोडायची त्याची इच्छा नव्हती. ब्लॅकपूलच्या परिषदेतील अँड्र्यूच्या शब्दांची त्याला आठवण झाली.

'ह्या अतिडाव्या गटाचा प्रभाव जर पक्षाच्या संसदीय विंगवर वाढत राहिला तर एक दिवस पक्षात फूट पडल्याशिवाय रहायची नाही.'

रॉय जेन्किन्सनी अँड्र्यूला फोन करून पक्षात येण्याची विनंती केली. अँड्र्यू गेली वीस वर्षे लेबर पार्टीचा सदस्य होता. त्याला पक्ष सोडण्याची इच्छा नव्हती; पण फ्रँक बॉईलच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या निवड समितीच्या सभेत समितीने पुढच्या निवडणुकीसाठी अँड्र्यूला पक्षाचे तिकीट द्यायचे नाकारले. एडिंबरो कार्लेटनमधून पक्षाचा उमेदवार म्हणून समितीने फ्रँक बॉईलचे नाव घोषित केले.

समितीने तिकीट नाकारले तर आपण अपक्ष म्हणून निवडणूक लढवू असे अँड्र्यूने निवडसमितीला स्पष्ट सांगितले होते. फ्रँक बॉईलने कांगावा केला की अँड्र्यूला फक्त तिकीटात इंटरेस्ट आहे पक्षात नाही. एडिंबरोतील स्कॉट्स्मन ह्या स्थानिक वृत्तपत्रानेही दुसऱ्या दिवशी निवडसमितीच्या मनमानी कारभारावर टीका केली.

अँड्र्यूच्या पाठीराख्यांनी अँड्र्यूला पक्षाच्या जनरल मॅनेजमेंट कमिटीकडे आणि नॅशनल एक्झेक्युटिव्हकडे निवड समितीच्या निर्णयाविरुद्ध दाद मागायला सांगितली; पण अँड्र्यूने तो विचार रद्द केला!

चार दिवस त्याने लुईसशी आणि अनेक मित्रांशी चर्चा केली. लुईसने तर त्याला सांगितले की त्याने काही निर्णय घेतला तरी ती मात्र पुढच्या निवडणुकीत जेन्किन्सच्या सोशल डेमोक्रॅटिक पार्टीलाच मत देणार होती. पाचव्या दिवशी अँड्र्यूने पक्षाच्या व्हिपला भेटून पक्ष सदस्यत्वाचा राजिनामा दिला. एडिंबरो कार्लेटनमधून पुढची निवडणूक त्याने सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या तिकिटावर लढवायचे ठरविले.

वीस वर्षे ज्या पक्षात काढली तो पक्ष सोडण्याचा निर्णय अँड्र्यूने सहजासहजी घेतला नाही. आपल्याकडे कपडे बदलावे इतक्या सहजपणे आमदार-खासदार पक्ष बदलतात. इतर देशात मतदारांपुढे सभासदांना जाब द्यावा लागतो. आपली पक्ष बदल करण्यामागची कारणे एडिंबरो कार्लेटनमधील मतदाराना समजावून सांगण्याचे अँड्र्यूने ठरवले.

## अँड्र्यू विरुद्ध बॉईल

एकोणिसशे ब्याऐंशीच्या एप्रिल महिन्यात अर्जेंटिनाने ब्रिटनच्या अधिपत्याखाली असलेल्या फॉकलंड बेटावर हल्ला करून बेट ताब्यात घेतले. गेली शंभर वर्षे ब्रिटनचा युनिअन जॅक फॉकलंड बेटावर फडकत होता. अर्जेंटिनाने सैन्याच्या बळावर युनियन जॅक खाली उतरवला.

शुक्रवारी सभागृह संपल्यावर मतदारसंघात परतण्याऐवजी सभासद फॉकलंडच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी शनिवारी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये जमले. साऱ्या जगाचे लक्ष मार्गारेट थॅचर अर्जेंटिनाच्या ताब्यातून फॉकलंड बेट कसे सोडवणार ह्याकडे लागले.

मार्गारेट थॅचरला ब्रिटनची 'आयर्न लेडी' म्हटले जाते. त्यांची कृती नावाला साजेशीच होती. त्यांनी ताबडतोब सैन्य पाठवून बेटावर अडकलेल्या अठराशे ब्रिटिश नागरिकांची मुक्तता केली. युनिअन जॅक पुन्हा एकदा फॉकलंड बेटावर मानाने फडकू लागला.

फॉकलंड युद्धाच्या काळात सायमन दिवसाचे अठरा ते वीस तास डिफेन्स डिपार्टमेंटच्या कामात व्यग्र असायचा. तो घरी परतेपर्यंत एलिझाबेथची अर्धी झोप झालेली असायची आणि तिला जाग येण्याच्या आत तो कार्यालयात कामाला लागलेला असे.

याच काळात फायनान्शियल सेक्रेटरी म्हणून अंदाजपत्रक तयार करण्यात चार्ल्स सायमन इतकाच झटून काम करीत होता. आमांदाशी त्याची एरवीही भेट होत नसे; पण त्या काळात हेन्रीकडेही लक्ष द्यायला त्याला वेळ मिळाला नाही. हेन्री सतत दाईकडेच असे. फॉकलंडचे युद्ध ब्रिटनने जिंकले आणि लगेच दोनच दिवसात कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीने मांडलेले अंदाजपत्रकही सभागृहात पास झाले.

फॉकलंड युद्धातील विजयामुळे मार्गारेट थॅचर यांची लोकप्रियता अधिकच वाढली. एकोणिसशे ब्याऐंशीच्या ऑक्टोबरमध्ये ब्रिटिश पार्लमेंटचे नवे अधिवेशन सुरू झाले तेव्हा वृत्तपत्रांमध्ये मार्गारेट थॅचर नोव्हेंबरमध्ये निवडणुका घेतील की जूनमध्ये ह्याबद्दलच चर्चा सुरू झाली होती.

नवे वर्ष ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेला आशादायी ठरले. एक स्कॉटलंड सोडले तर देशातील इतर ठिकाणची बेकारांची संख्या कमी झाली होती. स्कॉटलंटमध्ये मात्र बेकारी १५ टक्क्यावर पोहोचली होती. थॅचर यांच्या आर्थिक धोरणामुळे चलन फुगवटा चार टक्क्यावर आला होता. पक्षाच्या या यशात चार्ल्सचामोठा वाटा होता.

देशभर जनमत कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीला अनुकूल असल्याने मार्गारेट थॅचर आता निवडणूक घेतील हे जवळजवळ निश्चित झाले होते. एकोणिसशे त्र्याऐंशीच्या मे महिन्यात पंतप्रधान राणीला भेटल्या आणि सार्वत्रिक निवडणुकांची तारीख ठरली— ९ जून १९८३.

नव्याने स्थापन झालेल्या सोशल डेमोक्रॅटिक पार्टी (एस. डी. पी.) ची पहिली निवडणूक बरखास्त झालेल्या सभागृहात एस. डी. पी. आणि लिबरल पार्टी ह्या दोघांचे मिळून चाळीस सभासद होते. नव्या निवडणुकांत जर ह्या दोन्ही पक्षांच्या युतीला लोकांचा पाठिंबा मिळाला तर सत्ता काबीज करताना कॉन्झर्व्हेटिव्ह किंवा लेबर ह्या दोन्ही प्रमुख पक्षांना सभागृहात एस. डी. पी. आणि लिबरलपार्टीचा पाठिंबा मिळवावा लागेल असा राजकीय निरीक्षकांचा अंदाज होता.

रॉय जेन्किन्सच्या शॅडो कॅबिनेटमध्ये अँड्र्यू शॅडो मिनिस्टर ऑफ डिफेन्स होता. कॉन्झर्व्हेटिव्ह आणि लेबर ह्या दोन बड्या पक्षांपुढे आपल्या नव्या पक्षाचा टिकाव लागण्यासाठी त्याला मान मोडून काम करावे लागत होते; पण खरी परीक्षा तर निवडणुकीत होती.

एडिंबरो कार्लेटनमधून फ्रँक बॉईल लेबरपार्टीच्या तिकिटावर निवडणूक लढवत होता. अँड्र्यू सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचा उमेदवार होता. एडिंबरो कार्लेटनच्या लेबर पार्टीच्या निवड समितीचे अध्यक्ष हमिश रॅमसे राजकारणातून निवृत्त झाले असले तरी अँड्र्यूने त्यांची घरी भेट घेऊन त्यांना आपल्या प्रचार यंत्रणेचे प्रमुख होण्याची गळ घातली.

अँड्र्यूच्या कारकिर्दीत एडिंबरो कार्लेटन हा मतदारसंघ लेबरपार्टीचा बालेकिल्ला बनला होता. आता खरी लढत लेबरपार्टीचा अधिकृत उमेदवार फ्रँक बॉईल आणि पक्षातून राजिनामा देऊन ए. डी. पी. च्या तिकिटावर उभा राहिलेल्या अँड्र्यू फ्रासर ह्यांच्यातच होती.

कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीने उभा केलेला जीनी जीमी लोमॉक्स हा उमेदवार जिंकणार नाही याची कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे मतदारसंघातल्या निवड समितीचे अध्यक्ष सर डंकन फ्रासर यांनाही खात्री होती. डंकन फ्रासरनी अँड्र्यूला तसे खाजगीत बोलूनही दाखवले होते. मात्र ही निवडणूक जर अँड्र्यू हरला तर त्याच्या राजकीय कार-

किर्दीची इतिश्री झाल्यात जमा आहे असे डंकन फ्रासरनी अँड्रयूला स्पष्टच सांगितले होते.

एस. डी. पीचा प्रचार करण्यासाठी लुईस आणि क्लेअर हट्टाने लंडनहून एडिंबरो कार्लेटनला आले. अगदी अपेक्षा नसलेल्या लोकांकडूनही अँड्रयूला पाठिंबा मिळत होता. गेल्या दोन निवडणुकीत अँड्रयू विरुद्ध उभा रहाणाऱ्या स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या ज्यो मॅकपर्सनने जाहीर केले की ह्या निवडणुकीत स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टी अँड्रयू विरुद्ध उमेदवार उभा करणार नाही. स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीचा लेबर पार्टीतील अतिडाव्या गटाला विरोध होता. त्यामुळे अँड्रयूच्या मतांत विभागणी करून फ्रँक बॉईलला विजय मिळवून देण्याची ज्यो मॅकपर्सनची इच्छा नव्हती.

अँड्रयूने मतदारांना भेटण्यासाठी पदयात्रा काढण्यास सुरुवात केली तेव्हा त्याच्या लक्षात आले की त्याने दिलेल्या लेबरपार्टीच्या राजिनाम्याबद्दल अजूनही मतदारांमध्ये गैरसमज होते. मतदारसंघातल्या लेबर पार्टीच्या खंद्या पाठीराख्यांना अँन्ड्रयूने पक्षाशी बेईमानी केली असेच वाटत होते. त्यामुळे सुरवातीस 'स्कॉटस्मनने' घेतलेल्या ओपिनिअन पोलमध्ये फ्रँक बॉईल अँड्रयूच्या बराच पुढे होता.

फ्रँक बॉईलला लेबर पार्टीच्या पक्ष यंत्रणेची मदत होती. इलेक्शन फंड मुबलक होता. अँड्रयूला या खेपेस हे फायदे मिळणार नव्हते.

फ्रँक बॉईलने अँड्रयू विरुद्ध पत्रक काढून त्याला पक्षातून 'कसे हाकलून लावण्यात आले' ह्या विषयी खोटीनाटी कारणे दिली. क्लेअर ही अँड्रयूची दत्तक मुलगी नसून लुईसला निग्रो माणसाकडून झालेली मुलगी आहे अशी अफवाही फ्रँक बॉइलने पसरवायला सुरुवात केली. अँड्रयूला हे जेव्हा समजले तेव्हा संतापून फ्रँक बॉईलवर खटला भरावयाचा त्याने विचार केला; पण त्याचे वडील सर डंकन फ्रासर म्हणाले की खटल्याच्या प्रसिद्धीमुळे लुईस–क्लेअरवर विपरीत परिणाम होईल म्हणून तो गप्प बसला.

## अँड्रयू–धक्काच बसला

अँड्रयूबद्दल ज्यो मॅकपर्सनने गेल्या निवडणुकांत शिवराळ पत्रके काढली होती. आता त्यानेच पत्रक काढून स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या सगळ्या पाठीराख्यांना अँड्रयूला मत देण्यासाठी आवाहन केले. अँड्रयूने फोन करून त्यांचे आभार मानले तेव्हा तो म्हणाला की मागच्या निवडणुकीत त्याने अँड्रयूविरुद्ध इतका प्रचार करूनही अँड्रयूने याच स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीने आपल्याला पक्षाचे अध्यक्ष व्हायची विनंती केली होती अशी बातमी वृत्तपत्रांमध्ये जाहीर केली नव्हती. ह्या उपकाराचे त्याला विस्मरण झाले नव्हते. अँड्रयूने तसे जाहीर केले असते तर स्कॉटिश नॅशनॅलिस्ट पार्टीची निवडणुकीत फारच अवघड स्थिती झाली असती.

निवडणुकीचा एक दिवस आधी अँड्रयूने पत्रक काढून आपण लेबर पार्टी का सोडली ह्याचे स्पष्टीकरण दिले. याच पत्रकात त्याने महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांवर सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची भूमिका स्पष्ट केली. पत्रके घरोघरी वाटण्यास लुईस आणि क्लेअरनंसुद्धा मदतकेली.

निवडणुकीच्या आदल्या दिवशी रात्री रॅमसेने फ्रँक बॉईलने काढलेले एक पत्रक अँड्रयूला आणून दाखवले. त्यात अँड्रयूचा क्लेअरला कडेवर घेतलेला फोटो होता. फोटो खाली 'तुमचे खासदार तुम्हाला संपूर्ण सत्य सांगत आहेत काय ?' असे कॅप्शन होते. संपूर्ण पत्रकात लुईस आणि क्लेअरचा उल्लेखही नव्हता. सकाळपासून मतदान सुरू होणार होते. त्यामुळे आता काहीच करणे शक्य होणार नव्हते.

निवडणुकीच्या दिवशी अँड्रयू आणि लुईसने सकाळी ६ पासूनच कामाला सुरुवात केली. फ्रँक बॉईलकडे जितके मनुष्यबळ होते तितके अँड्रयूपाशी नव्हते; पण गेल्या अठरा वर्षांत त्याने मतदारसंघात बरेच कार्यकर्ते जोडून ठेवले होते. त्यातले बरेचसे अँड्रयूने पक्ष सोडला तरी त्याच्यासाठी काम करायला तयार होते.

गंमत म्हणजे मतदान संपायच्या वेळेस संध्याकाळी अँड्रयूने सर डंकन फ्रासरना त्यांच्या गाडीतून सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या मतदारांना मतदान केंद्राकडे घेऊन जाताना पाहिले. अँड्रयूला पाहिल्यावर गाडी थांबवून ते म्हणाले,

'नाही तरी आमचा जीमी जिंकणार नाही हे स्पष्टच झाले आहे. तेव्हा निदान लेबर पार्टीचा तरी पराभव झाला पाहिजे यासाठी माझे प्रयत्न चालले आहेत.'

संध्याकाळी सातला थकून अँड्रयू आणि लुईस मतदान केंद्राच्या पायरीवर बसले. त्यांना ठाऊक होते आता काही करण्यासारखे उरले नव्हते.

रात्री साडे नऊला हमिश रॅमसे आणि इतर पाठीराख्यांना घेऊन अँड्रयू लुईसबरोबर सिटी हॉलमध्ये आला. मत मोजणीला सुरुवात झाली होती. लुईसबरोबर क्लेअरही हट्टाने आली.

फ्रँक बॉईल आधीच सिटी हॉलमध्ये येऊन पोहोचला होता. पहिल्या राऊंडमध्ये बॉईल तीन हजार मतांनी आघाडीवर होता. पूर्वीच्या अनुभवाने अँड्रयूला ठाऊक होते की मतदार संघातील आतले वॉर्डस् खंद्या समाजवाद्यांचे होते. लेबर पार्टीने दगडाला उभे केले असते तरी त्यांनी मत दिले असते. मतदार संघातले फ्लोटिंग व्होट जर आपल्याला मिळाले तर ह्या लीड आपण कमी करू शकू अशी आशा त्याला वाटत होती.

तिसऱ्या राऊंडपर्यंत बॉईलच्या चेहऱ्यावरचे हास्य हळूहळू मावळले आणि त्याचा चेहरा चिंताग्रस्त दिसू लागला. सकाळी एक वाजून बावीस मिनिटांनी शेरीफने तीनही उमेदवारांना बोलावले आणि निकाल जाहीर केला. बॉईलच्या चेहऱ्यावर हास्य झळकले. अँड्रयूने ताबडतोब फेर मोजणीची मागणी केली.

तासाभरातच फेर मोजणी संपली तेव्हा अँड्रयूची ९० मते चुकून बॉईलच्या गठ्ठ्यात गेल्याचे आढळले. शेरीफने तीनही उमेदवारांना बोलावून निकाल जाहीर केला. या खेपेस बॉईलने फेरमोजणीची मागणी केली.

कॉन्झर्व्हेटिव्ह उमेदवार जीमी लोमॉक्स एव्हाना खुर्चीत बसल्या बसल्या झोपी गेला होता. अजून पाच वेळा फेर मोजणी केली तरी आपण जिंकण्याची शक्यता नाही याची त्याला खात्री पटली होती.

एकूण ४२,५८८ मते पुन्हा तिसऱ्यांदा मोजण्यात आली आणि आधीच्या मोजणीत पाच चुका झाल्याचे लक्षात आले. सकाळी तीन वीसला मतमोजणी संपली आणि शेरीफने अँड्रयू आणि फ्रँक बॉईलना एकत्र बोलावले. शेरीफ म्हणाले की मोजणी करणाऱ्या स्टाफने तीन चार तास विश्रांती घेतल्यावर सकाळी सहाला पुन्हा नव्याने मोजणी करावी लागेल. अँड्रयू आणि बॉईल दोघांनाही धक्का बसला. निकाल अशाप्रकारे होता.

| | |
|---|---|
| फ्रँक बॉईल | १८,४३७ |
| जीमी लोमॉक्स | १५,७१४ |
| अँड्रयू फ्रासर | १८,४३७ |

अँड्रयू आणि बॉईल या दोघांनाही सारखीच मते पडली होती.

आतापर्यंत देशभरातल्या सान्या मतदारसंघातले निकाल लागले होते. मार्गारेट थॅचर यांच्या नेतृत्वाखाली कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा प्रचंड विजय झाला होता. नव्या सभागृहात कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचे १४४ सदस्यांचे बहुमत रहाणार होते.

अँड्रयूला झोप अशी लागलीच नाही. जराशी डुलकी आली तरी अचानक दचकून जाग यायची. सकाळी लुईसबरोबर तो सीटी हॉलवर परतला. अँड्रयू आणि बॉईलला सारखीच मते पडल्याची बातमी सगळीकडे पसरली होती. सीटी हॉलबाहेर प्रचंड गर्दी जमली होती. बीबीसी, इंडिपेडेंट टेलीव्हीजन (आय्. टी. व्ही.) आणि इतर टेलीव्हीजन कंपन्यांचे कॅमेरामन, पत्रकार उमेदवारांची वाट पहात उभे होते.

पुन्हा एकदा मतमोजणीला सुरुवात झाली. मोजणी चालू असताना शेरीफनी अँड्रयू आणि बॉईलला अशा परिस्थितीत निवड करण्याच्या पद्धतीबद्दल माहिती दिली. सकाळीच त्यांनी चीफ इलेक्शन कमिशनर लॉर्ड वेलींशी चर्चा केली होती. त्यांनी शेरीफना 'रेप्रेझेंटेशन ऑफ द पीपल, ॲक्ट १९४९' मधून नियम ५० वाचून दाखवला. ह्या नियमानुसार दोन उमेदवारांना सारखीच मते पडली तर विजयी उमेदवाराची निवड चिठ्ठ्या टाकून किंवा नाणेफेकीने करण्यात येते. तासाभरात मतमोजणी संपली. दोघाही उमेदवारांची मते सारखीच होती. –१८,४३७.

अँड्रयू आणि बॉईलबरोबर शेरीफ व्यासपीठावर आले. सभागृहात मुंगी शिरायलाही जागा शिल्लक नव्हती. शेरीफ माईकशी उभे राहिले आणि सभागृहात एकदम शांतता पसरली. संपूर्ण देशाचे लक्ष ह्या निकालावर केंद्रित झाले होते. बीबीसीने हा सगळा सोहळा लाइव्ह टेलिकास्ट करण्याचे ठरवले होते.

शेरीफनी आपल्या सात मिनिटांच्या भाषणात विजयी उमेदवाराची निवड करण्याची पद्धती लोकांना समजावून सांगितली ह्या क्षणी सारा देश आपल्याला पडद्यावर पाहात आहे याची त्यांना कल्पना होती.

नाणेफेकीसाठी शेरीफनी रॉयल बँक ऑफ स्कॉटलंडकडून सॉव्हरीन हे सोन्याचे नाणे घेतले होते. नाण्याच्या एका बाजूला तिसऱ्या जॉर्जचे चित्र होते आणि दुसऱ्या बाजूला ब्रिटानिया. भारतमाता हे जसे भारत देशाचे मानवीकरण ( Personification ) आहे तसे ब्रिटानिया हे ब्रिटनचे मानवीकरण आहे.

शेरीफनी नाणे बॉईल आणि अँड्रयू दोघांनाही तपासणीसाठी दिले. दोघांनीही नाणे पाहून परत दिल्यावर शेरीफनी ते तळहातावर ठेवले. अँड्रयू अजूनही खासदार असल्याने त्याने कौल मागावा असे ठरले.

शेरीफनी नाणे हवेत उंच उडवले तेव्हा अँड्रयूला त्याच्या हृदयाची धडधड अगदी स्पष्ट ऐकू येत होती. नाणे हवेत असतानाच अँड्रयूने कौल मागितला. 'टेल' नाणे खण्कन जमिनीवर आपटून घरंगळत व्यासपीठाच्या एका बाजूस गेले. अँड्रयूने उभा असलेल्या जागेवरूनच ब्रिटानियाची आकृती पाहिली आणि सुटकेचा निश्वास टाकला.



अँड्रयू–नाणेफेकीत विजयी !

¤

'अँड्रयू फ्रासर यांची एडिंबरो कार्टनमधून खासदार म्हणून निवड झाल्याचे मी जाहीर करतो.' शेरीफ म्हणाले. त्यांचे पुढचे शब्द गोंधळात कुणालाच ऐकू गेले नाहीत.

अँड्रयूच्या पाठीराख्यांनी त्याला डोक्यावर घेऊन नाचत घरापर्यंत आणले. क्लेअरची हसता हसता पुरेवाट झाली. एव्हढ्या गर्दीत तिला आणि लुईसला अँड्रयूपर्यंत पोहोचणेही शक्य झाले नाही.

दुसऱ्या दिवशी स्कॉटस्मनच्या संपादकाने अँड्रयूला त्याने 'टेल' म्हणूनच का कौल मागितला असे विचारले तेव्हा अँड्रयू म्हणाला,

'तिसऱ्या जॉर्जमुळे अमेरिका इंग्लंडच्या हातून गेले. मी जर हेड म्हटले असते तर आज एडिंबरोही माझ्या हातून गेले असते.'

रॉयल बँक ऑफ स्कॉटलंडने ते सोन्याचे नाणे अँड्रयूला भेट म्हणून दिले.

अँड्रयूचा विजय जरी देशभर गाजला तरी सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे फक्त सहा सदस्य हाऊस ऑफ कॉमन्समध्ये निवडून आले होते.

अँड्रयूच्या विजयाने रेमंडलाही आनंद झाला अँड्रयूला पक्ष सोडणे भाग पडले याचे त्याला फार वाईट वाटले होते. फ्रँक बॉईलसारखे लोक आपल्या मतदार संघातल्या समितीवर नाहीत याचे त्याला समाधान होते. याचे सगळे श्रेय खरे पाहता जॉईसला होते.

मार्गारेट थॅचरच्या प्रचंड विजयामुळे मात्र रेमंड पार खचला होता. लेबर पार्टीत फूट पडल्यामुळेच तिचा एवढा मोठा पराभव झाला होता. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे फक्त सहा सभासद निवडून आले तरी लेबर पार्टीपेक्षा त्यांना फक्त दोन टक्के मते कमी पडली होती.

रेमंडने पुन्हा प्रॅक्टिस सुरू केली होती. ब्रिटनमधल्या पाच उत्तम वकिलात त्याचे नाव घेतले जात होते. ॲटर्नी जनरल मायकेल हावर्सनी त्याला हायकोर्ट जज्जचे पद देऊ केले होते. याच पक्षाबरोबर त्याचा हाऊस ऑफ लॉर्डस् मध्येही प्रवेश घेणार होता. (आपल्याकडे जशी राज्यसभा त्याप्रमाणे ब्रिटनमध्ये हाऊस ऑफ लॉर्डस् असते. राज्यसभेची रचना आणि हाऊस ऑफ लॉर्डस्ची रचना ह्यामध्ये मात्र बराच फरक आहे. पार्लमेंटची निवडणूक दर पाच वर्षांनी होत

असली तरी हाऊस ऑफ लॉर्डस् ही परमनंट बॉडी आहे.)

रेमंड आता पन्नाशीला आला होता. लेबर पार्टीचे नेतृत्व पाहता आता पुन्हा लेबर पार्टी सत्तेवर येणे कठीण दिसत होते. ॲटर्नी जनरलनी देऊ केलेले पद स्वीकारवी असे त्याला वाटायला लागले होते. त्याने जॉईसचे मत विचारले.

'तुझा पिंड राजकारणी माणसाचा आहे. तू एका महिन्यात अशा पदाला कंटाळशील.'

'पण आता विरोधी पक्षात तरी किती काळ काढायचा ?'

'अजून वेळ गेलेली नाही.' जॉईस त्याला धीर देत म्हणाली. ती म्हणाली की, 'मायकेल फूटनंतर पक्षाला जर चांगले नेतृत्व मिळाले तर पुढच्या निवडणुकीपर्यंत पक्षाची स्थिती सुधारेल.'

महिना भरात मायकेल फूटनी त्यांचा राजिनामा जाहीर केला तेव्हा तीन–चार कामगार नेत्यांनी पक्षाच्या नेतृत्व पदासाठी आपले नाव पुढे केले. निवडणुकीपूर्वी झालेल्या पक्षाच्या वार्षिक परिषदेत बऱ्याचशा कार्यकर्त्यांनी रेमंडला नेतेपदाच्या निवडणुकीत उभे राहायला सांगितले; पण ह्या खेपेस निल किनॉक जिंकण्याची शक्यता जास्त आहे याची रेमंडला कल्पना होती. त्यामुळे तो रिंगणात उतरला नाही.

निवडणूक संपल्यावर मतदार संघातली कामे उरकण्यासाठी रेमंड तावडतोब लीडस्‌ला गेला. निल किनॉक लेबर पार्टीचे नवे नेते म्हणून निवडून आले होते. रेमंडने किनॉकचे प्रतिस्पर्धी रॉय हॅटर्सले यांना पाठिंबा दिला होता; पण तरीही आपल्या मंत्रिमंडळातील अनुभवामुळे किनॉक आपल्याला शॅडो कॅबिनेटमध्ये घेईल याची रेमंडला खात्री होती.

## वेळीच डोळे उघडले

मतदारसंघातील पक्षाच्या कार्यालयात सकाळचे काम आटोपून रेमंड घरी परतला तेव्हा जॉईस म्हणाली, किनॉकने फोन केला होता. रेमंडने किनॉकला फोन केला तेव्हा त्याची ऑफर ऐकून त्याला धक्काच बसला. किनॉकने रेमंडला शॅडो मिनिस्टर फॉर ट्रान्सपोर्ट म्हणून शॅडो मिनिस्ट्रीमध्ये बोलावले होते. एका वाक्यात आपल्याला शॅडो कॅबिनेटमध्ये यायची इच्छा नसल्याचे सांगून रेमंडने फोन खाली ठेवला.

रेमंड डोळे मिटून आरामखुर्चीत बसला तेव्हाच जॉईसला लक्षात आले की त्याचे काहीतरी बिनसले आहे. रेमंडने तिला सांगितले की त्याने किनॉकच्या ऑफरला नकार दिला होता.

'इतर कोण शॅडो मिनिस्टर्स झालेत ?' जॉईसने विचारले.

'मी विचारले नाही आणि त्यानेही सांगितले नाही. नाहीतरी उद्या सकाळच्या पेपरात समजेलच. मी आता जज्जच्या पक्षाचा स्वीकार करायच्या विचारात आहे. राजकारणात आयुष्यातली बरीच वर्षे वाया गेली.' रेमंडचा सूर निराशेचा होता.

'आणि माझीही' जॉईस म्हणाली.

रेमंडने आश्चर्याने वर पाहिले.

'तुला इतके दिवस सांगायचा मला धीर होत नव्हता; पण तू जर आता राजकारण सोडून जज्ज व्हायचा विचार करीत असशील तर मलाही वेगळा मार्ग शोधावा लागेल.'

'तुझे दुसऱ्या कोणावर प्रेम आहे ?' रेमंडचा आवाज घोगरा झाला होता.

जॉईसचा चेहरा उतरला. रेमंडच्या नजरेला नजर न देता ती म्हणाली,

तसंच म्हणायचं तर एक माणूस आहे. त्याची केव्हापासून माझ्याशी लग्न करायची इच्छा आहे. ब्रेडफोर्डच्या शाळेत आम्ही एकत्र होतो. तो आता बँकेत अकाऊंटंट आहे. मी नकार दिला तेव्हापासून अजून त्याने लग्न केले नाही.

'पण तुझे प्रेम आहे त्याच्यावर ?'

'प्रेम असं नाही म्हणता येणार; पण आमची जुनी मैत्री आहे. तो मला समजून घेतो. या वयात त्याची गरज मला जास्त वाटते.'

रेमंडच्या तोंडून शब्दही बाहेर पडत नव्हता.

'आपण वेगळे झालो तर तुला केटला न्यूयॉर्कहून परत बोलावता येईल. माझी चिंता करू नकोस. तुला अडकवून ठेवायची माझी इच्छा नाही. तू विचार करून मला उद्या सांगितले तरी चालेल.'

एवढे म्हणून जॉईस खोलीतून बाहेर पडली तेव्हा तिला अश्रू लपवता आले नाहीत.

रेमंड तसाच बसून राहिला. जॉईस आणि केटबरोबरची सगळी वर्षे त्याला आठवली. एका शब्दानेही तक्रार न करता जॉईसने इतकी वर्षे आपली कशी काळजी घेतली हे त्याला ठाऊक होते. केटबरोबरच्या प्रकरणाची तिला कल्पना होती; पण तिने कधीच तसे दाखवले नव्हते.

संध्याकाळी लंडनला परतणे रेमंडला भागच होते. दुसऱ्या दिवशी कोर्टात त्याची केस होती; पण रेमंडने आता निश्चय केला होता. आयुष्याला वळण देण्याची वेळ येऊन ठेपली होती. दुपारपर्यंत कोर्टातले काम आटोपून जेवायलाही न थांबता रेमंड सरळ विमानतळावर आला.

सोमवारी अचानक दुपारी रेमंडला दारात पाहून जॉईसला आश्चर्य वाटले. एखाद्या तरुण माणसाने लाजावे तसे लाजत रेमंडने फुलांचा गुच्छ तिच्या हातात दिला.

'ॲव्ह कम टू ट्राय ॲण्ड विन यू बॅक'

'इटस् द नाइसेस्ट थिंग यू हॅव्ह सेड इन इअर्स' त्याच्या छातीवर डोके ठेवत जॉईस म्हणाली.

आपल्याला जाग यायला इतकी वर्षं का लागली याचे रेमंडला आश्चर्य वाटले. 'आज जेवायला बाहेर जाऊयात.' त्याने जॉईसला सांगितले.

जेवताना रेमंडने जॉईसला त्याचे पुढचे प्लॅन सांगितले. ॲटर्नी जनरलनी देऊ केलेले पद स्वीकारण्याचा त्याचा विचार होता. आता मतदारसंघ सोडून जॉईसलाही त्याच्याबरोबर लंडनला राहता येणे शक्य झाले असते.

रात्री उशीरा ते घरी परतले तेव्हा फोन वाजतच होता. अंधारात धडपडत रेमंडने फोन उचलला. जॉईसने चाचपडत दिवा लावायचा प्रयत्न केला.

'रे, मी गेले चार तास तुला फोन करायचा प्रयत्न करतो आहे.'

'मी जॉईसबरोबर बाहेर जेवायला गेलो होतो' रेमंडने किनॉकला सांगितले.

'बातमी कळायच्या आधीच ?'

'कसली ?'

'तू शॅडो कॅबिनेटमध्ये सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर सोशल सर्विस म्हणून यायला तयार आहेस का?'

रेमंडने रिसीव्हरवर हात ठेवून जॉईसला बोलावले. किनॉकची ऑफर त्याने तिला सांगितली.

'मला वाटलेच तुझ्याशिवाय त्यांचे चालणार नाही. कॅबिनेटमध्ये घेत असतील तर तुला होकार द्यायला काहीच हरकत नाही.'

रेमंडने तावडतोब त्याचा होकार कळवला.

जज्ज व्हायचा विचार आता त्याने सोडून दिला तरी जॉईसला त्याने लंडनला येऊन राहायला सांगितले. लंडनमधला फ्लॅट विकून रेमंडने हाऊस ऑफ कॉमन्स जवळच्या कॉव्हले स्ट्रीटवर छोटे खानी घर घेतले. आठवडाभर खपून जॉईसने फर्निचर लावून घेतले.

शनिवार रविवारी त्यांनी रेमंडच्या आईवडिलांना नव्या घरात जेवायला बोलावले. वडिलांच्या जुन्या बॅगवर 'गोल्ड द फॅमिली बुचर' अशी अक्षरे पाहून रेमंडला हंसू आले. गेल्या तीस वर्षांत रेमंडमध्ये बराच फरक झाला होता, वडिलांचा व्यवसाय सांगताना आता त्याला लाजल्यासारखे होत नसे. रविवारी संध्याकाळी लीडसूला जाण्यासाठी निघेपर्यंत रेमंडच्या आईच्या जॉईसबरोबरच्या गप्पा संपेनात. त्या दोघींना पाहून रेमंडला पुन्हा एकदा वाटले आपले वेळीच डोळे उघडले हे उत्तम झाले.

## नवे मंत्रिमंडळ

निवडणुकीत प्रचंड बहुमताने विजयी झाल्यावर दोन दिवसात मार्गारेट थॅचरनी नवे मंत्रिमंडळ जाहीर केले सायमनला सकाळी टेन डाऊनिंग स्ट्रीटवर येण्याचे निमंत्रण आले तेव्हाच त्याला आणि इलिझाबेथला कळले की, पंतप्रधान त्याला कॅबिनेट पोस्ट देतील. निवडणुकीपूर्वीच्या मंत्रिमंडळात सायमन मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर डिफेन्स होता. पंतप्रधानांना भेटून सायमन बाहेर पडेपर्यंत बीबीसी-वरून इलिझाबेथला बातमी समजली होती. सायमन आता सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर डिफेन्स झाला होता.

फॉकलंड युद्धाच्या काळात अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आणि सभागृहातून ते पास करून घेण्यासाठी चार्ल्सने जे परिश्रम घेतले त्याचे फळ त्याला मिळाले. त्याला मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर फॉरेन अफेअर्स हे पद मिळाले पंतप्रधानांनी त्याला आश्वासन दिले की, खाते पालट होईल तेव्हा त्याला कॅबिनेट म्हणून बढती देण्यात येईल. पंतप्रधानांनी त्यांचा शब्द पाळला पुढचे पाच महिने मिनिस्टर ऑफ स्टेट म्हणून काम केल्यानंतर मंत्रिमंडळातील बेशिस्तीला आळा घालण्यासाठी थॅचरने अचानक मंत्रिमंडळाची पुनर्रचना केली. सायमनचे पद कायम राहिले आणि चार्ल्स फॉरेन सेक्रेटरी झाला. एकेकाळचे प्रतिस्पर्धी आता पंतप्रधानांचे दोन हात बनले होते. सायमन आणि चार्ल्स आता पन्नाशीला आले होते. मात्र कॅबिनेट पोस्टच्या मानाने हे वय बरेच तरुण वय मानले जाते.

अँड्रयू सकाळी हाऊस ऑफ कॉमन्सला निघाला तेव्हा गाडीत रेडिओवर त्याने पहिल्यांदा बातमी ऐकली. सकाळच्या पेपरात काहीच उल्लेख नव्हता. याचा अर्थ रात्री उशिरा घटना घडली असावी. बीबीसी वरील बातमीनुसार रॉयल नेव्हीची अत्याधुनिक विनाशिका एच्. एम्. एस्. ब्रॉडस्वोर्ड टयूनिस आणि बेंगाझीमधल्या सामुद्रधुनीत लिबियन दहशतवादी संघटनेने ताब्यात घेतली होती.

बातमीमध्ये असेही म्हटले होते की, विनाशिकेवर रॉयल नेव्हीचे २१७ सैनिक होते. यांचे बोटीवर कोस्टगार्ड ऑफिसर्स म्हणून चढले आणि अचानक कर्नल गडाफीचा जयघोष करीत त्यांनी बोटीवर ताबा मिळवला.

अँड्रयू हाऊस ऑफ कॉमन्समधल्या त्याच्या कार्यालयात पोहोचला तेव्हा साडे नऊ वाजले होते. त्याने तावडतोब सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचा नेता डेव्हिड ओवेन याला फोन करून बातमीच्या राजकीय परिणामांची चर्चा केली. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये पक्षाने कोणती भूमिका घ्यायची हे त्यांनी ठरवले. अँड्रयूने तावडतोब ह्या विषयावर चर्चा घडवून आणली जावी ह्याबाबत सभापतींना पत्र धाडले. पत्राची एक एक प्रत त्याने डिफेन्स सेक्रेटरी आणि फॉरेन सेक्रेटरी यांना पाठवली.

दहाच्या बातम्यांत सांगण्यात आले की, दहशतवाद्यांनी ब्रिटनच्या तुरुंगात असलेल्या लिबियन नागरिकांची सुटका करण्याची मागणी केली होती. ब्रॉडस्वोर्डचे कॅप्टन लॉरेन्स पॅकार्डसहित २१८ खलाशांना बोटीच्या इंजिनरूममध्ये बंद करण्यात आले होते.

सभागृहाच्या टेलेक्स मशीनभोवती सभासदांची गर्दी जमली होती. सभागृह सुरू होण्याआधी जास्तीत जास्त माहिती सभासदांना हवी होती.

प्रश्नोत्तरांचा वेळ वेल्शवरील प्रश्नासाठी राखून ठेवला होता. होता. त्यामुळे वेल्शचे ३६ खासदार सोडले तर बाकी इतर सभासद अजून सभागृहात आले नव्हते. वेस्टमिनिस्टर पॅलेस बाहेर मात्र वार्ताहरांची आणि लोकांची गर्दी होती. मंत्रिमंडळाचे सदस्य वार्ताहरांशी बोलायला तयार नव्हते. अजून संपूर्ण माहिती हातात आली नव्हती त्यामुळे काहीही बोलणे अशक्य होते.

सव्वातीनला अँड्रयू सभागृहात आला तेव्हा सभागृह खचून भरले होते. त्याची जागा डेव्हिड ओवेन शेजारीच होती.

तीन वाजून सत्तावीस मिनिटांनी पंतप्रधान मार्गारेट थॅचर आणि त्यांच्या मागून फॉरेन सेक्रेटरी चार्ल्स सेमूर व डिफेन्स सेक्रेटरी सायमन कस्लेक सभागृहात आले.

साडे तीनला प्रश्नोत्तरांची वेळ संपली आणि सभापतींनी डिफेन्स सेक्रेटरी आणि फॉरेन सेक्रेटरी एच् एम्. एस्. ब्रॉडस्वोर्डवर सभागृहात निवेदन करतील असे जाहीर केले.

डिफेन्स सेक्रेटरी म्हणून सायमन निवेदन करण्यास उभा राहिला. त्याने सभासदांना सांगितले की, सरकारकडे असलेल्या माहितीनुसार सकाळी सातचाळीसच्या सुमारास ब्रॉडस्वोर्ड टयूनिस आणि बेंगाझीमधल्या सामुद्रधुनीतून जात असताना लिबियाच्या पिपल्स लिबरेशन आर्मीचे ५० गुरीला आपण कोस्टगार्ड ऑफिसर्स आहोत असे सांगून बोटीवर चढले. सैनिक बेसावध असल्याचा फायदा घेऊन त्यांनी ताबडतोब कॅप्टन लॅारेन्स पॅकार्ड आणि डेकवरील सैनिकांना जायबंदी केले. दहशतवाद्यांबरोबर झालेल्या झटापटीत लॉरेन्स पॅकार्ड जबर जखमी झाले होते. पॅकार्डसहित २१७ लोकांना दहशतवाद्यांनी इंजिनरूममध्ये बंद केले होते.

सायमन म्हणाला की त्रिपोलीमधील ब्रिटिश वकीलातीतून मिळालेल्या माहितीनुसार ब्रॉडस्वोर्डने कोणत्याही सागरी वाहतुकीच्या नियमाचा भंग केला नव्हता. एकोणिसशे अठ्ठावन्नच्या सागरी दळण

वळणासंबंधीच्या जिनिव्हा करारानुसार पिपल्स लिबरेशन आर्मीचे हे कृत्य म्हणजे चाचेगीरीच म्हटले पाहिजे असे त्याचे म्हणणे होते.

सायमनने पुढे सांगितले की होम डिपार्टमेंटकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे ब्रिटनच्या तुरुंगात एकूण नऊ लिबियन नागरिक होते. त्यापैकी दोघांना शॉपलिफ्टींगसाठी तीन महिन्यांची शिक्षा झाली होती. दोघे जण अंमली पदार्थांच्या स्मगलिंगबद्दल कैदेत होते आणि उरलेले पाच जण बोईंग विमानाचे अपहरण करण्याच्या प्रयत्नात पकडले गेले होते. हे पाचही लोक पिपल्स लिबरेशन आर्मीचे सभासद आहेत अशी होम डिपार्टमेंटकडे माहिती होती.

'ब्रिटिश सरकार दहशतवाद्यांच्या कोणत्याही धमक्यांना भीक घालणार नाही. न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेत सरकारला कोणताही बदल करायची इच्छा नाही.'

'फॉरेन सेक्रेटरींनी लिबियाच्या राजदूताला ब्रिटिश सरकार ह्या कृत्याची गंभीर दखल घेईल म्हणून कळवलेले आहे. त्यामुळे लिबियाचे सरकार तातडीने ब्रिटिश सैनिकांची सुटका करील अशी अपेक्षा आहे.'

टाळ्यांचा कडकडाटात सायमन भाषण संपवून खाली बसला.

विरोधी पक्षाच्या नेत्याने उभे राहून सांगितले की, एच्. एम्. एस्. ब्रॉडस्वोर्डची सुटका करण्याबाबत विरोधी पक्षांचा सरकारला संपूर्ण पाठींबा राहिल. त्यांनी विनाशिकेची सुटका करण्याच्या दृष्टीने सरकार कोणती पावले टाकणार याबद्दल विचारणा केली.

सायमनने पुन्हा उठून सांगितले की, आतापर्यंत फक्त राजकीय पातळीवर बोलणी करून प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न चालले आहेत; पण त्याचबरोबर त्याने आर्मी नेव्ही आणि एअर फोर्सच्या तीनही प्रमुखांची त्याच्या कार्यालयात बैठक बोलावली होती. 'उद्यापर्यंत ह्या संबंधात मला अधिक विस्तृत निवेदन करणे शक्य होईल.' सायमन म्हणाला.

सायमन खाली बसल्यावर सभापतींनी अँड्र्यू फ्रासरला बोलण्याची परवानगी दिली. अँड्र्यू सोशल डेमोक्रॅटिक पार्टी आणि लिबरल पार्टी यांच्या युतीने तयार केलेल्या शॅडो कॅबिनेटचा डिफेन्स मिनिस्टर होता. त्याने ह्या दोन्ही विरोधी पक्षांचा सरकारला पाठींबा राहील असे सांगितले. त्याने विचारले की आणखी किती काळ गडाफींशी वाटाघाटी करण्याचा सरकारचा विचार आहे. गडाफीबद्दलचा इतर देशांचा अनुभव लक्षात घेता केवळ बोलणी करून प्रश्न सुटेल असे अँड्र्यूला वाटत नव्हते.

सायमन उत्तर देण्यासाठी उभा राहीला 'माननीय सभासदांचा मुद्दा योग्य आहे. त्यांनी स्वतः पूर्वी मिनिस्टर ऑफ स्टेट फॉर डिफेन्स म्हणून काम केले आहे त्यामुळे त्यांना माझी अडचण समजू शकेल. बोटीवर अडकलेल्या ब्रिटिश सैनिकांचे प्राण धोक्यात येतील अशी कोणतीही माहिती जाहीर करण्याची माझी इच्छा नाही.' सायमन म्हणाला.

सायमनने ज्या प्रकारे विरोधी पक्षाचे प्रश्न हाताळले ते पाहून पंतप्रधानांनाही समाधान वाटले. सव्वाचारला सायमनने निवेदनाच्या अनुषंगाने विचारल्या गेलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिल्यानंतर सभापतींनी फॉरेन सेक्रेटरी चार्ल्स सेमूरना निवेदन करण्याची विनंती केली.

'लिबियाचे ब्रिटनमधील राजदूत कादर ह्यांना मी तावडतोब कार्यालयात बोलावून घेतले आहे. सभासदांच्या प्रश्नांची उत्तरे दिल्या नंतर त्यांच्याशी वाटाघाटी करण्याचा माझा विचार आहे' चार्ल्स म्हणाला.

चार्ल्सचे निवेदन चालू असताना लिबियाचा राजदूत कादर हाऊस ऑफ कॉमन्सचा स्ट्रेंजर्स गॅलरीमध्ये बसून त्याचे भाषण ऐकत होता. त्याने चार्ल्सच्या भाषणांच्या नोटस् घ्यायला सुरुवात केली तेव्हा मात्र कॉमन्सच्या सिक्युरिटी गार्डने त्याला लिहून घ्यायला बंदी केली.

'युनायटेड नेशनसमधील आपल्या राजदूताने आज दुपारी तातडीने बोलवलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या सभेत लिबिया विरुद्ध ठराव मांडला आहे लिबियाचे कृत्य हे १९५८ च्या जिनिव्हा कराराचा भंग आहे आणि यासाठी युनोतील सर्व देश ब्रिटनच्या ठरावाला पाठींबा देतील अशी अशी माझी अपेक्षा आहे.' चार्ल्स म्हणाला.

विरोधी पक्षाच्या नेत्याने उभे राहून विचारले की ह्या घटनेमुळे लिबियाशी राजकीय संबंध तोडण्याचा सरकारचा विचार आहे का?

'शक्यतो तशी वेळ येऊ नये अशी अपेक्षा आहे. गडाफीने जर ताडबतोब हस्तक्षेप करून ब्रिटिश सैनिकांची मुक्तता केली तर ब्रिटनला कडक धोरण अवलंबिण्याची गरज भासणार नाही.' चार्ल्स म्हणाला.

चार्ल्स कुठल्याच प्रश्नाला अडखळत नव्हता. त्याची कॅबिनेट मिनिस्टर म्हणून नेमणूक होऊन जेमतेम महिना झाला होता. त्याचे आणि सायमनचे सभागृहातील कौशल्य पाहून रेमंडला वाटले की त्यांनी हे यश आणखी पाच वर्षे टिकवले तर मार्गारेट थॅचर नंतर पंतप्रधानपदाची माळ दोघांपैकी एकाच्या तरी गळ्यात पडेल. साडेचार वाजता सभापतींनी अलेक् पिमकीन आणि टॉम कार्सन ह्या शेवटच्या दोन वक्त्यांना बोलू दिले आणि निवेदनावरील चर्चा आटोपती घेतली.

अँड्र्यूने सभापतींना पत्र पाठवून ब्रॉडस्वोर्डच्या प्रश्नावर तातडीच्या चर्चेची मागणी केली होती. सभापतींनी मागणी अमान्य केली पण त्यांनी अँड्र्यूला आश्वासन दिले की एक दोन दिवसात ते त्याच्या मागणीचा पुनर्विचार करतील. सायमन आणि चार्ल्सने माहिती गोळा करण्यासाठी अधिक वेळ मागून घेतला असेल त्यामुळेच सभापतींनी चर्चा लांबणीवर टाकली हे अँड्र्यूच्या लक्षात आलं. त्यानं सभापतींच्या निर्णयाला विरोध केला नाही.

ब्रॉडस्वोर्डवरील निवेदन संपल्यावर पुन्हा वेल्श प्रांताच्या काही प्रश्नांबद्दल तहकुबीचा ठराव चर्चेला आला.

सायमन ताबडतोब सैन्याच्या प्रमुखांना भेटण्यासाठी डिफेन्स मिनिस्ट्रीतील त्याच्या कार्यालयात गेला. चार्ल्स त्याच्या गाडीतून फॉरेन ऑफिसला गेला. अँड्र्यू कॉमन्समधील त्याच्या कार्यालयात दुसऱ्या दिवशीच्या चर्चेची तयारी करायला निघाला.

कार्यालयात पोहोचताक्षणीच चार्ल्सला त्याच्या परमनंट अंडर सेक्रेटरीने सांगितले की लिबियाचा राजदूत कादर त्याची वाट पाहात होता. अंडर सेक्रेटरी म्हणाले की राजदूताकडे नवीन अशी काहीच माहिती नव्हती. राजदूतालाही अजूनपर्यंत गडाफीशी संपर्क साधण्यात यश मिळाले नव्हते. चार्ल्सने राजदूताला आत पाठवून द्यायला

सांगितले. शाळेच्या हेडमास्तरपुढे एखाद्या खोडकर मुलाने उभे रहावे तसा कादर चार्ल्सपुढे उभा राहिला.

'फॉरेन सेक्रेटरी ?' कादरने आत येत विचारले. टेबलावरच्या कागदांतून डोके वर काढत चार्ल्सने कादरकडे पाहिले. त्याला बसायलाही न सांगता चार्ल्सने बोलायला सुरुवात केली.

'एच् एम् एस् ब्रॉडस्वोर्ड ज्या प्रकारे दहशतवाद्यांनी ताब्यात घेतली आहे त्या प्रकारची चाचेगिरी म्हणून दखल घेतली जाईल हे मी तुम्हाला स्पष्ट करू इच्छितो.'

'मला असं म्हणायचंय...

'तुम्ही काहीच म्हणायची गरज नाही. आमच्या बोटीची सुटका होईपर्यंत ब्रिटिश सरकार तुमच्या सरकारवर सर्व प्रकारचा राजकीय आणि आर्थिक दबाव आणण्यास मागेपुढे पहाणार नाही.'

'माझे फक्त एवढेच म्हणणे आहे...

'पंतप्रधानांना ताबडतोब गडाफींशी बोलण्याची इच्छा आहे त्यामुळे पुढच्या तासाभरात त्याबाबत तुम्ही मला माहिती द्याल अशी अपेक्षा आहे.'

'होय फॉरेन सेक्रेटरी पण...

'उद्या दुपारी बारापर्यंत आमच्या बोटीची आणि तिच्या वरील खलाशांची तुम्ही सुटका केली नाही तर सुटकेसाठी आम्हाला योग्य वाटेल त्या मार्गाचा आम्ही अवलंब करू हे देखील तुम्ही गडाफींना कळवायला हवे. तुम्हाला समजते आहे ना मी काय म्हणतो आहे ते ?'

'होय फॉरेन सेक्रेटरी. माझे फक्त एव्हढेच म्हणणे होते की...

'ठीक आहे. तुम्ही निघा आता'

लिबियाचा राजदूत बाहेर गेल्यावर चार्ल्सने पुन्हा टेबलावरचे कागद चाळायला सुरुवात केली. परमनंट अंडर सेक्रेटरी आत आल्यावर चार्ल्सनी त्यांना सांगितले की कादरकडून फारसे काही होण्याची शक्यता नाही. त्याने सेक्रेटरीला सांगितले की युनायटेड नेशन्समध्ये ब्रिटनचा ठराव येण्यापूर्वी त्याला वॉशिंग्टनमध्ये सेक्रेटरी ऑफ स्टेट किर्कपॅट्रिक आणि मॉस्कोला ग्रोमिकोंशी ठरावाला पाठींबा मिळविण्यासाठी बोलायचे आहे.

इकडे सायमनच्या ऑफिसमध्ये आर्मी, नेव्ही आणि एअर फोर्सचे प्रमुख सायमनची वाट पाहत बसले होते. सायमन आत येताच ते उठून उभे राहिले. सायमनला गंमत वाटली. वीस वर्षांपूर्वी राजकारणात शिरताना त्याने आर्मी सोडली त्यावेळी त्याचे पद सेकंड लेफ्टनंटचे होते पण आता तो ब्रिटनचा डिफेन्स सेक्रेटरी होता. रॉयल नेव्हीचे प्रमुख सर जॉनफिल्ड हाऊस यांना त्याने ब्रॉडस्वोर्डबद्दलच्या ताज्या घडामोडींची माहिती विचारली.

'गेल्या तासाभरात परिस्थितीत काहीच फरक पडला नाही. पंतप्रधानांना अजून कर्नल गडाफींशी बोलणे शक्य झाले नाही. पिपल्स लिबरेशन आर्मी हे कृत्य सात वर्षांपूर्वी इराणच्या खोमेनीला पाठिंबा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी अमेरिकन वकिलातीला वेढा घातला त्याच प्रकारचे दहशतवादी कृत्य आहे. फॉरेन ऑफिस अजूनही वाटाघाटींवर भर देत असले तरी आमच्या मते बोटीच्या सुटकेसाठी आपण बळाचा वापर करण्याची गरज आहे. वाटाघाटींत आपण जितका वेळ वाया घालवू तितके आपल्या सैन्याचे मनोधैर्य कमी होईल असे आम्हाला वाटते' सर जॉन म्हणाले.

'मी तुमच्याशी सहमत आहे; पण सैन्याचा वापर करायचा असेल तर कॅबिनेटची संमती घ्यावी लागेल. कॅबिनेट पुढे ठेवण्यासाठी तुम्ही मला कच्चा आराखडा देऊ शकाल का ?' सायमनने विचारले.

सर जॉननी सायमनपुढे निळ्या रंगाची फाईल ठेवली. ब्रॉडस्वोर्डवर हल्ला झाल्याची बातमी आल्यानंतरच्या पहिल्या चार तासात सुटकेचा कच्चा आराखडा तयार करण्यात आला होता. सायमनच्या ऑफिसमध्ये आर्मी, नेव्ही आणि एअर फोर्सचे आठ वरिष्ठ अधिकारी बसले होते. सर जॉनची योजना सायमनने लक्षपूर्वक ऐकून घेतली तासाभरात आपल्या बारीक सारीक शंकांचे निरसन करून घेतल्यावर सायमन कॅबिनेट मिटिंगसाठी टेन डाऊनिंग स्ट्रीटकडे निघाला. लष्कराच्या अधिकाऱ्यांनी ब्रॉडस्वोर्डच्या सुटकेच्या योजनेवर शेवटचा हात फिरवण्यास सुरुवात केली.

सायमनच्या कार्यालयापासून पंतप्रधानांचे निवासस्थान फक्त दोन मिनिटांवर होते. सायमन चालतच मिटिंगसाठी निघाला. त्याच्याबरोबर त्याचे दोन शरीररक्षक आणि साध्या वेषातला एक गुप्त पोलिस होता.

डाउनिंग स्ट्रीटवर लोकांची गर्दी जमली होती पंतप्रधानांच्या निवासस्थानातून अधिकाऱ्यांची आणि मंत्र्यांची होणारी ये-जा लोक उत्सुकतेने पाहत होते. सायमन दृष्टीक्षेपात येताच लोकांनी टाळ्या वाजवायला सुरुवात केली.

'गुड लक' 'ब्रिंग अवर बॉईज् होम्' त्यांनी घोषणा दिल्या.

(क्रमशः)

---

## साहित्य-परिषद
## दिवाळी अंक स्पर्धा निर्णय
# 'माणूस' चा गौरव

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे दरवर्षी दिवाळी अंक स्पर्धा घेण्यात येते आणि तीन उत्कृष्ट अंकांना 'विविध ज्ञानविस्तार' कर्ते रावसाहेब मोरमकर, 'मासिक मनोरंजन' कर्ते का. र. मित्र आणि किर्लोस्कर मासिकांचे कै. शं. वा. किर्लोस्कर या तीन संपादकांच्या स्मृत्यर्थ प्रत्येकी रु. १०१।- ची पारितोषिके दिली जातात. यंदा परिषदेकडे आलेल्या अंकातून निवडलेल्या पुढील तीन अंकांना ही पारितोषिके देण्याचे प्रकट करण्यात येत आहे.

१. अक्षर : संपादक निखिल वागळे
२. अभिजात : संपादक स्मिता पटवर्धन
३. माणूस : संपादक श्री. ग. माजगावकर

याशिवाय परीक्षक समितीने 'जाहीरनामा' (सं. विजय तेंडुलकर) आणि 'गुलमोहर' (सं. सुभाष अवचट) हे दोन उत्तम अंक म्हणून उल्लेखित केले आहेत. यंदा नव्याने सुरू केलेले कै. अनंत काणेकर यांचे स्मृत्यर्थ दिवाळी अंकातील उत्कृष्ट ललित लेखास मिळावयाचे रु. २००।- चे पारितोषिक डॉ. अनुराधा पोतदार यांना 'अभिजात' मधील 'तो' या लेखाबद्दल देण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या निर्णयासाठी सौ. शांता किर्लोस्कर, डॉ. द. ता. भोसले, डॉ. म. वि. गोखले आणि प्रा. स. शि. भावे (निमंत्रक) यांची साहित्य परिषदेने समिती नेमलेली होती.

## पुस्तके

# चिरस्पर्शी कविता

'होडया'—श्री. हेमंत गोविंद जोगळेकर यांच्या अठ्ठावीस कवितांचा संग्रह, मातीतून नैसर्गिकपणे अंकुर तसे अंतर्मनांतून हुंकार आल्याखेरीज कविता होऊ शकत नाही याची साक्ष या संग्रहातील प्रत्येक कविता देते. मुखपृष्ठापासून तो अनुक्रमणिकेतील आतील सहजसाध्या चित्रांपर्यंत सतत कवीमन भेटत राहते—बंबी होडी—शिडाची होडी—साधी होडी—खिडकी—गज—उभे—आडवे—छेदून जाणारे—त्यातून दिसणारे आकाश—पाणी—फुले—पिसारे——पक्षी——सारेच आगळे वेगळे...

'मला एकदा पंख फुटले होते' या पहिल्याच कवितेत 'फुलपाखरासारखे पंख फुटले पण ते कुणाला कळलेही नाही. ते कापून बारीक बारीक तुकडे करून हळूच वाऱ्यावर सोडून दिले—पण तेही कुणाला कळले नाही.' वाचताना हे 'कळल्या'वर ज्याना आपलेच पंख कापलेसे वाटेल... जीव एवढा एवढा होईल— त्यांचेसाठीच या साऱ्या कविता...

'तेव्हा ना'चा कोवळा सूर लावून आलेली दुसरी कविता, 'सहज मी फुलाच्या आत हिंडून येत असे', 'एकदा आकाशाचा घुमट उचलून मी बाहेर डोकावून पाहिले होते, नंतर पुन्हा तो जसाच्या तसा ठेवून दिला होता.' 'तेव्हा ना, धनुष्यबाण घेऊन मी लढाईवर जात असे, तेव्हा ना, मुठीमध्ये आईचे बोट बंद असे'— अशी बालसुलभतेनेच पुरी करण्याचे यश कवीने मिळविले आहे.

'होडया' ही कविता आपापल्यापरी वाचायलाच हवी. 'पाऊस ना, पडलाच नाही. पाणी ना, वाह्यलंच नाही—होडया ना, सोडल्याच नाहीत— होडया ना, केल्याच नाहीत.' वरवरच्या आवाजात सहज काही कैफियत जाताजाता सांगावी पण अंतर्यामीची आर्तता लपता लपू नये अशा या विलक्षण चटका लावणाऱ्या ओळी.

'ठ्ठो'—पुरुष वयात येत असताना त्याला जे अवघडपण छळते, ग्रासते त्या उलघालीचे हे नेमके चित्रण आहे. तरीपण 'ठ्ठो' चित्ता मोठ्यांदा ओरडला आणि आपल्यालाच गोळी लागल्यासारखा धूम पळून गेला. आई म्हणाली, 'तुझं चित्त ठिकाणावर नाही.' यातील 'चित्ता' व 'चित्त' हे शब्द एकापाठोपाठ नैसर्गिकपणे आलेसे वाटले तरी या गंभीर कवितेचा रसभंग करून जाततसे वाटते! 'तळचात—मळचात' ही हलक्याफुलक्या भावनेची पण जराही वाहवून न जाणारी संयमित कविता 'कही' एक केवळ सुंदर काव्याचीच. शेवटी— 'की भिजतात माझी बोटे तुझ्या पापण्यावरून फिरताना— तुझ्याशी कट्टी होऊन आल्यावरही.' 'संदर्भखुणा'— विवाहोत्तरही पत्नी झालेल्या प्रेयसीला सुजाणपणे जाणून घेणाऱ्या (आश्चर्यकारक?) पुरुषाची कविता एकूणच संग्रहात प्रेयसी, स्त्री यांचेविषयी समंजस—सहिष्णु जाणीव— 'वारसा', 'रंग', 'डोंबाऱ्याचा खेळ' त्याची इच्छा या कवितांतूनही पुरेशी बोलकी केवळ भावभावनांच्या खेळांत गुंतून पडलेले कातर, हळवे— कवीमन या संग्रहात नाही! आसपासच्या समाजासाठी (बांधिलकी' हा शब्द अपरिहार्यपणे पुढे ठाकला तरी तो लगाम लावून आवरून धरावा एवढा अलिकडे केवळ पुस्तकी व पानोपानी सैल—ढगळ— बेलगाम वगैरे होत चाललेला?)— सदैव जागे असलेले मन 'खिडकी' या कवितेतून वाचकांसही थोडक्या संदर्भांतून जाग आणण्याचा प्रयत्न करते. न संपणाऱ्या गोष्टी सारखी ही कविता, पण तिचा शेवट अनाठायी चमत्कृतीपूर्ण वाटतो. (खिडकी— गवताऐसी उदंड कविता ऐकून फिरणारी— गरिबांचे हाल, श्रीमंतांचे 'हॉल' पाहून फिरणारी! असे काहीही ती सा'मावून' घेऊ शकेल— एवढी आनादि—अनंत) 'भाईहो', 'तिकीटचेकर', 'कपाट उघडताना' यांतही सामाजिक भान सुयोग्य.

'ती माझ्याकडे आली' येथपासून तो 'कुठून येतात' या शेवटच्या कवितेपर्यंत काळजाचा ठाव घेणाऱ्या कविता. 'काहीच आठवत नाही', 'कॅमेरे— रोखलेले', 'बाग', 'त्याक्षणी' या विशेष. 'बाग'मध्ये तिने माझ्यासाठी विणलेला स्वेटर मी देऊन टाकला गुरख्याला. तो मूर्ख, रोज तो घालून मला सलाम करू लागला पण बरंच वाटलं मला तो स्वेटर त्याच्या अंगावर पाहून या व प्रथमपासूनच्या अतिशय गद्य ओळीतूनही परस्परांपासून अटळपणे दूर झाल्यानंतरचा चिरवियोग मनस्वी उपरोधाने ओळीओळीतून डसून जातो.

या संग्रहाला विजया राजाध्यक्ष या काव्य विषयक मर्मज्ञ, जाणित्या समीक्षिकेची प्रस्तावना. प्रस्तुत कवितांचे विश्लेषणही सुसूत्र, सुसंबद्ध, एक दर्जेदार परीक्षण म्हणून ती प्रस्तावना केव्हाही थोर; परंतु कोणतीही समर्थ कविता तशी स्वतंत्रच असते. (किंबहुना 'तंत्र' म्हणावे असे जातिवंत कवितेचे नसतेच. नैसर्गिकपणे 'स्व'त्वात ती मग्न असते.) हेमंत गोविंद जोगळेकरांचा होडया हा संग्रह याचे ताजे, जिवंत उदाहरण आहे. म्हणूनच वाटते की, 'रेगे—मर्ढेकर' युगाची सुरी कितीही सोन्याची असो, या प्रसंगी नव्या दमाच्या कवींवरून ती फिरवायलाच हवी का? अगदी गौरवास्तवही?? प्रस्तुत प्रस्तावना सुरुवातीस (बुद्ध्याच?) दिली नसली तरी (उलट अधिकच) औत्सुक्याने मागची पाने प्रथम (कवितेपूर्वी) वाचली जाणे अपरिहार्य!! आणि कविता अशी पूर्वग्रहदूषिततेने वाचली जाणे कवीचे दृष्टीने अन्यायकारक—वाचकाचे दृष्टीनेही हानिकारक. एरवी कवितेचा (मोजकाच) वाचक हाही कविता वाचता वाचता कवीच होऊन जाणारा.

श्री विंदा करंदीकरांऐवजी बलदंड आणि जातीवंत कवींनी केव्हाच प्रांजळपणे सांगून टाकले आहे— 'कविता कशी भोगात्री—कपडे काढून'— मग प्रस्तावनांची ही 'तयार कपडयांची दुकाने' कविता संग्रहाच्या 'दर्शनी' वा 'परसदारी' तरी कशाला? तेव्हा एयं गुणविशिष्ट कवितासंग्रहास तरी प्रस्तावना न घेणेच इष्ट ठरले असते. त्या पानांमध्ये रसिकांस आणखी सात—आठ कविता मिळाल्या तरी उत्तम. कधी पुस्तक 'मोठे' व्हावे म्हणून पानपूरक अशी प्रस्तावना!

भेसळ, फसवणूक, (तसेच तीव्र, भडक—शब्दबंबाळपणे भावनांची आरास) —हे

आजकाल कुठे नाही? कोणतेही 'क्षेत्र' यातून सुटलेले नाही, निर्मिती प्रक्रियेचे अविभाज्य अंग– 'लेखनकला' हे देखील याला अपवाद नाहीच; परंतु 'होड्या' या प्रस्तुतच्या हेमंत गोविंद जोगळेकरांच्या संग्रहाने वाचकाची अशी कोणतीही फसवणूक होणार नाही. एवढी कविता चिरस्पर्शी. मधल्या काही वर्षांनंतर, वाचताच आकळण्याचा, अनुभूतीशी समरसून जावे असा एक नवीन पायंडा या कवितेने अपरिहार्यपणे पाडलेला–तो निश्चित स्वागतार्ह.

'होड्या'
कवी –हेमंत गोविंद जोगळेकर.
'श्री' प्रकाशन
किंमत : १० रु.

## निळ्या पहाडाच्या कविता

'निळ्या पहाडाच्या कविता !' –औरंगाबाद येथील कवी प्रा. बापूराव जगताप यांच्या चोपन्न कवितांचा हा संग्रह. मोजून घ्यावी अशी प्रत्येक कविता खणखणीत, त्या आवाजातून, सच्च्या ओळीओळींतून प्रकाशाची लखलख सांडते आहे. कधी निळ्या पहाडांतून लक्ष प्रतिध्वनींनी वेढलेली ती पहाडी आरोळी तर कधी खर्जातली पहाडी धून.

'निळ्या पहाडातच ती जन्माला आली'– 'तेव्हा आभाळ दरदरलं, 'धरती हादरून गेली', 'मंदिरांचे कळस ढासळले' आणि 'निळ्या पहाडाचं गीत गाण्यासाठी निळ्या पहाडात युगपुत्र जन्माला आले.'

'अधोपतनाची सांगता प्राचीन अध्यात्मानं कधीच केली आहे. त्याच्या पानापानांवर आमच्या पावलांचे घोष आहेत. निळ्या पहाडात आता शोषणमुक्त तीर्थ जन्माला आले आहे!' पहाडातून आलेले रस्ते आमची बंडखोरी घोषित करीत आलेत.'

कित्येक तपे मानवानेच मानवावर फत्तर बनून अन्याय करावा, मानवानेच मानवाचे शोषण करावे हे अमानुष घडते आहे, अजूनही धडधडीत घडते आहे व उघड्या डोळ्यांनी आपण केवळ सारे पहात आहोत! असे असूनही, सहाव्या कवितेत, 'प्रकाश पेरलेल्या वाटा आमच्या... कुणी भेटलाच रस्त्यात तर सन्मानानं सोबतही करू. पेटलेला वणवाही तुडवत आलोय– कुणी समोर केलाच हात तर सारे काही विसरून आमची वादळांची घोडीही बसायला देऊ.' ही नितांत सौजन्याची, सामोपचाराची भाषा या काळाला लाजवून जाणारी.

'पहाडातून आलेले रस्ते, आमची बंडखोरी घोषित करीत आलेत, आता वाडे राजवाडेही रस्त्यावर येतील, आमच्या उघड्या जगात, त्यांचे तत्वज्ञानीही बसतील, रस्त्यावर पोथ्या उघडून, तेव्हा ही महाकाव्य, पुराण, ज्ञान कुचकामी ठरेल.' या तिसऱ्या कवितेतील पहिले काही उद्‌गार खरे असले तरी 'महाकाव्य–ज्ञान–कुचकामी ठरेल' हा आकसाने आत्मघाती आक्रस्ताळेपणा वाटतो. माणसे क्रूर, दुष्ट, अन्यायकारक असतील परंतु 'महाकाव्य', 'ज्ञान' ही कोणत्याही व्यक्तीसाठी चिरकालीन विकासाची दालने. एका फटकाऱ्यात त्यांना 'कुचकामी' ठरवून टाकणे हे वड्याचे तेल वांग्यावर काढण्याऐसे विसंगत वाटते. पुढे याच कवितेत– मग– 'एक निळा देश अवतरतो आहे. तो देश साम्यवादी आहे. तो देश मानवतावादी आहे. तो देश माणसांच्या सृजनाचा उद्‌गाता आहे' (यंव आहे नि त्यंव आहे!) हे कवितातून लिहा–वाचण्याला ठीक– परंतु साम्यवादी देश अवतरत नाही तोवरच! कोणत्या तथाकथित बंडखोर कविता छापायच्या व कोणत्या 'नाहीशा' करायच्या असे ठीक कोण्डीबंद नियम 'तो साम्यवादी' देश करणार नाही कशावरून? मग हुकुमशाही, गरीबही का होईना लोकशाही कदाचित् यादही दिलावून जाईल. अर्थात सगळीच स्वप्ने भावूक, हळवी नसली व चिरेबंद कातळी असली, तरी शेवटी सारी स्वप्नेच; पण मग वास्तवात, या 'त्याच ज्ञान' भाषेतील सर्वसामान्यांस पुष्कळशा क्लिष्टच अशा ओळी लिहून कसे भागेल??

एकोणचाळीसावी कविता, 'हजारो पहाड सोबत घेऊन आलोय, अशी घाबरून जाऊ नकोस' हा संसार दोघांचाच नाही, ह्याचं भान असू दे', 'हजारो पहाड सोबत घेऊन आलोय, किमान एक तरी पहाड काळजावर ठेव.' या काही ओळी, संपूर्ण कविताच विलक्षण मनस्वीपणे झालेली. बेचाळीसाव्या कवितेत, 'निळ्या पहाडांच्या कुशीतला मी प्रकाशयुगाचा कोलंबस'– वास्तवाचे भान करण्यात सहजी गुंफून जाणारी ही निखळ कविताही लक्षणीय.

एकेचाळीसावी कविता–जीवघेणी–मनाचा लचका तोडून जाणारी. थोडक्या ओळीत आभाळाएवढा आशय सामावणं हे सर्वांचं यश. पूर्ण कविता उद्‌धृत केल्यावाचून राहवत नाही. 'पंख छाटलेली असंख्य पाखरं थव्याथव्यांनी कोसळतात, मनाच्या पारंव्या गदगदून जातात– त्यांच्यासाठी गाणं गावं.. ही कुण्या मुलखाची पाखरं, एकदा त्यांच्या मुलखात जावं, नाहीतर मुकं होऊन, पारंव्यावर जाहीर फांशी जावं.'

कविता तिसावी, शेवटच्या दोन ओळीत डोक्यात आणि पोटात आयुष्यभर पेटलेल्या जाळाचं सामर्थ्य आणि लालपिवळा भळभळणारा उजाड उजेड–सुन्न करून टाकणारा. बाराव्या कवितेत, 'त्यात माणुसकीची बोडकी झाडं सावलीसाठी, आमच्या प्रश्नांना चितेवरच रचलेलं, तर उत्तरं शोधायची कुठे?' याही ओळी वर्षानुवर्षं अनुत्तरित! जोवर स्वतःला बिनदिक्कतपणे 'माणूस' म्हणवून घेणाऱ्याची मने जागी होत नाहीत, जी तथाकथित 'माणुसकी' केवळ 'हाऽऽ हाऽऽच करते,' तिची, 'माणुसकीची बोडखी झाडं सावलीसाठी' एवढी भलावण केली गेली तरी– अतिमानवी– वाटावे असाच सध्याचा काळ. माणसाने माणसाला थोडे जाणले, ओळखले तरी माणुसकीचा धर्म निळ्या पहाडावरून गर्जू लागेल– क्रांतीचा जयजयकार...

प्रस्तावना याही संग्रहाला आहे. 'होड्या'चे परीक्षण करताना 'प्रस्तावने' विषयी व्यक्त केलेले विचार अर्थात येथेही कायम. तरी पण प्रस्तावनेची अडथळ्याची शर्यत एकदा का पार केली–(भाग घेतलाच तर–वाचण्यात!) की सुजाण वाचक व कविता यांचा मनोहर मिलाफ– दुरूनच नव्हे– जवळूनही–' निळ्या पहाडाच्या कविता' साजऱ्या... शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या.

–सौ. अंजली ठकार

निळ्या पहाडाच्या कविता
बापूराव जगताप
कला प्रकाशन
किंमत : १५ रुपये

## सामान्य ललितलेख

# ' ऋतुगंध '

' दैनिक मराठवाडा ' मधून प्रसिद्ध झालेले प्रा. सुषमा मुंजे यांचे ललित लेख ' ऋतुगंध ' या संग्रहात एकत्रित केले आहेत. सुषमा मुंजे या मराठी आणि इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासक आहेत. काव्याशी त्यांचं नातं जवळचं आहे हे जाणवतं. निसर्गाची त्यांची ओढ तर विषयातूनच व्यक्त होते. मानवी जीवन–मग ते शहरातले असो की खेड्यातले, निसर्गाशी निगडित असते. ऊन, पाऊस, वारा, चांदणं, आकाश सगळे आपले सखेसोबती असतात. लेखिकेने प्रत्येक महिन्यात निसर्गात होणारा बदल टिपला आहे.

दुर्गाबाई भागवतांचे ' ऋतुचक्र ' वाचलेल्या वाचकाला मुळात ही कल्पना नवीन नाही आणि या लेखांवर तर दुर्गाबाईंच्या भाषेचीही छाप जाणवते.

ऋतूंमधला, निसर्गातला बदल न कळत माणसावर परिणाम करून जातो. पहिल्या पावसाच्या शिडकाव्याने हवेत दाटून राहिलेला मृद्गंध बालपणीच्या स्मृतींना उजाळा देतो तर चांदण्याच्या संगतीत माणसाचं तारुण्य जागं होतं.

कविप्रवृत्तीची लेखिका क्षणोक्षणी भावुक बनते. भाषाही तशीच अबोध, गूढ, नकळत वास्तवाला दुरावत जाते.

काव्यावर लेखिकेचे विलक्षण प्रेम आहे हे अवतरणांच्या पेरणीवरून जाणवतं. संस्कृत, मराठी कवींची कितीतरी अवतरणे या लेखातून आढळतात.

पिंजरे, घराघरांचे रूप वेगळे, वृंदावनातील तुळस हे लेख तर ' लघुनिबंध ' च आहेत. पूर्वी मॅट्रिकच्या मराठीच्या पेपरात निबंधाच्या प्रश्नात तीन विषय निबंधाचे तर दोन लघुनिबंधाचे असत. त्यात असेच छत्र्या, भिंती, चष्मे असे विषय असत.त्याचीच आठवण हे लेख वाचताना झाली. ' पिंजरे ' या लेखात झाडांच्या संरक्षणासाठी घातलेल्या पिंजऱ्या कडून लेखिका आत्म्याच्या पिंजऱ्यापर्यंत जाते.

एकूणच या लेखांतून सामाजिक जाणिवेचा अभाव आढळतो. ओढून–ताणून तो भाव आणायलाच हवा असं नाही; पण आजचं आजूबाजूचं जग पाहताना विचारी माणसाला त्यापासून दूर राहणे अवघड वाटते.

विचारात ' तोचतोपणा ' आढळतो. पुस्तक निर्मितीही सदोष आहे. लांबलचक शुद्धिपत्र जोडूनही पुस्तकातल्या अनेक चुका त्यात समाविष्ट झालेल्या नाहीत. हे टाळणे अवघड नव्हते. लेखकाने आपले पुस्तक निर्दोष होण्यावर भर देणे ही गोष्ट आवश्यक आहे.

—सौ. शशिकला उपाध्ये

ऋतुगंध
प्रा. सुषमा मुंजे
परिचय प्रकाशन, औरंगाबाद
पृष्ठे १०८,
किंमत : १७/५० रु.

---

# युवकवर्षानिमित्त

विश्व युवावर्ष–१९८५ आणि सानेगुरुजी रुग्णालय व महाराष्ट्र आरोग्य मंडळ यांच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र आरोग्य मंडळातर्फेच यदुनाथ थत्ते यांचं युवाशक्तीला आवाहन हे नवं पुस्तक प्रसिद्ध झालं आहे. संपूर्ण क्रांतीची घोषणा करून व्यापक युवक चळवळ उभ्या करणाऱ्या लोकनायक जयप्रकाश यांना हे पुस्तक अर्पण केलं आहे.

६५ पानांच्या या छोट्या पुस्तकात एकूण अकरा लेख आहेत. युवक आणि युवकवर्ष म्हणजे काय, त्यांच्यापुढील प्रश्न कोणते आहेत आणि त्यांचा अग्रक्रम लक्षात घेऊन ते कसे सोडवायचे आहेत अशा ढोबळ तीन विषयांखाली हे अकरा लेख विभागले आहेत. ' १९८५ च का ?', ' युवा कोण ?', ' दोन पिढ्यांतील अंतर ', ' युवकांपुढील प्रश्न ' असे काही लेखांचे मथळे आहेत. यावरून साधारणपणे पुस्तकाच्या स्वरूपाची कल्पना यावी. यदुनाथ थत्ते यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे की, राष्ट्राचे यौवन जागे करण्याचा हा महोत्सव आहे. हा अंतःस्फुरणाने साजरा का होऊ नये ? तसंच कर्मकांड आणि अमूर्ताची आराधना यांच्या कैचीत युवाशक्ती क्रियाशून्य बनण्याचा धोकाही त्यांनी सांगितला आहे आणि या पुस्तकाचा उद्देश विश्व युवावर्षाचं आवाहन स्पष्ट करण्याचा आहे असं म्हटलं आहे.

पुस्तकाचा उद्देश जरी हा असला तरी थत्ते यांच्या लिखाणात आवाहनातला उत्स्फूर्तपणा, जिवंतपणाचा अभाव आहे. सर्व लेख एका मध्यमपट्टीतले आहेत. हा सूर आजच्या तरुण पिढीला कितपत जवळचा वाटेल शंकाच आहे. पुस्तकाच्या शेवटी ' एवढे नक्कीच करता येईल ' या नावाचा एक लेख आहे. त्यात वेगवेगळ्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या जन्मदिन आणि मृत्युदिन प्रसंगी युवकवर्षात काय करता येईल याची एक जंत्री दिली आहे. त्यामध्ये युवा शक्तीची निदर्शने, न्याययात्रा महिला आयोगाची निर्मिती, जयप्रकाशजींच्या ' संपूर्ण क्रांती यह नारा है, भावी इतिहास हमारा है ' या घोषणेचा विचार करावा असे काही कार्यक्रम दिले आहेत.

मला तर वाटतं आजच्या तरुण पिढीला पहिला राग असेल तर जयंत्या आणि मयंत्यांच्यावेळी केल्या जाणाऱ्या पोकळ बडबडीचा आणि आश्वासनांच्या घोषणांचा. त्यांना हवं आहे चालू युगाशी नातं सांगणारं धडक काम, जे त्यांना आव्हानात्मक वाटेल. वर सांगितलेले कार्यक्रम तरुणांतील फारच छोट्या गटाला आव्हानात्मक वाटतील. या शेवटच्या लेखामुळे आधीच्या काही लेखांमधला वाचकांशी जमलेला सूर तुटतो आणि फार मोठ्या तरुण गटाशी दुरावा निर्माण होतो.

तरीही युवकवर्षाच्या सुरुवातीलाच प्रसिद्ध झालेलं हे पुस्तक युवक विचाराला नक्कीच चालना देईल.

—मेधा

युवा शक्तीला आवाहन
यदुनाथ थत्ते
पृष्ठे : ६४
मूल्ये : ८ रुपये.

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# कशासाठी ?

नुकतेच एक पालक भेटले होते. खूप बरं वाटलं त्यांना भेटून. स्वतःबद्दल आणि मुलांबद्दल मोकळेपणानं विचार करत होते. बोलत होते. दोन मुलं आहेत त्यांना. एक मुलगा २० वर्षाचा, एक मुलगी १६ वर्षाची.

तक्रार अशी होती की, मुलं अगदी व्यवस्थित नाहीत. काहीही कुठेही टाकतात. मी स्वतः सारखे पसारे आवरत असतो. घर नीट ठेवत असतो; पण त्यापासून मुलं काही शिकत नाहीत. माझंच रक्त आटतं. आताशा तर मला असं वाटायला लागलंय की त्यांना वागायचं तसं वागू द्यावं. होतं काय की मी व्यवस्थित म्हणून ठेवलेली वस्तूच मला खूप वेळा सापडत नाही आणि त्यांना मात्र सगळ्या पसाऱ्यातून त्यांच्या वस्तू नेमक्या सापडतात मग कशाला आटापिटा करायचा? त्यांना पण वाटत असणार काय बाबा सारखे कटकट करतात म्हणून ?

त्यांनी स्वतःच स्वतःचं विश्लेषण करून हे सगळं बोलून दाखवलं त्याचं मला कौतुक वाटलं. मी त्यांना म्हटलंही की एवढं मोकळं मन ज्या पालकाकडे असेल त्यानं मुलांना निम्मं जिंकलंच म्हणून समजा.

पुढची काळजी होती मुलगी १६ वर्षाची झाली तरी अजून अभ्यास करत बसते तिथेच खायला घेऊन बसते आणि तिथेच बसून आईजवळ पाणी मागते. 'मला याचा राग येतो' ते म्हणाले, 'मी हिला म्हणतो तू वंद कर हे लाड. तिचं तिला पाणी घ्यायला सांग उठून. तू तरी कुणाकुणाचं करणार आणि दमणार? एवढी मोठी झाली मुलं तरी तुझं काम कमी होत नाही. याला काय उत्तर आहे तुमच्याजवळ ?'

खरं तर अशा विचारलेल्या कोणत्याच प्रश्नाला कोणत्याच सल्लागाराकडे नेमकं उत्तर नसतं, प्रत्येक मूल वेगळं असतं, प्रत्येक पालक वेगळा असतो, प्रत्येक आईवडलांचं एकमेकांशी असलेलं नातं वेगळं असतं, प्रत्येक घर वेगळं असतं, प्रसंगांची पार्श्वभूमी वेगळी असते. सल्लागार माणूस काही उत्तरं सुचवू शकतो, पर्याय सुचवू शकतो आणि अशा घटना घडतात त्यामागची प्रत्येकाची मनोभूमिका स्पष्ट करून दाखवू शकतो.

सोळाव्या वर्षी मुलगी बसल्या जागी पाणी मागते ती काही एकदम अशी वागायला लागत नाही. जन्मल्यापासून तिला असं पाणी मिळत असतं. फक्त ती सोळा वर्षांची झाली (१४, १५ किंवा १५, १८ पण असेल) किंवा मोठी झाली की आईवडलांना ते टोचायला लागतं. तिच्याजागी मुलगा असला तर कदाचित ते कमी टोचण्याची शक्यता आहे; पण ही वयात येणारी मुलगी उद्या सासरी अशीच वागली तर...असाही एक पदर ह्या टोचण्याला असेल.

अधल्यामधल्या वयात आता तू मोठी झालीस आपल्या हातानं उठून पाणी घ्यायचं. मोठ्या माणसाकडं मागायचं नाही हे तिला समजावून सांगितलेलं असेल का? अशा कितीतरी गोष्टी मुलांना योग्य वयात योग्य प्रकारे समजावून सांगून त्यांना वाढायला मदत करण्यात आईवडलांचं कौशल्य असतं.

पण आपण पालक फार लहरीपणा करतो बऱ्याच वेळा. एखाद्या प्रसंगी आपली फजिती झाली, मुलानं लाज काढली की आपण खडबडून जागे होतो आणि मग कंबर कसून मुलाला शिस्त लावायला पाहतो. आपलं मूल मोठं झालंय. काही गोष्टी सांगण्याचा तसंच काही गोष्टी न सांगण्याच्या वयाचं झालंय हे आपल्याला कधीकधी उशिरा उमगतं आणि मग आपली धावपळ सुरू होते. कित्येकदा एखाद्याच सवयीच्या, एखाद्याच प्रसंगाच्या मागे लागून आपण पोरांना भंडावून सोडतो; पण त्यामागचं तत्त्व काय, मुलानं काय शिकायला हवंय ते आपण विचार करून बोलत नाही.

आता आईकडे पाणी मागण्याचा प्रसंग सगळ्याच मुलांच्या न पालकांच्या अनुभवात येणार. यात नेमकं काय टोचतंय आपल्याला?

मूल आळशीपणा करतं आहे.
मुलाला आईच्या कष्टाची पर्वा नाही.
आई मुलाला लाडवून ठेवतेय.
आई मुलाला वाईट वळण लावतेय.
मूल उर्मट होतंय.
मूल आईला गृहीत धरतंय.
मूल त्याच्या वयानुसार वागत नाहीय.
मूल मोठ्या माणसाचा मान राखत नाही

आणि अशा आणखी काही आपल्या मनात येणाऱ्या गोष्टी. ह्या गोष्टी घडत नसतील तर मुलीनी आईकडे पाणी मागणं आणि आईनी ते देणं यात काही वाईट नाही. म्हणजे अशा बाबतीत घरात असा काही नियम करता येणार नाही की आजपासून तुला आई पाणी देणार नाही. अशा नियमानी मुलीचा अपमान होईल; पण तिला तिच्या वागण्यानी इतरांच्या मनात कायकाय येऊ शकतं याची जाणीव जरूर करून द्यायला हवी. आपल्या वागण्याचा अर्थ असा होतो, आईवडलांची अपेक्षा ही आहे हेही कित्येकदा लक्षात येत नाही. ते समजवून दिलं की, ९९ टक्के काम होतं.

शेवटी घरात एकमेकांनी एकमेकांना मदत करणं आवश्यकच आहे. आई म्हणून मीही माझ्या मुलांना पाणी देत असते. त्यांच्याकडेही पाणी मागत असते. मूल केव्हा खरी गरज म्हणून पाणी मागतंय नि केव्हा आळशीपणा करतंय ते मला कळतही असतं. एखाद्यावेळी आळशीपणाही करायला मी मोकळीक देते. तसंच मीही कधी 'मला अगदी उठायचा कंटाळा आलाय पाणी देतोस का?' असंही विचारते. थोडक्यात याला असे नियम नसतात. गरज असली तरच मी करीन. आळशीपणा दिसला तर करणार नाही अशी काटेकोर विभागणी मला करता येत नाही. तेव्हा पाणी मागणं आणि देणं ही प्रेमाची देवाण-घेवाण आहे. मुलाला कळायला हवं, तो त्याचा हक्क नाही किंवा असं राबणं हेच आईचं कर्तव्य नाही. एवढं समजलं तरी काम झालं. हक्क, कर्तव्य, दादागिरी, उर्मटपणा यांचा वास आला तर मी आई म्हणून मुलाला वळण लावायची भूमिका जरूर पार पाडीन

पृष्ठ २८ वर

# पूर्णत्वासाठी धडपडणारा कलावंत

● रघुपती भट्ट ●

आजच्या पिढीला त्याचे नाव फारसे ठाऊक नाही; पण त्याच्या काळात मात्र त्याचे नाव प्रत्येकाच्या तोंडी होते. समीक्षकांनी त्याच्या प्रत्येक कामाचे कौतुक केले होते. त्याचा एक एक चित्रपट म्हणजे अमर कलाकृती. आत्यंतिक परिश्रमातून तो व्यक्तिरेखा साकार करायचा. तसे त्याचे फारसे चित्रपट नाहीत. फक्त तेवीस; पण या तेवीस चित्रपटातून जो मौल्यवान आविष्कार त्याने दाखवला त्याची सर इतरांच्या तेवीसशे चित्रपटांनादेखील नाही. त्याच्या चित्रपटांनी फार गल्ला कधी गोळा केला नाही; पण ज्यांना अत्युत्कृष्ट आविष्कार अनुभवण्याची इच्छाआहे,त्यांच्यासाठी अनमोल असा खजिना बहाल केला. विशेष म्हणणे ज्याला 'मूर्तीमंत अभिनय' म्हटले जाते त्याची मूर्ती असूनसुद्धा दिग्दर्शकांना तो डोकेदुखी वाटे कारण स्वतःच्या संकल्पना राबवल्याखेरीज तो कधीच रहात नसे. स्वतःच्या कल्पना राबवण्यासाठी पटकथा, दृश्ये,प्रवेश आणि सेटिंगसुद्धा तो बदलायला लावत असे आणि चरफडत का होईना दिग्दर्शक ते बदलत असत.

कारण 'पॉल म्युनी' म्हणजे शतकातून एकदा जन्माला येणारा असामान्य कलावंत होता.

त्याचा जन्म एका ज्यू मातापित्यांच्या पोटी झाला. नाथान फिलीप हा त्याचा बाप, एक नटच होता. गावोगाव फिरणारा नट. त्याची आई सॅली मात्र चांगल्या सधन घरची कन्या होती. एका नटावरोवर लग्न केल्याबद्दल तिचा सधन बाप इतका रागावला की त्याने सॅलीशी सर्व संबंध तोडले आणि त्याने आपली सर्व संपत्ती दुसऱ्यांनाच बहाल करून टाकली. सॅली नाथानबरोबर गावोगाव फिरत राहिली.

अशा मातापित्याच्या पोटी 'पॉल म्युनी' जन्माला आला होता.

गावोगाव फिरणाऱ्या या जोडप्याला वाटेल तेथे राहायला लागायचे आणि अक्षरशः शिल्लक राहिलेले शिळे अन्न खायला लागायचे. म्युनीच्या जन्मानंतर या दांपत्याने अमेरिकेला जायचा निर्णय घेतला. अमेरिकेत सॅलीचा एक भाऊ फेरीवाला होता आणि एकाचे हॉटेल होते. प्रथम ते लंडनला आले. तेथे ज्यू वसाहतीत त्यांनी काही नाट्यप्रयोग केले. तेथे पैसे जमल्यावर प्रथम नाथान अमेरिकेला गेला. जरा बस्तान बसल्यावर त्याने कुटुंब बोलावून घेतले. न्यूयॉर्कमधील ज्यू वस्तीत ते राहू लागले. नाथानने आणखी काही कलाकार जमवले आणि तो 'व्हॉडव्हील' म्हणजे आपल्याकडे कलापथके असतात त्याप्रमाणे कार्यक्रम करून उदरनिर्वाह करू लागला. म्युनी आणि त्याची भावंडे शाळा शिकून पुन्हा व्हायोलिनच्या तासाला जाऊ लागली. आपल्या मुलांना वादक करण्याचे नाथनचे स्वप्न होते.

काही वर्षांनी त्यांनी न्यूयॉर्क सोडले. न्यूयॉर्कमध्ये स्पर्धा फार होती. तेथे नाथानला थोडेसे जाचत होते. ते क्लिव्हलँडला आले आणि नाथान आणि सॅली दोघांनाही एका ज्यू नाटक कंपनीत कायम स्वरूपाचे काम मिळाले.

या क्लिव्हलँड शहरातच 'पॉल म्युनी' ने रंगभूमीवर प्रथम पदार्पण केले.

'म्युनी' ला रंगभूमीवर येण्याची खूप इच्छा होती; पण नाथानला ते पसंत नव्हते. आपल्या मुलांनी व्हायोलिन वादक बनावे, नट बनू नये असे त्याला वाटत होते; पण कंपनीतील एक कलावंत आजारी पडल्यामुळे ऐन वेळी म्युनीला वेशभूषा करण्यात आली आणि वयाच्या बाराव्या वर्षीच भरघोस दाढी लावून म्युनीने रंगदेवतेला पहिला मानाचा मुजरा केला. त्याने पहिल्यांदाच केलेले हे म्हाताऱ्याचे काम त्याने इतके समरसून केले की मॅनेजरने आठवड्याला दहा डॉलर पगारावर त्याची तात्बडतोब नेमणूक करून टाकली. या पैशामुळे एकंदरीत प्राप्तीत भर पडत असल्यामुळे नाथानने त्याला मान्यता दिली.

## रंगदेवतेची आराधना, बेल्लाची ओळख

आणि त्या दिवसापासून म्युनीचे शिक्षण सुरू झाले. त्यांची गुरू होती साक्षात रंगदेवता. चेहऱ्याला रंग लावून, दाढ्या चिकटवून वेगवेगळ्या व्यक्तिरेखा साकारताना म्युनी शिकत होता. भूमिका वाटेल त्या असायच्या आणि म्युनी मेकअप करून आरशासमोर बसून अधिक परिणामकारक अभिनय कसा करता येईल याचा अभ्यास करीत असे. एक मजेदार परिणाम त्याने शोधला. डोळ्यांना पापण्यांवर सोनेरी कागद चिकटवून त्याच्यावर प्रकाश पडला की, तो आग ओकायला लावत असे.

पुन्हा नाथानने आपला मुक्काम चिकॅगोला हलवला. तेथे त्याने एक थिएटर भाड्याने घेतले. दहा सेंटला तो तेथे नाटके दाखवू

लागला. त्यावेळी त्यांची परिस्थिती खराब असल्यामुळे कुटुंबातील प्रत्येकाला या नाटकात काम करायला लागायचे.

म्युनीचा भाऊ जोसेफ म्हणतो, '१९१२ च्या दरम्यान 'बारकोच्या' नावाचे एक ज्यू नाटक आम्ही सादर केले होते. त्यातील म्युनीचे काम पाहताना मी अक्षरश: थरारून गेलो. 'म्युनी' चांगला कलावंत आहे हे मला माहिती होते; पण त्या क्षणी मी ओळखलं की म्युनीमध्ये ती शतकातून एकदा जन्माला येणारी महान कला आहे.

१९१३ मध्ये म्युनीचा बाप, ज्याचे आयुष्य धडपडण्यात, नाटके करण्यात गेले त्याने 'न्युमोनिया'चे निमित्त होऊन या जगातून एक्झिट घेतली. सॅलीवर सगळ्या मुलांची जबाबदारी पडली. तिने दुसऱ्या एका फिरत्या नाटक कंपनीत काम मिळवले. म्युनीने काही काळ जुने कपडे विकण्याचा धंदा करून पाहिला, ते जमत नाही म्हटल्यावर तो पुन्हा आईच्या कंपनीत सामील झाला.

या कंपनीबरोबर म्युनी सर्वत्र हिंडला. त्याच्या 'यिद्दीश' भाषेमध्येच ही कंपनी प्रयोग करीत असे. इब्सेन, स्ट्रींडबर्ग यांची नाटके, इतर फार्स वगैरे तो अगदी सफाईदारपणे सादर करी.

१९१७ सालात त्याला बोस्टनच्या एका कंपनीने बोलवले; पण १८ सालातील एन्फ्युएंझाच्या साथीत या कंपनीची वाताहात झाली. मग म्युनी फिलाडेल्फियामध्ये आला. काही बाही करून पोट भरण्याच्या नादात तो असताना आणखी एका न्यूयॉर्कच्या कंपनीने त्याला हेरले आणि आठवड्याला ४५ डॉलरवर नेमून घेतले. या 'यिद्दीश कला रंगभूमी' मध्ये मोठमोठे कलाकार होते. म्युनीने खरीखुरी रंगभूमी असा त्याचा उल्लेख केलाय. या कंपनीबरोबर म्युनी युरोप अमेरिकेत हिंडला. अनेकविध भूमिका साकार करताना म्युनी शिकत होता. या काळातच समीक्षकांचे लक्ष त्याच्याकडे वेधले. रोमा रोलाच्या 'वूल्वझ्' या नाटकातील त्याच्या भूमिकेची प्रशंसा करताना न्यूयॉर्क टाइम्सने लिहिले. 'म्युनी वायझनफाईंड आपल्या अभिनयाने रोमा रोलाचे तत्त्वज्ञान साकारतो.' म्युनीच्या अभिनय कौशल्याच्या त्याच्या पडद्यामागच्या गमतीजमती आता चर्चिल्या जाऊ लागल्या होत्या.

---

खरं नाव : म्युनी वायझनफाईंड
जन्म : २२ सप्टेंबर १८९५ ला पोलंडमध्ये
पहिला चित्रपट : 'द व्हॅलिएंट'
एकूण २३ चित्रपट, ५ वेळा ऑक्सरसाठी शिफारस.
गाजलेले चित्रपट : 'स्कारफेस' 'आय ॲम अ फ्युगिटिव्ह फ्राम् अ चेन गँग' 'बॉर्डर टाऊन' 'ब्लॅक फ्युरी' 'द स्टोरी ऑफ लुई पाश्चर' 'द गुड अर्थ' 'द लाइफ ऑफ एमिल झोला' 'ज्वारेझ' 'द लास्ट अँग्री मॅन' (शेवटचा चित्रपट)
१९३६ साली 'द स्टोरी ऑफ लुई पाश्चर' बद्दल उत्कृष्ट अभिनयाचे 'नोबेल पारितोषिक' –ऑस्कर पुरस्कार मिळाला.
गाजलेली नाटके : 'काउन्सलर ॲट लॉ', 'अ फ्लॅग इज बॉर्न', 'इनहेरिट द विंड', 'लास्ट क्लिअर चान्स (प्ले हाउस ९०) 'ॲट द ग्रँड'
मृत्यु : २५ ऑगस्ट, १९६७

---

या काळातच कु. बेल्ला फिंकलशी त्याचा परिचय झाला. ही बेल्ला सुंदर होती आणि एक उत्तम अभिनेत्री होती. म्युनीप्रमाणे तिचा बापही एक नट होता. फरक एवढा होता की, ती लहान असताना एके दिवशी तिच्या बापाने संतापाच्या भरात तिच्या आईवर गोळी झाडून स्वत: आत्महत्या केली होती. तिची आई अपंग होऊन जगली.

अशा या बेल्लाचे आणि म्युनीचे सूर जुळले आणि १९२१ सालात ते दोघे विवाहबद्ध झाले. गंमत म्हणजे लग्नादिवशीसुद्धा म्युनीला वेळ नव्हता. लग्नानंतर पंधरा दिवस म्युनीला बेल्लाला भेटायला जमले नाही. तो फक्त फोनवरून तिची चौकशी करायचा एवढेच.

आतापर्यंत म्युनी यिद्दीशमध्ये काम करीत होता. त्याची इंग्लिशमध्ये एंट्री झाली ती 'वुई अमेरिकन्स' या नाटकातून. आल्बर्ट लेव्हिस हा त्या नाटकाचा सहनिर्माता त्याच्या भाषेत.

'आम्ही एडवर्ड रॉबीनसनला वुई अमेरिकन्ससाठी निवडला होता. त्याने २ आठवडे काम केलं; पण 'थिएटर्स गिल्ड'शी बांधला असल्याने त्याला माघार घ्यावी लागली. सॅम हॅरीस आणि मी नायकासाठी अडलो होती. तेवढ्यात एकाने म्युनी वायजनफाईडचे नाव सुचवले. आम्ही त्याचे एक नाटक बघितले. शेवटच्या अंकात त्याची एंट्री होतो. त्याचे काम उत्कृष्ट झाले होते. नाटक संपल्यावर त्याची ओळख झाली तेव्हा मी थक्क झालो. तो अगदी तरुण होता आणि त्याने साकार केलेली भूमिका मात्र म्हाताऱ्याची होती.

या नाटकाचे ब्रॉडवेवर ११८ प्रयोग झाले. म्युनीची खूप स्तुती झाली. त्यानंतर 'फोर वॉल्स' नावाच्या नाटकात म्युनीला तरुणाची भूमिका करण्याची संधी मिळाली.

आल्बर्ट लेव्हिसच्या सूचनेवरून फॉक्स स्टुडिओचा मालक आणि निर्मितीप्रमुख यांनी म्युनीचे ओ नीलच्या हेअरी एप् आणि मेरी वाइव्हज ऑफ विंडसर (शेक्सपियर) मधील काम पाहिले. त्यावर खुश होऊन त्यांनी म्युनीला ३ वर्षासाठी भरघोस पगारावर करारबद्ध केले.

बेल्लाला मात्र तो करार आवडला नाही. सिनेमा कंपनी म्युनीला वाटेल त्या सिनेमात काम करायला लावेल अशी भीती तिला वाटत होती.

### जबरदस्त कथानक-पाश्चर

म्युनी आणि बेल्ला हॉलिवूडला आले. त्याचे म्युनी वायजनफाईंड हे लांबलचक नाव बदलून ते सिनेमासाठी 'पॉल म्युनी' असं सुटसुटीत ठेवण्यात आलं.त्याच्यासाठी सुरुवातीला एक चित्रपट निवडण्यात आला पण नंतर 'पॉल म्युनी' हे नाव अजून अज्ञात आहे म्हणून त्याच्याऐवजी दुसऱ्याला घेण्यात आलं. त्याला राग येऊ नये म्हणून इतर



लग्नादिवशी
म्युनी आणि बेल्ला

चित्रपट त्याच्यापुढे ठेवण्यात आले त्यापैकी 'व्हॅलीएंट' त्याने पसंत केले. हा त्याचा पहिला चित्रपट. म्युनीचा आवाज, अभिनय आणि समज याच समीक्षकांनी कौतुक केलं. फक्त ६६ मिनिटाच्या या चित्रपटात म्युनीने एका मृत्युदंड झालेल्या कैद्याची भूमिका केली होती. हा कैदी आपल्या आईबहिणीला त्रास होऊ नये म्हणून आपलं नाव अज्ञात ठेवून मरतो. या चित्रपटाला फारसे यश मिळाले नाही पण म्युनी मात्र सर्वांच्या नजरेत भरला त्याच्या पहिल्या अकादमी पारितोषिकासाठी त्याची शिफारस झाली.

त्यानंतर 'सेव्हेन फेसिस' नावाचा चित्रपट फॉक्स प्रॉडक्शन्सनी काढला. यामध्ये म्युनीला एका म्हाताऱ्या म्युझियम व्यवस्थापकाची भूमिका होती. याची पटकथा चांगली नव्हती. हा म्हातारा स्वतःला डॉन जुआन, नेपोलियन वगैरे समजतो. यामध्ये अनेक भूमिका करण्याची संधी म्युनीला मिळाली होती पण अनेक अडचणींमुळे हा चित्रपट सर्वच दृष्टया अपयशी ठरला. या चित्रपटाच्या प्रिमियरच्या वेळी म्युनीला स्टेजवर आणण्यात आले होते; पण एवढ्या मोठ्या प्रेक्षावृंदाची सवय नसल्याने तो अक्षरशः गांगरून गेला होता.

पहिल्या दोन चित्रपटांची ही अवस्था पाहून म्युनी अतिशय वैतागला. त्याच्या निर्मात्यांचीही तीच अवस्था होती. म्हणून म्युनीने हॉलीवूड सोडून पुन्हा रंगभूमीकडे जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यांनी अक्षरशः सुटकेचा निश्वास टाकला.

ब्रॉडवेवर म्युनीची चलती होती; पण तेथे पण त्याची पहिली काही नाटके चालली नाहीत; पण अटकिनसनसारख्या समीक्षकांनी त्याच्या कामाची तोंड भरून स्तुती केली.

'स्कार फेस' नावाची एक पटकथा याच्याकडून त्याच्याकडे अशी हेलकावे खात पडून होती. अमेरिकेतील कुप्रसिद्ध गुंड अल् कापोन याच्या जीवनावर आधारलेली ही कथा हॉवर्ड ह्युजेसच्या हाती आली. त्याला कोणीतरी म्युनीचे नाव सुचवले. म्युनीला वळवण्यासाठीच तोच मनुष्य न्यूयॉर्कला आला म्युनीची हॉलिवूडला परत येण्याची इच्छा नव्हती; पण बेल्लाला ती कथा आवडली होती. तिने म्युनीला ती कथा स्वीकारायला लावली आणि हा निर्णय योग्य होता हे नंतर स्पष्ट झाले. या चित्रपटाने अनेकांना चांगला हात दिला. म्युनी आणि राफ्ट या दोघांचेही कौतुक झाले. या चित्रपटाने गल्लाही चांगला मिळवला आणि गुंड म्हणून म्युनीने अल् कापोन रंगवलाही छान.

स्कारफेसने गुंडांची प्रतिमा उजळलीय म्हणून सेन्सॉरने तो अडवला. त्या काळात 'काउन्सलर अॅट लॉ' नावाचे नाटक म्युनीने सादर केले. याचे ३७८ प्रयोग झाले. म्युनीने यात ज्यु वकिल रंगवला. या नाटकाने म्युनीला उत्तम किर्ती मिळवून दिली. वार्नर ब्रदर्सने त्याच्या यशाने भारावून जाऊन दीर्घ मुदतीसाठी त्याला करारबद्ध केले. त्याला आवडणारी पटकथा, नाटकात काम करणे आणि फिल्मीगणिक ५०,००० डॉलर्स असा तो करार होता.

'आय अॅम ए फ्युगिटिव्ह फ्राम ए चेन गॅंग' नावाच्या चित्रपटामध्ये म्युनीने एका निरागस माणसाचे काम केले. काही समीक्षकांच्या मते म्युनीचा हा पडद्यावरील सर्वश्रेष्ठ आविष्कार होता. याबद्दल दुसऱ्या अकादमी पारितोषिकासाठी त्याची शिफारस झाली. एका सत्यकथेवर घेतलेल्या या चित्रपटामध्ये दक्षिणेतील तुरुंगातील स्थितीचे वर्णन होते.

त्यानंतर 'वर्ड चेंजिस' नावाचा एक चित्रपट म्युनीने पुरा केला. तो काही चालला नाही. मग या दोन चित्रपटांचा दिग्दर्शक लिरॉय याने म्युनीला कॉमेडी करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार त्याने 'हाय नेल्ली' मध्ये काम केले. 'ब्लॅक फ्युरी' नावाचा कोळशाच्या खाणीवरील एक चित्रपट त्यानंतरचा म्युनीचा विशेष उल्लेखनीय म्हणता येईल. पुन्हा डॉ. सॉक्रेटिस नावाचे एक कथानक त्याने पुरे केले.

आणि या चित्रपटानंतर एक उत्तम कथानक त्याच्यासमोर आले. अनेक पटकथा नाकारत असताना 'द स्टोरी ऑफ लुई पाश्चर' नावाचे कथानक हेन्री ब्लांक नावाच्या निर्मात्याने त्याच्यासमोर आणले. महान संशोधक पाश्चरच्या जीवनाची ती कथा समोर आल्यावर म्युनी अक्षरशः त्याच्या प्रेमात पडला पण वार्नर ब्रदर्सचे त्या कथेबद्दल चांगले मत बनले नाही. प्रथम त्यांनी म्युनी नाराज होऊ नये म्हणून कथेत बदल करण्याची त्यांनी परवानगी दिली पण पुन्हा त्यांनी स्पष्ट नकारघंटा वाजवली. म्युनी पाश्चरच्या इतक्या प्रेमात पडला होता की ही पटकथा केवळ आपल्यासाठीच लिहि-

ण्यात आली आहे असे त्याचे मत बनले होते. त्यामुळे त्याने कंपनीशी सरळ सरळ असहकार पुकारला. जोपर्यंत पाश्चरचा विचार होत नाही तोपर्यंत आपण कोणत्याच पिक्चरमध्ये काम करणार नाही असे त्याने जाहीर करून टाकले. वार्नर ब्रदर्सना ते परवडणारे नव्हते. त्यांनी ' पाश्चर 'चे चित्रिकरण करण्याचे मान्य केले. त्यांनी कमीत कमी बजेट त्यासाठी मंजूर करून टाकले

बजेट इतके कमी होते की अक्षरशः मिळेल त्या गोष्टीवर भागवून घेऊन त्यांना पाश्चरचे चित्रिकरण पूर्ण करावे लागले. म्युनी अतिशय खुश होता. वार्नर ब्रदर्सना वाटत होते की म्युनी दाढी लावून शोभणार नाही. प्रेक्षक त्याला स्वीकारणार नाहीत असं वार्नर ब्रदर्सना वाटत होते; पण म्युनीने इतके समरसून जीव लावून काम केले की लोकांना साक्षात पाश्चर पडद्यावर उतरल्याचा भास झाला.

या चित्रपटाने म्युनीने प्रचंड अभ्यास केला. पाश्चरची जेवढी पुस्तके वाचता येतील तितकी त्याने वाचली. इतर शास्त्रज्ञांची चरित्रे देखील त्याने वाचली. पाश्चर इन्स्टिटयूटलासुद्धा त्याने अनेक भेटी दिल्या. पाश्चरच्या जीवनातील सगळे बारकावे प्रत्यक्षात आणता यावेत यासाठी त्याने हा अट्टाहास केला होता. त्याला जर त्यावेळी लिहिता आले असते तर पाश्चरच्या जीवनावर एखादी डॉक्टरेट त्याला सहज मिळवता आली असती, एवढा त्याचा अभ्यास झाला होता.

त्यामुळे अविश्रांत परिश्रमाने सजवलेला त्याचा ' पाश्चर ' समीक्षक आणि प्रेक्षक यांनी अक्षरशः डोक्यावर घेतला. त्याला या भूमिकेबद्दल ' ऑस्कर ' पारितोषिक मिळाले. इतर अनेक बक्षिसे तर त्याने पटकावलीच.

' लो बजेट 'मध्ये कुरकुरत तयार झालेल्या पाश्चरच्या यशाने वार्नर ब्रदर्स तर हललेच; पण अख्खं हॉलीवूड हादरलं. ऑस्कर घेताना म्युनी भारावून गेला होता. ' हे मिळवण्यात आयुष्यातील सर्वात मोठं थ्रिल अनुभवतोय.' असं तो म्हणाला. कृतज्ञता व्यक्त करताना इथून पुढे अनेक पारितोषिकांचा मान पटकावण्यासाठी प्रयत्नशील राहीन असं तो म्हणाला.

त्यानंतर आयर्व्हिंग थालबर्गने आणखी एक आव्हानात्मक भूमिका म्युनीला देऊ केली. ' द गुड अर्थ ' या पर्लबकच्या नोबेल पारितोषिक विजेत्या कादंबरीवर एम्. जी. एम्. चित्रपट काढणार होते. वार्नर ब्रदर्सनी आपला हिरो भाड्याने देण्याचे कबूल केले होते.


The Story of Louis Pasteur. With Josephine Hutchinson.

ऑस्कर विजेत्या ' द स्टोरी ऑफ लुई पाश्चर ' या चित्रपटात जोसेफाईन हचिनसन बरोबर

## दुसरं आव्हान – एमिल झोला

चिनी शेतकऱ्याच्या जीवनावर हा चित्रपट होता. प्रथम याही चित्रपटाबद्दल निर्माते फारसे उत्सुक नव्हते. थालबर्गने लाख लटपटी करून कंपनीची संमती मिळवली.

या चित्रपटात म्युनीला चिनी शेतकऱ्याची भूमिका करायची होती. त्याचा अभ्यास करण्यासाठी म्युनी सानफ्रान्सिस्कोच्या चायना टाऊनमध्ये चार महिने जाऊन राहिला. त्याचे बोलणे, चालणे, लकबी इ. सगळ्या गोष्टी चिनी माणसाप्रमाणे जमू लागल्यावरच त्याने चित्रिकरणात भाग घेतला.

अकरा वाजता चित्रिकरण चालू झाले की म्युनी वँग ( द गुड अर्थचा नायक ) बनून येत असे तो संध्याकाळीच परत म्युनी बने. मधल्या काळात चित्रिकरण चालू असो, नसो, कोणी भेटायला येवो, म्युनी वँगच्या भूमिकेतून खाली येत नसे. एकदा थालबर्गने म्युनीच्या मित्राला तक्रारवजा सांगितले, ' तुमच्या दोस्ताला सांगा. त्याला चिनी शेतकऱ्याची फक्त भूमिका बजावायची आहे, कायमचे चिनी बनायचे नाही. '

' द गुड अर्थ ' मध्ये तो इतका सामावून गेला होता.

तीन वर्षांनी हा चित्रपट पूर्ण झाला. म्युनीच्या कामाची सर्वांनी वाहवा केली. म्युनीची सहकलाकार लुईसी रेनर हिने त्या चित्रपटाबद्दल ऑस्कर मिळवले.

ज्याने या चित्रपटासाठी अतोनात मेहनत घेतली तो थालबर्ग या चित्रपटाचे यश पाहण्यासाठी जगला नाही. सर्वांगानी परिपूर्ण असलेला हा चित्रपट जगातील अत्युत्कृष्ट चित्रपटांपैकी एक गणला जातो. भावी पिढ्यांसाठी कालकूपीत तो ठेवावा अशीही अनेकांची सूचना होती.

त्यानंतर ' द वुमन आय लव्ह ' नावाच्या एका चित्रपटात म्युनीने केवळ त्याचा मित्र आल्बर्ट लेव्हिस यांच्यासाठी काम केले. तो काही तेवढा गाजला नाही. वार्नर ब्रदर्स ' पाश्चर 'च्या यशाने दिपले होते. आणखी एखादा चरित्रात्मक चित्रपट काढावा या इच्छेने त्यांनी ' म्युनी 'पुढे ' द लाइफ ऑफ एमिल झोला ' नावाची कथा ठेवली. झोलाच्या जीवनातील काही महत्त्वाची पाने

आणखी भरघोस पैशावर आणि सवलतीवर करारबद्ध केले.

यानंतर तो कोणत्या चित्रपटात काम करणार याबद्दल रसिकांच्या चर्चा चालू झाल्या. म्युनी म्हणजे आपल्याला काही तरी अद्वितीय असा आविष्कार बघायला मिळणार याबद्दल सिनेरसिकांना आता खात्री झाली होती.

म्युनीने निवडले'– 'ज्वारेझ'–मेक्सिकन अध्यक्षाच्या जीवनावरील चित्रपट चांगला असणार असे वाटले होते; पण त्याची निर्मिती बरोबर झाली नाही. एक तर पटकथा चांगली नव्हती आणि एक म्युनी सोडल्यास इतर भूमिकांसाठी निवडी चुकल्या होत्या.

त्यामुळे म्युनीचा हा चित्रपट दणकन् आपटला.

जेम्स हिल्टनच्या कादंबरीवर 'वुई आर नॉट अलोन' हा चित्रपट म्हणजे म्युनीचा वार्नर ब्रदर्सबरोबरचा शेवटचा चित्रपट. हे पिक्चर फारसं चाललं नाही. त्याचा निर्माता ब्लांक याच्या मते त्यावेळेची युरोपची खालावलेली स्थिती आणि चित्रपटाचा दारूण शेवट (न केलेल्या गुन्ह्याबद्दल नायक, नायिका मरतात) प्रेक्षकांना रुचले नसावे.



'द गुड अर्थ'मध्ये म्युनी

या कथेने उगाळली होती. हे आणखी एक आव्हान म्युनीपुढे होते. हा चित्रपट प्रथम ज्याच्याकडे गेला होता त्या पॅरामाउंटच्या निर्मात्याने असे उद्गार काढले होते, 'ही कथा वार्नर ब्रदर्सना द्या. माझ्याकडे या भूमिकेसाठी योग्य नट नाही. त्यांच्याकडे म्युनी आहे.' हा म्युनीचा गौरव होता.

हे काम करण्यापूर्वी म्युनीने झोलाची सर्व पुस्तके वाचून काढली. झोलाच्या अनेक चित्रांचा अभ्यास केला. झोलाच्या जीवनातील ज्या प्रकरणावर म्हणजे ड्रेफस खटला त्याच्या सर्व हकिकती त्याने अक्षरशः मुखोद्गत करून टाकल्या. झोला जसाच्या तसा उभा व्हावा यासाठी त्याने अनंत परीश्रम केले. त्यासाठी मेकअप आणि पोशाखाच्या पद्धतीवर त्याने प्रयोग केले.

आणि मग त्याने 'झोला' पडद्यावर साकार केला. हा चित्रपट पैसे मिळवील असे वार्नर ब्रदर्सना वाटत नव्हते; पण या चित्रपटाने भरपूर पैसेही मिळवून दिले. म्युनीची वाहवा तर झाली पण चौथ्यांदा अकादमी पारितोषिकासाठी त्याच्या नावाची शिफारस झाली. त्याला ते मिळाले नाही तरी उत्कृष्ट चित्रपट, पटकथा आणि सहाय्यक अभिनयाचे अकादमी पुरस्कार या चित्रपटाने मिळवले.

म्युनी 'द लाईफ ऑफ एमिल झोला'वर अतिशय खुश होता.

लॉस एंजल्स टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत तो म्हणाला,

'मला वाटतं, की आज पूर्वीपेक्षा जास्त अशा चित्रपटांची आपल्याला गरज आहे. हॉलीवूड, कलात्मक, बौद्धिक, गंभीर आणि त्याचवेळी धंद्याच्या दृष्टीने यशस्वी होणारे चित्रपट निर्माण करू शकते या गोष्टीचा 'झोला' चांगला पुरावा आहे. अर्थात हे सगळ्या नियमांच्या विरुद्ध आहे. सेक्स नाही! किंवा कदाचित 'झोला' सर्वात जास्त सेक्सी चित्रपट असेल कारण स्त्री-पुरुष हाच त्याचा विषय आहे.

या यशामुळे प्रभावित होऊन वार्नर ब्रदर्सनी अनेक चरित्रे घेतली पण म्युनीने ते स्वीकारले नाही. त्यानंतर म्युनीने थोडा काळ विश्रांती घेतली. बेल्लाबरोबर त्याने युरोपची सफर काढली. नुकत्याच मिळालेल्या दैदीप्यमान यशामुळे त्याचे नाव सर्वतोमुखी झाले होते. सगळीकडे त्याच्या नावाची पत वाढली. त्यामुळे वार्नर ब्रदर्सनी पुन्हा त्याला

## पुन्हा नाटकांकडे

त्यानंतर म्युनीने पुन्हा नाट्यसृष्टीत प्रवेश केला. 'की लार्गो' नावाचे एक नाटक त्याने पेश केले. या नाटकाबद्दल ड्रामा लिगचे बक्षीस आणि ॲक्टर्स फंड ऑफ अमेरिकाची मेंबरशिप या दोन गोष्टी म्युनीने पटकावल्या.

वुई आर नॉट अलोनच्या अपयशानंतर वार्नर ब्रदर्स आणि पॉल म्युनी यांचे बिनसले. त्यामुळे त्याने करारातून आपली सुटका करून घेतली. त्यानंतर ट्वेंथीएथ सेंच्युरी फॉक्सच्या 'हडसन बे' मध्ये साहसकथा त्याने सादर केली. विल्यम्सच्या 'यस्टरडेज मॅजिक' नावाच्या पडेल नाटकात काम केले. कोलंबियाच्या 'कमांडोज स्ट्राईक ॲट डॉन' नावाच्या युद्धकथेमध्ये त्याचे चांगले उल्लेखनीय काम झाले.

कोलंबियाचा 'अ साँग टू रिमेंबर' नावाचा एक रंगीत चित्रपटही त्याने पूर्ण केला. याच्या प्राप्तीत त्याने वाटा घेतल्याने त्याचा बऱ्यापैकी फायदा झाला. आणखी एक

दोन चित्रपट केल्यावर तो पुन्हा विटला आणि नाट्यसृष्टीकडे वळला.

'ए फ्लॅग इज बॉर्न' नावाचे एक नाटक पेश करून. १९४६ मध्ये त्याने रसिकांची वाहवा मिळवली. यावेळी इतर चांगली नाटके पेश करण्याचा मनसुबाही त्याने बोलून दाखवला. सिनेमावरची नाराजी मात्र कमी झाली नाही. तो तसे बोलूनही दाखवू लागला.

त्यानंतर म्युनीने विशेष उल्लेखनीय काम केले ते 'आर्थर मिलर' च्या 'डेथ ऑफ अ सेल्समन' मध्ये. या नाटकाचे वर्षभर दणदणीत कार्यक्रम झाले. नंतर म्युनी त्यातून निवृत्त झाला.

टेलिव्हिजनवरच्या एका धारावाहीमध्येही त्याने काम केले. याच्या मोबदल्याचे पैसे तो 'स्पॅनिश चिल्ड्रेन्स रिलीफ फंड' नावाच्या संस्थेला देत असे. ही संस्था कम्युनिस्ट असल्याचे नंतर सिद्ध झाले. त्यावरून म्युनी कम्युनिस्ट आहे असे आक्षेप झाले; पण म्युनीला त्याबद्दल काहीच माहिती नव्हती असे समजल्यावर ते वृथा दोषारोप थांबले.

या वेळेपर्यंत १९५५ साल उजाडले होते. म्युनीच्या जीवनातील मध्यम कालखंड चालू झाला. त्याच्या अभिनयाबद्दल वाद नव्हता; पण त्याच्या नावाला यश मिळेलच अशी निर्मात्यांना खात्री नव्हती. म्युनी त्याच्यासमोर प्रोजेक्ट आल्यावर पूर्ण अभ्यास केल्याशिवाय निर्णय घेत नसे. हीसुद्धा निर्मात्यांना डोकेदुखीच होती. स्वतःबद्दल अतिशय आत्मविश्वास असलेला म्युनी अपयश स्वीकारायला तयार नव्हता.

पण त्याच्या मदतीला 'इनहेरिट द विंड' नावाचे नाटक धावून आले. अपयशानी भांबावलेला म्युनी सुरुवातीला थोडासा नाराज होता; पण त्याला ती कथा अतिशय आवडली होती. त्याला कथा आवडली म्हणजे तो अक्षरशः त्यात जीव ओतत असे. त्यामुळे जेव्हा ते नाटक सादर झाले तेव्हा नाट्यरसिकांनी 'म्युनीच्या हेन्री ड्रमान्' ला कडकडून दाद दिली. या नाटकाचे अनेक प्रयोग झाले. 'काउन्सलर ॲट लॉ' नंतर म्युनीला स्टेजवर एवढे यश मिळाले नव्हते.

'म्युनी' चा आत्मविश्वास वाढवण्याचे काम या नाटकाने केले. पॉलची एकनिष्ठ बायको बेल्ला या यशाने अतिशय सद्‌गदित झाली. आपल्या नवऱ्यामध्ये जे 'अद्वितियत्व' आहे ते पुन्हा एकदा या नाटकामुळे जगाला कळून चुकलंय अशी तिने प्रतिक्रिया त्यावर व्यक्त केली.

पण त्या वर्षी म्युनीला डाव्या डोळ्याने त्रास द्यायला सुरुवात केली. डॉक्टरनी ट्यूमर असल्याचे सांगितल्यावर म्युनीला 'इनहेरिट द विंड' मधून सक्तीने निवृत्त व्हावे लागले. हा ट्यूमर वाढला आणि डॉक्टरनी म्युनीचा डावा डोळा काढून टाकला. म्युनीला वाईट एवढेच वाटले की, त्याला आता कधीच ड्रायव्हिंग करता येणार नव्हते.

तीन महिन्याच्या विश्रांतीनंतर म्युनीने पुन्हा 'इनहेरिट द विंड' मध्ये काम करण्याचे ठरवले. त्या रात्री त्याचा विश्रांतीनंतरचा पहिला प्रयोग होताना त्याच्या गैरहजेरीत ड्रमान्‌चे काम करणारा नट पडद्यासमोर आला आणि त्याने जाहीर केले की, आज तो काम करणार नाही. प्रेक्षक संतापून बाहेर जाऊ लागले तेव्हा तो नट म्हणाला, 'मी ती भूमिका करणार नाही कारण सन्मानाची बाब आहे. माझ्या ठिकाणी आज महान पॉल म्युनी ती भूमिका सादर करतील.'

आणि प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात जे स्वागत केले त्यानी म्युनीचे हृदय हेलावून गेले.

१९५६ मध्ये नाट्यसृष्टीच्या सेवेबद्दल एक बक्षीस त्याला मिळाले. येशिवा विद्यापिठाने आल्बर्ट आइन्स्टाइन स्मृती पारितोषिक त्याला बहाल केले.

टेलिव्हिजनवर काही उत्तम नाटके सादर करण्याची संधीही त्याला मिळाली. विशेषतः 'प्लेहाऊस ९०' या मालिकेतील त्याच्या कामाची विशेष स्तुती झाली. आणखी एक मौलिक पारितोषिक त्याला मिळत होते; पण ऐनवेळी ते दुसऱ्याला मिळाल्याचे जाहीर झाले.

'प्लेहाउस ९०' मधील नाटकात त्याने एका म्हाताऱ्या बॅरिस्टरचे काम केले होते. त्याचे ते काम अतिशय उत्कृष्ट म्हणून गणले गेले. त्यामध्ये नकळत त्याच्यामधील दोष कारणीभूत झाला होता. तब्येत बिघडत गेल्यामुळे तो एखाद्या असहाय्य वृद्धाप्रमाणेच झाला होता, त्याचे संवाद त्याला नीट आठवत नव्हते. त्याच्या कानावर ऐकू येण्याचे मशीन म्हणून रेडिओ रिसिव्हर बसवला होता त्यातून त्याचे संवाद प्रॉम्प्ट केले जात होते, त्यामुळे त्याचे काम त्यामुळे आत्यंतिक नैसर्गिक झाले होते. अर्थात प्रेक्षकांना ही गोष्ट माहीत नव्हती.

'अॅट द ग्रॅंड' नावाच्या संगीत नाटकात १९५८ मध्ये केलेले काम हे म्युनीचे शेवटचे ठरले. संगीत नाटकात काम करण्याचा त्याचा हा पहिला आणि शेवटचा प्रयत्न होता. त्यानंतर 'द लास्ट अँग्री मॅन' नावाच्या चित्रपटात त्याने काम केले. हा त्याचा शेवटचा चित्रपट ठरला. या चित्रपटाची मूळ पटकथा त्याने बदलायला लावली. या शेवटच्या चित्रपटाचेही काम त्याने नेहमीच्या पद्धतीने मेहनत घेऊन समरसून केले. या चित्रपटातील कामाबद्दल त्याला अकादमी ॲवार्ड मिळाले म्हणून पाचव्यांदा त्याच्या नावाची शिफारस झाली.

या चित्रपटानंतर पुन्हा म्युनीला ऑफर्स येऊ लागल्या; पण त्याने आपल्या एजंटला सांगितले– 'आता पुरे हा सोस.' त्याची तब्येत ढासळत चालली होती. त्याला ताण सोसत नव्हता.

१९६४ पासून त्याच्या तब्येतीच्या तक्रारी वाढल्या. आयुष्यभर साथ केलेली बेल्ला पण थकली होती. दोघांच्याही तक्रारी सारख्या येत होत्या. त्यांच्या कुटुंबातील माणसे हवालदिल झाली होती कारण दोघांचाही भरवसा नव्हता.

२५ ऑगस्ट, १९६७ ला हृदयक्रिया बंद पडून म्युनीने या जगाचा निरोप घेतला. आपला जमाना गाजवून सोडलेल्या या अभिनय सम्राटाच्या अंत्ययात्रेला फार थोडी माणसे हजर होती.

म्युनीने आपल्या विकलांग भावासाठी १०००० डॉलर्स ठेवले होते. बाकीची लाखो डॉलर्सची इस्टेट बेल्लासाठी त्याने ठेवली होती. बेल्ला त्याचा उपभोग घेण्यासाठी फारशी जगली नाही. म्युनीचे चरित्र तिने लिहायला घेतले होते; पण त्याची काही पानेच तिला लिहिता आली. अर्धी इस्टेट तिने कॅन्सर रिसर्च संस्थेला दिली आणि राहिलेली पॉल म्युनी थिएटर्स आर्ट, शिष्यवृत्ती यासाठी ब्रँडाइस विद्यापीठास देऊन टाकली आणि म्युनीच्या मृत्युनंतर ४ वर्षांनी ७१ साली तिनेही एक्झिट घेतली.

शालेय शिक्षणसुद्धा पुरे न करता आलेल्या

आणि जगाच्या विशाल शाळेत अभिनयाची डॉक्टरेट मिळवलेल्या म्युनीची अशी ही थोडक्यात कथा आहे. ज्या ज्या भूमिका त्याने अजरामर केल्या त्या साऱ्या भूमिकांमागे त्याचे अमाप परीश्रम होते. सेटवर येऊन आजचे संवाद काय आहेत असं मुर्खासारखे विचारणाऱ्या नटांना लाज वाटावी इतके परीश्रम.

## विषम प्रवृत्तीचा नमुना

तो अत्यंत प्रामाणिक आणि निष्ठावंत नट होता. झोला, पाश्चर, गुड अर्थ इत्यादींचा अभ्यास करताना त्यांच्यावर जेवढे वाचता येईल, अभ्यासता येईल तेवढे त्याने वाचले होते, अभ्यासले होते. 'ब्लॅक फ्युरी' मध्ये भूमिका करण्यापूर्वी तो कोळशाच्या खाणीत जाऊन तेथील वातावरण अभ्यासून आला होता, कामगारांच्यात राहून त्यांच्या जीवनाचे बारकावे त्याने न्याहळले होते. 'आय अॅम अ फ्युगिटिव्ह फ्राम अ चेन गॅंग' साठी त्याने तुरुंगाना भेटी देऊन कैद्यांचे जीवन बारकाईने पाहिले होते. त्याच्या या स्वभावाने दिग्दर्शक काहीवेळा अत्यंत प्रभावित होत तर काहीवेळा वैतागून जात.

त्याच्या या अभ्यासू प्रवृत्तीमुळे त्याच्या पटकथा त्याला कित्येक महिने अगोदर द्याव्या लागत. घरी आरशासमोर तो सराव करी. त्याच्याकडे अनेक टेपरेकॉर्डर्स होते त्याच्यावर तो संवादाचे प्रयोग करीत असे. दिग्दर्शकाचे म्हणणे प्रमाण मानूनसुद्धा आपल्या सूचना त्यांच्यावर लादण्याचे त्याच्यासारखे कोणाला जमणे नाही असे अनेक दिग्दर्शक म्हणत असत.

त्याची बायको बेल्ला ही त्याची सर्वात मोठी समीक्षक होती. त्याने कोणते चित्रपट स्वीकारावेत, कोणते स्वीकारू नयेत याबद्दल तिची सूचना तो आत्यंतिक मानत असे आणि बहुतेक वेळा तिचे अंदाज बरोबर असत. चित्रिकरणाला ती बहुतेक वेळा हजर राही. म्युनीने एखादा शॉट किंवा सीन दिला की त्याने तिच्याकडे पाहावे आणि तिने ओके सिग्नल दिला तर ठीक पण तिने मान हलवली तर दिग्दर्शकाने ओके दिलेला असला तरी म्युनीने तो सीन पुन्हा घ्यायला लावावा असा म्युनीचा खाक्या होता.

ज्यावेळी बेल्ला सेटवर नसे त्यावेळी 'म्युनी'त काहीतरी कमी पडे. उदा. 'अ साँग टू रिमेंबर'च्या वेळी दिग्दर्शकाने बेल्लाला सेटवर यायला बंदी केली होती, त्यामुळे म्युनीचा त्यातील परफॉर्मन्स फारसा जमलेला नाही.

आणखी एक गंमत म्हणजे म्युनी एकदा सेटवर आला की त्याला जो रोल करायचा असे तो बनून जाई, मग तो म्युनी राहात नसे. मग तो कॅरेक्टर बनून जाई. तो एखादा कामगार, खेडूत, पुढारी, डॉक्टर काहीतरी असे त्यातून बाहेर पडण्याची त्याची तयारी नसे. त्याला कोणी भेटायला आले तर बेल्ला त्यांना दूर ठेवी. जेवणसुद्धा तीच पोचवी. एकेकदा दिग्दर्शकसुद्धा त्याने वैतागत. गुड अर्थच्या वेळचा प्रसंग मागे दिलाच आहे. या सगळ्यातून नाट्य चित्र व्यवसायाला तो किती समर्पित होता हे दिसून येते.

म्युनी तसा एकाकी मनुष्य होता. एक त्याची बायको आणि तो एवढेच त्याचे वर्तुळ होते. मी म्युनीचा जवळचा मित्र होतो असं कोणी म्हणू शकत नव्हता. त्याच्या या वर्तुळाची संरक्षक होती बेल्ला ! म्युनीचे सगळे व्यवहार ती सांभाळत असे. या जोडप्याला मुलंही नको होती काही वेळा बेल्ला बेसुमार खर्च करी पण म्युनी तिला कधीच काही बोलत नसे. लहानपणी अनुभवलेल्या दारिद्र्याची त्याला इतकी झळ बसली होती की तो कधीच कर्ज काढत नसे. सगळं काही रोख व्यवहारानं एवढ्यासाठी की पुन्हा त्या दारिद्र्याने कर्जाच्या रूपात येऊन मानगुटीवर बसू नये.

त्याचा स्वभाव म्हणजे विषम प्रवृत्तीचा नमुना होता. काही वेळा तो विलक्षण चिक्कूपणा करी तर काही वेळा तो भलताच उदार बने. आई, भाऊ यांना त्याने सढळ हाताने मदत केली. हिटलरच्या काळात 'ज्यू'ना त्याने अक्षरशः हजारो डॉलर वाटले.

आपल्या मित्रांना तो जेवणासाठी बोलवी. जर ते वेळेत आले नाहीत तर मात्र बेल्ला आणि तो सरळ जेवण चालू करत. म्युनी म्हणे, 'एखाद्याने तुमचा पैसा चोरला, वस्तू चोरल्या तर गोष्ट वेगळी आहे; पण तो जर वेळ चोरत असेल, तर तुमच्या आयुष्याचा तुकडा चोरतोय.'

म्युनी 'ज्यू' होता आणि त्याचा त्याला विलक्षण अभिमान होता. यिड्डीश भाषा आणि संस्कृती याचा तो विलक्षण भोक्ता होता.

म्युनीला वाटायचं की चित्रपटांना एक सामाजिक बांधिलकी आहे. तो म्हणायचा,

'आम्ही पडद्यावर जे साकार करतो त्याप्रमाणे वागण्याचा गुन्हेगार प्रयत्न करतात हे माहिती आहे ना? 'लिटल् सीझर' किंवा 'स्कारफेस' बनण्याचा, (आपल्या भाषेत 'गब्बरसिंग' बनण्याचा.) मुलं देखील प्रयत्न करतात.'

ते वाईट आहे. आज सिनेमाबरोबर वृत्तपत्रांवरदेखील जे चांगलं आहे त्याचं ज्ञान देण्याची जबाबदारी आहे. लोक जे पहातात त्यावर विश्वास टेवतात. मी फक्त मंदबुद्धीबद्दल बोलत नाही. 'जहाज चालवणं' यासाठी भविष्यात खूप काम करावं लागेल.

पॉल म्युनी ! एवढा समर्पित नट आता होणे नाही. आजच्या सिनेसृष्टीला त्याच्याकडून घेण्यासारखं खूप आहे.

त्याचा एक मित्र म्हणाला होता की म्युनीला नेहमी वाटायचं की अजून कमी आहे अजून खूप धडपड केली पाहिजे. ही जी त्याची पूर्णत्वाची आस होती त्यानेच त्याला अभिनयाचा उत्कट आविष्कार दिला.

पुढच्या पिढीला मार्गदर्शक होण्यासाठी ! □

आधार
Paul Muni
His Life and his Films
By :—Michael B. Druxman.

## गारांचा पाऊस : पृष्ठ २१ वरून

आणि तुझ्या बोलण्यात असा सूर दिसतोय तो मला आवडलेला नाही म्हणून मी आता पाणी देणार नाही हेही ठणकावून सांगीन.

तेव्हा १६ वर्षाच्या मुलीनी पाणी मागणं आणि आईनी ते देणं ह्या घटनेत काही चूक नाही. त्या मागच्या मायलेकींच्या मनोभूमिकेत उत्तरं शोधायला हवीत. दोघींमध्ये ती समज पुरेशी असली तर ठीक आहे की !

आणि हे आई-मुलीचं नातं वडलांना कळायला हवं. कित्येक घरात वडील फक्त वळण लावण्याची भूमिका बजावत असतात. ते बायकोलाही वळण लावत असतात आणि मुलांनाही त्यामुळे तू असं कर, हे करणं बंद झालं पाहिजे, उद्यापासून हे मला दिसता कामा नये असे फतवे ते काढत असतात. त्यांनी स्वतः दमून आलेल्या पोराला एखाद्या वेळी पाण्याचा गलास भरून दिलेला असला तर त्यांना त्या घटनेचा अर्थ कदाचित अधिक चांगला समजेल.

अर्थात हे वडील तसे नव्हते. मुद्दा त्यांच्या चटकन लक्षात आला. ते म्हणाले, 'एखादी शिस्त मुलांना लावायची असते म्हणजे असते असंच मी झापडं लावल्यासारखा समजत होतो; पण 'कशासाठी?' हा प्रश्न विचारायला लागलं तर मार्ग बराच सोपा होईल. आपण जो विचार केला तो मुलांशी मोकळेपणी बोलला तरी प्रश्न सुटेल. आता मी असं वागण्या-बोलण्याचा प्रयत्न करून बघतो न् मग तुम्हाला कळवतो...' □

# नागपूरचे नाट्य संमेलन

वि. भा. देशपांडे

११, १२ आणि १३ जानेवारी ८५ या तीन दिवशी नागपूरचे नाट्यसंमेलन संपन्न झाले. हे संमेलन निरनिराळ्या कारणांनी बरेच दिवस लक्षात राहील. एक तर संमेलन जानेवारी महिन्यात ऐन थंडीच्या हंगामात घेऊनही मुख्य समारंभाच्या वेळी जोरदार पाऊस आला. आदल्या दिवशीही पाऊस आला होता. त्यामुळे सारा मंडप, गाद्यागिरद्या चिंब झाल्या. अध्यक्ष पणशीकरांच्या भाषणाची चार-दोन वाक्ये झाली असतील नसतील तोच पावसाने ठेका धरला. अध्यक्षांचे मुख्य भाषण दुसऱ्या दिवशी सायंकाळी झाले. प्रत्यक्षातला पाऊस हा कोणाच्याच हातात नव्हता. तो एक अपघात होता. पण संमेलनात शब्दांचा पाऊस पडून त्याच्या माऱ्याखाली काही नाट्यपूर्ण घडणार अशी चिन्हे अगोदरपासूनच दिसत होती. शंका, प्रश्न यांनी आभाळ भरून येत होते. मुळात अध्यक्षीय नावे येऊ लागली, त्यातली काही नावे मागे घेतली गेली त्या संबंधात जे काही घडले ते फारसे भूषणावह नव्हते. अखेर पणशीकर अविरोधपणे निवडून आले; पण त्यांना तर निवडणूक हवी होती. पुढील वर्षी निवडणूक झालीच पाहिजे असा आग्रहही त्यांनी धरला. निवडणुकीची धूळ खाली बसते न बसते तोच नाट्यपरिषदेने केलेल्या पणशीकर गौरव सप्ताहाचे वादंग जोमात उठले. त्या सत्काराचे-गौरवाचे पडसाद संमेलनातही मोठ्या प्रमाणात उमटले. प्रथम हा विषय काढला परिषदेचे कार्याध्यक्ष अनंत काणे यांनी, या सत्कारासंदर्भात काय काय घडले ते सविस्तर सांगितले. तोच सूर पकडून पूर्वाध्यक्षा ज्योत्स्नाबाई भोळे यांनी एक लांबलचक कंटाळवाणे भाषण करून आपल्या मनातील खंत व्यक्त केली. त्यामुळे संमेलनाच्या वातावरणाला वेगळेच वळण लागले. या संमेलनात जमलेल्या रसिकांचे स्वागत एकूण तीन वेळा अधिकृतपणाने झाले. एवढे स्वागत कशा करता ते कोणास उमगले नाही. संमेलनाचे कार्याध्यक्ष नी. गो. परांजपे, स्वागताध्यक्ष खासदार वसंत साठे आणि या दोघांचे स्वागत कमी पडले म्हणून की काय विदर्भाचे खंदे वक्ते प्रा. राम शेवाळकर अशा तिघांनी प्रास्ताविक-स्वागतपर भाषणे केली. तिघांच्याही बोलण्यात विदर्भ मातीचे गुण, कला परंपरा आणि आदरातीथ्य आदी गोष्टींचा ठेका धरणे चालू होते वसंतराव साठे यांना कामा निमित्ताने दिल्लीचे विमान त्वरीत गाठावयाचे होते म्हणून ते स्वतःचे भाषण होताच निघाले. इथपर्यंत ठीक होते; पण ते निघाल्यावर निवेदकाने सांगितले की, साठेसाहेबांना मानवंदना देण्यासाठी तमाम लोकांनी उभे रहावे. काही लोक अर्धवट अवस्थेत उभे राहिले; पण बहुतांश लोकांना त्या घटनेचा अर्थच न कळाल्याने आश्चर्य नजरेने पहात राहिले !

संमेलनाच्या कार्यक्रमात चर्चा, परिसंवाद आणि मनोरंजनाचे कार्यक्रम आदी गोष्टी नेहमीप्रमाणे होत्याच. (१) 'नाट्यदिग्दर्शक नाटकाला अन्वयार्थाचे एक अधिकचे कलात्मक परिमाण देतो, तो सर्जनशील कलावंत नाही. (२) मी केलेल्या—करीत असलेल्या भूमिका आणि माझे भावजीवन यांच्या नात्याचे स्वरूप. (३) मराठी रंगभूमी : परंपरा आणि बंडखोरी (शोधनिबंध वाचन) (४) दलित रंगभूमी, वेगळे अस्तित्व. (५) 'नाट्यसंहिता ही प्रयोगशरण घटना असल्यामुळे नाट्यलेखनाच्या आविष्काराला मर्यादा पडतात. इत्यादी विषयांवर चर्चा-परिसवाद-निबंधवाचने झाली. नेहमीप्रमाणे जाहीर झालेल्या वक्त्यांपैकी निम्मेअधिक वक्ते उपस्थित नव्हते त्यातले काही लोक येणार नाहीत याचा अंदाज होताच. हे बडे नाववाले काही वक्ते का आले नाहीत असे विचारले असता एका कार्यकर्त्याने उत्तर दिले की, आम्ही सर्वांना पत्रे पाठवली होती. म्हणजे ज्यांना पत्रे पाठवली ती मंडळी येणार असे गृहीत धरून त्यांची नावे जाहीर केली असा त्याचा अर्थ होतो. यावर जास्त भाष्य करण्यात मतलब नाही.

चर्चा-परिसंवादाच्या बरोबरीने मनोरंजनाचेही विविध कार्यक्रम होते. स्वप्नभूमी, चीत्कार ही दोन नवी नाटके होती. आविष्कारचे 'दुर्गा झाली गौरी' हे नृत्यनाट्य होते. पथनाट्ये होती. चित्तरंजन कोल्हटकरांच्या संस्थेने 'एकच प्याला' चा प्रयोग केला; तर रंगशारदा प्रतिष्ठानने 'गीतशृंगार' हा कार्यक्रम केला. ह्या सर्वच कार्यक्रमांची गर्दी इतकी झाली की, कोणत्या कार्यक्रमांना उपस्थित रहावे अशी अनेकांची पंचाईत झाली काही चर्चा-परिसंवाद उरकावे लागले. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे इथल्या कार्यकर्त्यांना कार्यक्रमांच्या वेळेचा अंदाज आला नाही. इतक्या संख्येने कार्यक्रम ठेवण्याची मुळातच आवश्यकता होती का हा प्रश्न आहे. संख्या वाढल्यामुळे कार्यक्रमांचे नियोजन करणे हाताबाहेर गेले. त्यात पावसाने ऐनवेळी दगा दिल्याने धावपळ अधिकच झाली. वेळ आणि वक्त्यांची संख्या यावरचे नियंत्रण आवश्यक होते. ते कोणत्याच संमेलनात पाळले जात नाही. नागपूर तरी अपवाद का ठरावे ?

याचा अर्थ कार्यकर्ते परिश्रमाला कमी पडले असा होत नाही. कार्यकर्त्यांनी अपार श्रम घेतले, भोजन निवास आदींची व्यवस्था अगदी चोख ठेवली गेली. वऱ्हाडी पद्धतीचे आदरातिथ्य प्रत्यक्षात अनुभवाला आले. त्या बाबतीत सारेजण कौतुकास पात्र आहेत. या

आदरसत्काराच्या जोडीला साजेलशी स्मरणिका काढली असती तर ?

नेहमीप्रमाणे संमेलनाचे सूप तर वाजले; पण हे संमेलन निराळ्या अर्थाने आत्म लक्षवेधी ठरणार आहे. कारण अध्यक्ष प्रभाकर पणशीकर यांनी आपल्या भाषणात वर्षात करावयाच्या कामांची, उपक्रमांची एक जंत्री समोर ठेवली आहे. अनेक प्रश्नांना त्यांनी स्पर्श केला आहे. नाटचपरिषद स्वावलंबी करणे, तिच्या इमारतीसाठी निधी उभारणे, परिषदशाखांचा विस्तार करणे, कलाकारांना राहण्यासाठी जागा, निर्मात्याला कर्ज देण्यासाठी फायनान्स कार्पोरेशन, विधानपरिषदेवर नाटचप्रतिनिधी पाठवणे आदी अनेक गोष्टींचा उल्लेख त्यांनी केला. पणशीकर जिद्दी आहेत, त्यांच्या नावाला समाजात, शासनात किंमत आहे. सत्काराच्या निमित्ताने त्यांनी अडीच लाख मिळवून दिले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत. पाहू या काय घडते ते !

या संमेलनात आणखी एक महत्त्वाची व्यक्ती वावरत होती ती म्हणजे उद्घाटक असलेले बी. व्ही. कारंथ. हे भोपाळच्या भारतभवनचे संचालक आहेत. नाटचकर्मी, चित्रपटवाले आहेत. हा रंगभूमीचा माणूस अतिशय शातपणाने, अबोलपणाने प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित रहात होता. कधी सहभागीही होत होता. कारंथांच्या उपस्थितीने संमेलनाची शान निश्चितच वाढली ! □

चित्रपट

# माहेरची माणसं : भट्टी जमली नाही



हुंडाबळी ही सध्याच्या काळातली एक ज्वलंत समस्या आणि बहुतांशी केसेसमध्ये सुनेला जाळण्यामागे किंवा सुनेला आत्महत्येस प्रवृत्त करण्यामागे सासूचा पुढाकार असल्याचं आढळून येतं. साहजिकच सासू जमातीचं नाव कायमचं ब्लॅक लिस्टमध्ये गोवलं गेलंय; पण 'माहेरची माणसं' निर्माता आणि दिग्दर्शक कमलाकर तोरणे यांना मात्र हे मान्य नसावं. त्यामुळं नाण्याची दुसरी बाजू दाखवावी या सद्हेतूनं त्यांनी 'माहेरची माणसं' या चित्रपटाची निर्मिती केली. जेव्हा आपण काही विचार विधानाच्या स्वरूपात मांडतो, तेव्हा त्या गोष्टीच्या दुसऱ्या बाजूचा विचार होणंही तितकंच आवश्यक असतं, ही गोष्ट अगदी खरी. याच्याशी कोणीही सहमत होईल. तेव्हा या पार्श्वभूमीवरून 'माहेरची माणसं'च्या हेतूविषयी काही शंका नाही. आक्षेप नाही. तो कुणी तरी पुढं मांडायलाच हवा होता याची गरजही पटते; पण त्याचबरोबर आणखीही एक गोष्ट खरी की नुसता हेतू चांगला असून भागत नाही. तर हा हेतू आपण प्रेक्षकांच्या पुढे किती नीटसपणे, किती परिणामकारक रीतीनं मांडतो याचाही विचार होण्याची गरज भासते. नेमक्या याच बाबतीत 'माहेरची माणसं' अयशस्वी ठरतो आणि म्हणून परिणामहीन होतो. नेहमी सासूचंच चुकतं असं नाही तर सूनाही सासूला छळू शकतात. ही साधी सरळ कल्पना दाखवताना आईचं कर्तृत्व, बारा ज्योतिर्लिंगांचा प्रवास, गाणी, पात्रांची सरमिसळ असे अनेक व्यावसायिक यशाची गुरुकिल्ली मानले जाणारे मोह दिग्दर्शकाला पडले, परिणामी चित्रपट मात्र विस्कळीत झाला.

आशा काळे आणि अरुण सरनाईक यांचा 'हम दो हमारे दो' चासुखी संसार; पण पतीच्या मृत्यूनं संसारावर सावट येतं. मग मुलांच्या आयुष्याचा खेळखंडोबा होऊ नये म्हणून आई पदर कसून उभी राहते. नर्सिंगचं शिक्षण घेऊन नर्स म्हणून नोकरी मिळवते. मुलांचे आई–वडील या दोन्ही भूमिकांतून संसार करते. मुलं यथावकाश मोठी होतात. एक डॉक्टर होतो एक इंजिनियर होतो. मोठ्याचं लग्न होतं. लक्ष्मीच्या पावलांनी सून घरात येतेय म्हणून सासूबाई खूष; पण प्रत्यक्षात होतं भलतंच. मोठ्या सूनबाई येतात त्याच मुळी 'माहेर झिंदाबाद'च्या घोषणा देत. मग सासर आणि सासरच्या माणसांची पत्रास न ठेवणं वगैरे ओघानं आलंच. मग दुसऱ्या सूनबाई येतात. त्या सासरलाच 'माहेर' करून टाकतात. त्यामुळं मोठ्या सूनबाईच्या वागण्यातला विचित्रपणा अजूनच जाणवतो. तिकडं मोठ्या सूनबाईच्या माहेरी सून येते. ही सूनही खमकी. मोठ्या सूनबाईकडून सासरी कसं वागावं याचा वसा घेते आणि न उतता न मातता सासरी तश्शीच वागते. तेव्हा मोठ्या सूनबाईचे डोळे उघडतात. त्या सासूबाईंची क्षमा मागतात आणि फुटायला आलेलं घर पुन्हा एक होतं की आनंदी आनंद गडे !

लग्नानंतर सासर हेच मुलीचं माहेर आणि सासरची माणसं तीच माहेरची माणसं– हे दाखवण्याचा दिग्दर्शकाचा प्रयत्न. पण या हेतूप्रमाणे चित्रपट सुरू होतो तो मध्यंतरानंतर. तोपर्यंतचा सारा वेळ मंगला–श्रीपतीचा सुखी संसार, श्रीपतीचा मृत्यू, स्वकर्तृत्वाच्या बळावर मंगलाचं मुलांना मोठं करणं– हे दाखवण्यात जातो. मुळात या सगळ्या गोष्टी एवढ्या विस्तृतपणे सांगायची काहीच गरज नव्हती. नायिकेचा नवरा गेला आहे आणि तिनं कष्टानं मुलांना

वाढवलं आहे. याचा उल्लेख संवाद किंवा फार फार तर एक–दोन प्रसंग तेही नायिकेच्या आयुष्याच्या उत्तरार्धात घडणाऱ्या घटनांच्या निमित्तानं फ्लॅश बॅकच्या स्वरूपात दाखवले गेले असते तरीही भागलं असतं. चित्रपटाची नायिका या स्वरूपात स्वीकारणंही सुजाण प्रेक्षकवर्गाला फारसं जड गेलं नसतं. त्यासाठी मंगला–श्रीपतीच्या आयुष्यातल्या अनेक घटना ओळीनं दाखवण्याची काहीच गरज नव्हती. चित्रपटाचा विषयच जर मंगलाचं कर्तृत्व दाखवण्याचा असता तर एका सामान्य संसारी बाईचा कसा विकास होत गेला– या पार्श्वभूमीला मागच्या आयुष्यात घडलेल्या घटनांचं विस्तृत चित्रण सुसंगत ठरलं असतं. हे कमी पडलं म्हणून की काय पण लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्तानं एक गाणं, मधुचंद्राचं एक गाणं असा मालमसाला भरत लांबण लावली आहे. लग्नाच्या वाढदिवसाच्या गाण्याला निदान थोडीफार तरी पार्श्वभूमी आहे– म्हणून हे गाणं आवश्यक होतं– अशातला भाग नाही; पण मधुचंद्राचं गाणं मात्र एकदमच येऊन टपकतं. आधीचा वर्तमानकाळातला एक प्रसंग संपतो आणि अचानक फ्लॅशबॅकमध्ये मधुचंद्राचं गाणं सुरू होतं. निदान या गाण्याचा आणि आधीचा वर्तमानकाळातला प्रसंग यांचा काही संबंध तरी असावा की नाही? ते ही इथं नाही. या गाण्याला ना शेंडा ना बुडखा. तीच गोष्ट नायिकेला नोकरी शोधतांना आलेल्या वाईट अनुभवांची. हे प्रसंग न दाखवता नायिका सरळ नर्सिंगच्या शिक्षणाकडे वळली असं दाखवलं असतं तरी ते प्रेक्षकांनी स्वीकारलं नसतं अशातला भाग नाही. तेव्हा एक व्यावसायिक चाल खेळण्याखेरीज या प्रसंगांचा किंवा गाण्यांचा कथेशी किंवा हेतूशी अर्थाअर्थी काही संबंध नाही. अर्थात याबाबतीत कळस गाठलाय तो बारा ज्योतिर्लिंगांच्या यात्रेच्या प्रकरणानं. याचा कथेशी संबंध लावला गेलाय तो अशा प्रकारे की, मंगलानं (नायिकेनं) लग्नानंतर बारा ज्योतिर्लिंगांना जाण्याचा नवस बोललेला असतो. पण या ना त्या कारणानं राहून जातं. पुढं मोठ्या सुनेच्या विचित्र वागण्यानं साऱ्या कुटुंबाचीच मोडतोड व्हायची वेळ येऊन ठेपते, तेव्हा आपण नवस फेडला नाही, म्हणून असं झालं असावं– या कल्पनेनं नायिका प्रवासाला निघते–बरोबर आपण. आता या कारणातला पोकळपणा सहजी लक्षात यावा. 'अष्टविनायक', 'जय संतोषी माँ' यासारख्या चित्रपटांना मिळालेलं भरघोस यश बहुधा दिग्दर्शकाच्या डोळ्यासमोर असावं; पण फक्त यशच डोळ्यासमोर राहल्यानं एका गोष्टीचं विस्मरण झालं असावं की, 'अष्टविनायक' काय किंवा 'जय संतोषी माँ' काय हे चित्रपट त्या त्या देवादिकांभोवती फिरणारे होते. हे देव त्या चित्रपटांचं एक महत्त्वाचं अंग होतं. त्यामुळं त्या कथाबीजात या देवांना दिलेलं महत्त्व खपून जातं; पण 'माहेरची माणसं' चं तसं नाहीय. एक तर हा चित्रपट बारा ज्योतिर्लिंगांशी संबंधित नाही. मग निदान कथानकाशी संबंध तरी भरभक्कमपणे दाखवायला हवा होता–तेही नाही. त्यामुळं झालंय काय की मूळ विषय बाजूलाच राहतो आणि इतर अनेक फाटयात मात्र चित्रपट गुंतून राहतो. ज्योतिर्लिंगाची नावं दाखवण्याचा प्रकार तर डॉक्युमेंटरीच्या अंगानं जाणारा आणि विरस करणारा.

## आक्षेपार्ह वेशभूषा

तीच गोष्ट आत्माराम सावंत आणि मनोरमा वागळे या जोडीनं रंगवलेल्या भित्रट नवरा व कजाग बायको यांच्या उपकथानकाची. हे उपकथानक मर्यादित स्वरूपात रंगवलं असतं तर त्याची गोडी आणखीन वाढली असती. मनोरमा वागळेची मुलगी मोठी सून म्हणून मंगलाच्या घरात येते. ती सासरी विचित्र वागते, सासूचा सारखा अपमान करते, उठसूठ माहेरी पळते– ते सारं आईच्या सांगण्यावरून. आता आईनं सांगितलेलं अगदी जसंच्या तसं ऐकणारी आणि त्याप्रमाणे वागणारी मुलगी ही संपूर्णपणे आईच्या कह्यात असली पाहिजे किंवा स्वतःचा स्वतः विचार करण्याची कुवत नसलेली पाहिजे. ही सून आईशी सख्य ठेऊन आहे; पण आईच्या कह्यात नाही. निदान तसं जाणवत तरी नाही, तसंच ती ज्या पद्धतीनं सासूला ताडताड बोलते, त्यावरून विचार करण्याची तिची कुवत नसावी, असंही म्हणता येत नाही. बरं हा तिचा स्वभावच आहे म्हणावं तर लग्न ठरल्यावर तिची आई जेव्हा तिच्या मनात काहीबाही भरवते त्यावेळी ती म्हणते की, 'चेहऱ्यावरून तर (सासूबाई) त्या सालस प्रेमळ वाटतात.' यावरून मुळात मनानं ती चांगली असावी असं वाटतं. तेव्हा ती खरी कशी आहे, तिच्या सासरच्यांशी तिढ्या वागण्याचं कारण काय– हे स्पष्ट होण्याच्या दृष्टीनं कथेत काही नाही. याचा जर थोडाफार उल्लेख येता तर आता जसा हा चित्रपट सासूचा महिमा गाण्याच्या एकांगी उद्देशानं काढला असावा, असं वाटतं, तसं तरी वाटलं नसतं. तसंच या मायलेकीचं ताठ्यानं वागणं दाखवायला चित्रपटाचा जेवढा वेळ खर्च झाला तितकाच हा ताण ओसरलेला दाखवण्यासही द्यायला हवा होता; पण तसा वेळ दिला गेला नाही. या मायलेकींना येणारं शहाणपण दाखवण्यात केलेल्या घिसाडघाईमुळं चित्रपटाचा परिणाम मात्र कमी होतो. याशिवाय चित्रपटातील कलावंतांची भाऊगर्दीही आक्षेपार्ह. इतकी पात्रं घेण्याचा हव्यास दाखवून दिग्दर्शकानं काय साधलं कळत नाही कदाचित कथेतला नेमकेपणा राखता आला असता तर पात्रांची भाऊगर्दीही आपोआपच कमी झाली असती.

या चित्रपटाच्या निमित्तानं आशा काळे आपल्या सोशिक स्त्रीच्या चाकोरीबद्ध भूमिकांतून बाहेर आल्या, हे एक बरं झालं.कारण अलीकडे त्यांच्या या भूमिकांमधील तोच तोचपणा कंटाळवाणाही व्हायला लागला होता आणि आता त्या भूमिका त्यांना शोभतही नव्हत्या. मुख्य म्हणजे या प्रौढ भूमिकेत शोभूनही दिसतात आणि कामही चांगलं करतात. फक्त बोलण्यातला संथपणा जरा जास्तच वाटतो, तो त्यांनी टाळला असता तर बरं झालं असतं. त्यांच्या खालोखाल काम आहे प्रिया तेंडूलकरला. तिच्या 'गुडीगुडी' भूमिकांपेक्षा उद्धटपणे वागणाऱ्या मोठ्या सुनेची वेगळी भूमिका तिला मिळालीय. ही भूमिका तीही चांगली करते. अरूण सरनाईक, प्रकाश इनामदार, आत्माराम सावंत, मनोरमा वागळे यांच्या भूमिका नेहमीप्रमाणेच त्यात नाविन्य काही नाही. तर रमेश भाटकर, मोहन गोखले, नीलिमा, मंजू मालुगडे, प्रमोद शिंदे ही मंडळी बिचारी गुणी असूनही चित्रपटाच्या श्रेयनामावलीत भर घालण्याखेरीज काहीच करू शकत नाहीत.

या चित्रपटातील आणखीन एक आक्षेपार्ह गोष्ट म्हणजे या चित्रपटातील वेशभूषा. एकूण चित्रपटाचा काळ लक्षात घेता तो

अलीकडचा वाटतो.तेव्हा आशा काळेंना नऊवारीपेक्षा पाचवारीत दाखवलं असतं तर ते काळाशी सुसंगत वाटलं असतं. नऊवारीला विरोध नाही; पण मग चित्रपटातलं बाकीचं वातावरणही त्याला थोडंसं पोषक असतं तर बरं झालं असतं. निदान नोकरीच्या निमित्तानं बाहेरच्या जगात आलेल्या स्त्रीनं तरी बहुतांशी हा बदल स्वीकारलेला आहे. तेव्हा प्रश्न आजच्या काळातला हाताळतांना त्याला अनुरूप अशी वेशभूषाही दाखविली गेली तर बरं होईल. मधुचंद्राच्या वेळीच बागेत हिंडत म्हटलेल्या गाण्यात तरी ही नऊवारी वेशभूषा चांगलीच खटकते. अर्थात हा दोष फक्त 'माहेरची माणसं 'चा आहे, असं नाही. बहुतांशी मराठी चित्रपटात असं विसंगत चित्रण आढळतं. तसंच थोरल्या सुनेचं पहिलं दर्शन चित्रपटात होतं ते पाठीवर केस मोकळे सोडलेत आणि मिडी घातलीय अशा आधुनिक पेहरावात मग लग्नानंतर जी मुलगी सासूची अजिवात पत्रास बाळगत नाही, ती साडी आणि डोक्यावरुन पदर अशा वेशात वावरतांना पाहून आश्चर्यच वाटतं.

चित्रपटाचं संगीत सुधीर फडके यांचं आहे पण चित्रपट बघून झाल्यावरही यावर विश्वास बसत नाही. एकेकाळी सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केलेली एकेक मधुर गाणी अजूनही ओठावर आहेत; पण या नव्या चित्रपटातलं मात्र एकही गाणं त्या गाण्याची चिमुकली सुद्धा झलक घेऊन येत नाही. जुने सुधीर फडके या नव्या चित्रपटात शोधूनही सापडत नाहीत. याला दुर्दैव नाही तर काय म्हणायचं ?

एकंदरीत काय कमलाकर तोरणे, मधुसूदन कालेलकर, सुधीर फडके, आशा काळे अशी मराठी चित्रपटसृष्टीतील जानीमानी नावं एकत्र आली असूनही 'माहेरची माणसं 'ची भट्टी काही जमलेली नाही.

—शुभदा रानडे

विज्ञान

# सागरातील सस्तन प्राणी


डॉ. सुभाषचंद्र सारंग

आकाराने माशासारखा दिसणारा व्हेल हा मासा नसून पृथ्वीवरचा सर्वात मोठा सस्तन प्राणी आहे हे सर्वांना माहीत आहे. तथापि व्हेलप्रमाणेच अनेक सस्तन प्राण्यांचा एक वर्गच सागरामध्ये किंवा नद्यांमध्ये वास्तव्य करतो व त्यातले डॉल्फीनसारखे काही प्राणी बुद्धिमत्तेच्या बाबतीत माणसा खालोखाल तर आनंदी व खिलाडूवृत्तीच्या बाबतीत माणसालाही मागे टाकणारे असतात. परस्परांना संदेश पोहोचविणे, विशिष्ट ध्वनी संकेताने आखून दिलेल्या मार्गाने पोहत जाणे ही त्यांच्यातील काहींची वैशिष्ट्ये आश्चर्यकारक आहेतच; परंतु डॉल्फीनची शिकण्याची क्षमता व समज थक्क करणारी आहे.प्राचीन ग्रीक वाङमयामध्ये डॉल्फीनच्या वर्तनाचा अनेक ठिकाणी रंजक पद्धतीने उल्लेख केलेला आढळतो.

पाण्यातल्या या सस्तन प्राणी वर्गामध्ये जमिनीवरील सस्तन प्राण्यातील अनेक गुणधर्म आढळतात. हे प्राणी एकावेळी एका पिल्लाला जन्म देतात. पिल्लाला आई दूध पाजते त्यासाठी दोन स्तन असतात. प्राण्यांच्या जलचर स्वरूपामुळे त्यांच्यामध्ये जमिनीवरील सस्तन प्राण्यांची काही वैशिष्ट्ये नष्ट झाली आहेत. त्यांना कान ( बाह्यकर्ण ) केस व नखे नसतात तसेच मागचे पायसुद्धा नसतात. सस्तन प्राण्यांची काही वैशिष्ट्ये बदललेली आढळतात. उदा त्यांना पुढच्या पायाच्या जागी पॅडल्स अथवा वल्ह्यासारखे अवयव असतात. नाकाच्या जागी डोक्यावर छिद्रे असतात. आपल्या पर्यावरणानुकूलनासाठी या प्राण्यांना काही नवीन गुणधर्म प्राप्त होतात. त्यांचा आकार माशासारखा असतो. त्वचेखाली चरबी साठते, शेपटी उभी नसून आडवी व समांतर असते.

जलचर प्राणी सस्तन प्राण्यापैकी विविध जातीचे व्हेल्स, सील, वॉलरस व ड्युगाँग हे महत्त्वाचे आहेत. आपण ज्यांना व्हेल या एकाच सामान्य नावाने ओळखतो त्यांचे स्पर्म व्हेल, किलर व्हेल, नदीमधील डॉल्फीन सागरी डॉल्फीन, पॉरपॉइज आणि ब्यू व्हेल असे अनेक प्रकार आहेत. या सर्वांमध्ये ब्यू व्हेल हा प्रचंड प्राणी आहे. त्याची सरासरी लांबी ३५ ते ४० मीटर्स असते. त्याचे वजन १०० ते १२० टन असते. सर्वसामान्य हत्तीचे वजन ६ टन असते. यावरून व्हेलच्या प्रचंड धुडाची कल्पना करता येईल. ब्यू व्हेल अंटार्टिकाच्या सागरी परिसरात वास्तव्य करतो. त्याच्या तोंडात दाताऐवजी कंगव्यासारख्या प्लेटस् असतात. स्पर्मव्हेलला मात्र खालच्या जबड्यात दात असतात. स्पर्मव्हेलचे डोके एखाद्या प्रचंड पेटी अथवा पिंपासारखे असते व त्यात एक प्रकारचा तेलकट पदार्थ भरलेला असतो. हे तेल औद्योगिक क्षेत्रात महत्त्वाचे मानले जाते. स्पर्मव्हेलच्या आतड्यामधील श्रावापासून सुगंधी द्रव्य निर्माण केले जाते. किलर व्हेल हा शार्कसारखा दिसणारा सुमारे १० मीटर्स लांबीचा असतो. त्याच्या अंगावर पांढरे व पिवळे पट्टे उसतात. हा शार्कप्रमाणेच शिकारी व हल्लेखोर आहे. मोठे मासे, समुद्रपक्षी आणि इतर जातींचे व्हेल्स यांची शिकार करण्यात तो तरबेज असतो.

पॉरपॉइज हा २ ते ३ मीटर्स लांबीचा व



गोलाकार डोक्याचा व्हेल विशेष चाणाक्ष व हुशार असतो. किलर व्हेलप्रमाणेच त्याच्या पाठीवर पंख असतो. हा थोडया थोडया वेळाने समुद्राच्या पृष्ठभागावर येतो. इतर व्हेल्सप्रमाणेच त्याचे प्रमाण पॅसिफिक व अॅटलांटिक महासागरात जास्त आहे.

माणसाला विशेष परिचित असणारा व्हेल म्हणजे डॉल्फीन. डॉल्फीन २ ते २॥ मीटर्स लांबीचा असतो. त्याचे तोंड चोचीसारखे निमुळते झालेले असते. गडद राखाडी रंगाचे डॉल्फीन्स गंगा, ब्रह्मपुत्रा व सिंधु नद्यांमध्ये सापडतात. सागरी डॉल्फीन्स बहुतेक सर्व समुद्रात वास्तव्य करतात. डॉल्फीन्स हुषार असतात. सर्कशीमध्ये शिकवल्याप्रमाणे खेळ करून दाखवू शकतात. लहान मुलांना पाठीवर घेऊन छोटीशी सफर करू शकतात; पण या खेळकर प्राण्याला डोळ्याच्या जागी नुसत्या खाचा असतात.

जलचर सस्तन प्राणी वर्गामध्ये सील व वॉलरस हे स्वतंत्र वैशिष्ट्यांनी युक्त असतात. त्यांना सागरी सिंह म्हणून संबोधले जाते. आर्क्टिक व अंटार्टिक सागरी विभागात त्यांचे वास्तव्य असते. हे मांसाहारी प्राणी असून वारंवार जमिनीवर येतात. सील केसाळ असतो. त्याला दाढी–मिशा असतात. पुढचे पाय पुढे झुकलेले व मागचे पाय शेपटीला जोडलेले असल्याने जमिनीवर त्याला खुरडत सरपटावे लागते. वॉलरस केसाळ नसतो त्यांची कांती तुकतुकीत असते. देहावर मोठमोठ्या सुरकुत्या असतात. जबड्यात हत्तीसारखे मोठे दोन सुळे असतात. त्यांचा उपयोग खणण्यासाठी व सरपटण्यासाठी होतो. वॉलरसला मागचे छोटे छोटे पाय असतात सीलचे पाय मोठे असतात. जलचर सस्तन प्राण्यामध्ये पाणमांजरांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे; पण त्याचा आकार जमिनीवरील मांजरासारखाच असतो. पाय आखूड, पायाच्या बोटांना जोडणारे पडदे, शरीरावर दाट केस व मोठी रुंद शेपटी असलेली ही पाणमांजरे लुत्रा किंवा ओटर या नावाने ओळखली जातात. खाड्या आणि तलावात वास्तव्य करणारे हे प्राणी मासे व खेकडे खाऊन जगतात. ह्यूगाँग हा सागरी प्राणी व्हेलसारखाच असतो; पण तो सागरतळावरील गवत व पाणवनस्पती खाऊन जगतो. त्याला समुद्र गाय असे म्हणतात; वनस्पती खाण्यासाठी त्याचा जबडा गाईसारखा बनलेला असतो.

प्राणीशास्त्रज्ञ, पाणबुडे, नौकांचे डिझाईन तयार करणारे तंत्रज्ञ, व्हेलची शिकार करणारे व्यावसायिक, सुगंधी पदार्थांची निर्मिती करणारे उद्योगपती आणि सर्कशीचे मालक अशा सर्वांनाच सागरातील सस्तन प्राण्याबद्दल आणि विशेषत: व्हेलबद्दल औत्सुक्य असते. सजीवांच्या उत्क्रांतीच्या इतिहासात प्राण्यांची प्रथम निर्मिती सागरामध्ये झाली असली तरी उभयचर प्राण्यांनंतरच्या सर्व टप्प्यामध्ये प्राणी पाण्यातून जमिनीवर आल्याचे दिसून येते. सरपटणारे प्राणी जमिनीवर आले पुढे त्यांच्यापासून पक्षी व सस्तनप्राणी उत्क्रांत झाले. पक्षी गगनभरारी घेऊ लागले व सस्तनप्राण्यांनी भूमीवरच वास्तव्य केले. असे असताना व्हेलसारखे प्रचंड सस्तनप्राणी काही कारणामुळे पुन्हा जलचर बनले. या संदर्भातली एक शक्यता म्हणजे हिमयुगानंतरच्या काळात बर्फ वितळल्याने सर्वच सागरांची पातळी वाढली व सागरांनी भूमीवर आक्रमण केले तेव्हा हे प्राणी सागरवासी झाले असावेत शिवाय त्यांना आवश्यक असलेले प्रचंड प्रमाणावरील अन्न जमिनीपेक्षा सागरामध्येच उपलब्ध होते ही सुद्धा महत्त्वाची गोष्ट आहे, पुढे या प्राण्यांनी जलचर जीवनक्रमानुसार पर्यावरणानुकूलन करून घेऊन त्यांची शरीररचना माशांशी मिळतीजुळती झाली असावी.

या संदर्भात शार्क, डॉल्फीन व इक्थीओसोर या तीन प्राण्यांच्या शरीररचनेतील साम्य विचारात घेण्याजोगे आहे. तीनही सागरीप्राणी शार्क माशासारखेच दिसतात; पण त्यांतील फक्त शार्क हा मासा आहे. डॉल्फीन सस्तन प्राणी आहे तर इक्थीओसोर हा सरड्याच्या जातीतला सरपटणारा प्राणी आहे.

□



MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28

